उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ४१ ■ नाशिक, शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर–जिल्हा




**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री

सत्यमेव जयते



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

## 'अभिजात' सन्मान 'मराठी'च्या घरा तोचि दिवाळी-दसरा



# मराठी

## अभिजात दर्जा लाभला अवघा महाराष्ट्र आनंदला

**जाणल्या मराठी मनाच्या भावना**

घटस्थापनेच्या मुहूर्तावरच, केंद्र शासनाने
मराठी भाषेला 'अभिजात भाषा' हा दर्जा देण्याचा निर्णय घेतला.
मराठी भाषेचा उचित गौरव, मराठी संस्कृतीचा हा सन्मान.
सातत्यपूर्ण पाठपुरावा, लोकसहभाग, मराठी माणसाच्या
तीव्र इच्छाशक्तीचा..हा झळाळता आनंद!

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्र शासनाचे मनःपूर्वक आभार!**



www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

आरओसी-२०२४-२५ / क्र. ५ / C ३९६३

# मौजमजेसाठी अल्पवयीन मुलांनी चोरल्या ११ दुचाकी

## म्हसरूळ पोलिसांनी केल्या जप्त

**पंचवटी : वार्ताहर**

**मौज मजा करण्यासाठी अल्पवयीन मुलांनी शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या आवारात जवळपास ११ दुचाकी चोरी केल्या होत्या. याबाबत म्हसरूळ पोलिसांनी दोन अल्पवयीन ताब्यात घेतले असल्याची माहिती पंचवटी विभाग सहाय्यक पोलिस आयुक्त पद्मजा बढे पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अतुल डहाके यांनी दिली.**



याबाबत माहिती अशी की, शहरातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दुचाकी चोरी झाल्याने पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी चोरीच्या दुचाकी गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने म्हसरूळ पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक दीपक पटारे व अंमलदार पेठरोडने पेट्रोलींग करीत असताना पोलिस अंमलदार प्रशांत देवरे यांना मोटारसायकल चोरीची गोपनिय बातमी मिळाली होती. त्याप्रमाणे कारवाई करत असताना पेठरोड बाजुकडून मेहरधामकडे एक मोटार सायकलवर दोन अल्पवयीन मुले जाताना दिसली. त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता ते थांबले नाही. त्यामुळे त्यांना एस.टी. वर्कशॉप येथे थांबवून त्यांच्याकडे असलेल्या मोटारसायकलचे कागदपत्र विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तर दिली. त्यावरून मोटार सायकलचे चेसी व इंजिन नंबरवरून खात्री केली असता सदरची मोटारसायकल म्हसरूळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून दोन्ही अल्पवयीन बालकांना त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांनी आम्हाला मौज मजा करावयाची होती. परंतु आमचेकडे मोटार सायकल नसल्याने आम्ही व आमचे अजुन ४ ते ५ साथीदार अशांनी म्हसरूळ, पंचवटी, उपनगर, भद्रकाली पोलिस ठाणे हद्दीतून मोटारसायकल चोरी करून त्यांच्या नंबरप्लेट काढून टाकुन आपआपसात फिरवा फिरवी करून मौजमजा करण्यासाठी वापर करत असल्याचे सांगितले. दिवसभर मोटारसायकल वापरून झाल्यावर ती आडबाजुला लपवून पार्क करून ठेवत होतो असे सांगितले. त्यामुळे सर्व अल्पवयीन बालकांना विश्वासात घेवून त्यांच्या पालकांसमोर विचारपूस करून त्यांच्याकडून एकुण ११ मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत. त्यापैकी ४ मोटार सायकल म्हसरूळ पोलिस ठाणे, २ पंचवटी पोलिस ठाणे, २ उपनगर पोलिस ठाणे व १ भद्रकाली पोलिस ठाणे हद्दीतील चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील तपास पोलिस हवालदार सतीश वसावे करीत आहेत.

ही कामगिरी पोलिस आयुक्त संदिप कर्णिक, पोलिस उपआयुक्त किरणकुमार चव्हाण, सहाय्यक पोलिस आयुक्त पंचवटी विभाग, पद्मजा बढे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके, पोलिस उपनिरीक्षक मनोहर क्षिरसागर, पोलिस उपनिरीक्षक दीपक पटारे, पोलिस हवालदार बाळासाहेब मुर्तडक, सतीश वसावे, देवराम चव्हाण, प्रशांत वालझाडे, पोलिस अंमलदार पंकज चव्हाण, गुणवंत गायकवाड, पंकज महाले, योगेश सस्कर, प्रशांत देवरे, जितेंद्र शिंदे, ज्ञानेश्वर कातकाडे, गिरीधर भुसारे यांनी केली.

# रेल्वेचे खासगीकरण होणार नाही : अश्विनी वैष्णव

**नाशिकरोड : वार्ताहर**

**रेल्वेचे खासगीकरण होणार, अशा अफवा विरोधकांकडून पसरविल्या जात आहेत. देशातील सैन्य आणि रेल्वेबाबत अशा अफवा पसरविणे उचित नाही. देशाच्या संरक्षणाशी याचा संबंध येतो. रेल्वेचे खासगीकरण होणार नाही, उलट रेल्वे ही गोरगरिबांना परवडेल असा गरीब रथ आहे. त्यामुळे दळणवळणाची सुविधा तर होतेच, परंतु गोरगरिबांचा प्रवासही सुखदायी व त्यांच्या खिशाला परवडेल अशा प्रकारे होतो. पुढच्या काळात सर्वसामान्यांसाठी १२,५०० रेल्वे डब्यांचे काम सुरू आहे. महाराष्ट्र राज्यात १३२ रेल्वे स्थानकांचे काम सुरू आहे. रेल्वे ही देशाच्या जनतेची जीवनवाहिनी आहे, असे रोखठोक प्रतिपादन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केले.**




नाशिकरोड येथे सामनगाव रोडवर रेल्वे सुरक्षा दलाच्या ४० व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते देशातील कार्यक्षम व उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या ३३ रेल्वे अधिकाऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी पुरुष व महिलांच्या पथकाने आकर्षक शिस्तबद्ध परेड करत पाहुण्यांना सलामी दिली. विशेष म्हणजे दुचाकीवरील चित्तथरारक कसरतीने प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोके वाढविले होते. या कसरती दाखविणाऱ्या बहुतेक सर्व महिला होत्या. २६ जानेवारीला राजपथावरील जांबाज जवानांच्या कसरतीच्या प्रात्यक्षिकांची यावेळी आठवण झाली. ही सलामी स्वीकारून रेल्वेमंत्री प्रफुल्लित झाले. त्यांनी परेड व प्रात्यक्षिकांत सहभागी झालेल्यांचे भरभरून कौतुक केले. ते पुढे म्हणाले, महाराष्ट्राला २०१४ पर्यंत दीड ते दोन हजार कोटी रुपयांचा निधी दिला जात असे, पण पंतप्रधान मोदी यांचे सरकार सत्तेवर आल्यापासून १५ हजार ९४० कोटी रुपये निधी दिला गेला आहे. १ लाख ६४ हजार कोटींची कामे सुरू आहेत. १३२ रेल्वे स्थानकांचे काम सुरू आहे.

नाशिक-पुणे रेल्वेमार्गात नारायणगाव येथील दुर्बिणीचा अडसर आला आहे. १२३ देशांनी ही दुर्बीण तयार केली आहे. तेथून रेल्वे लाईन टाकता येत नाही म्हणून हा प्रकल्प रखडला आहे. त्यावरही मार्ग काढला जाईल. ते पुढे म्हणाले, येत्या काळात नाशिक-शिर्डी आणि नाशिक-डहाणू असे रेल्वेमार्ग टाकण्याचे नियोजन आहे. त्याची पाहणी डीपीआर तयार करण्याचे कामही सुरू आहे. ते पूर्ण झाल्यास नाशिक दक्षिण भारत आणि पश्चिम रेल्वेशी थेट जोडले जाईल, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी संग्यान ॲप व तीन नवीन कायद्यासंदर्भात पुस्तकांचे उद्घाटनही करण्यात आले. आरपीएफच्या ध्वजांनी परिसर सुशोभित करण्यात आला होता. नाशिकमधील खासदार, आमदार व राजकीय पदाधिकारी, नेते आवर्जून उपस्थित होते.

# वाढीव करवाढीबाबत मनपा घेणार शासनाचे मार्गदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक महापालिकेचे तत्कालीन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी २०१८ यांनी मालमत्ता करामध्ये तब्बल पाच पट वाढ केली होती. नाशिककरांवर एकप्रकारे अवाजवी करवाढ लादली गेली होती. दरम्यान त्यावेळी राजकीय पक्षांनी आक्रमक भुमिका घेत अन्यायकारक करवाढ रद्द करावी अशी भुमिका घेतली. दरम्यान महापालिका आयुक्त शासनाकडे दरवाढ रद्द करा अथवा समायोजन करा असा नव्याने प्रस्ताव शासनाला पाठवणार असून शासनाकडून मार्गदर्शन मागवणार आहे.**

> अन्याकारक दरवाढ रद्द करा अथवा समायोजन करुन द्या याबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागवले आहे.
>
> **– डॉ.अशोक करंजकर,** आयुक्त मनपा

यापूर्वी अन्यायकारक करदरवाढीवरुन न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. दरम्यान नाशिककरांवरील अन्यायकारक करवाढ रद्द करण्यावरुन मनपा प्रशासन गोंधळलेल्या अवस्थेत आहे. मागील पाच वर्षांपासून वाढीव दरानूसार नागरिक मालमत्ता कर अदा करत आहे. मात्र ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारि शिवसेना शिंदे गटाने दरवाढ फेरमुल्यांकन प्रस्ताव शासनाला सादर करा, अशी मागणी केली होती.

त्यानूसार मनपा प्रशासनाने शासनाला मालमत्ता दरात २५ व अनिवासी दरात ५० टक्के कपातीचा प्रस्ताव पाठवला. यापुर्वी पुलकुंडवार आयुक्त असताना हा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आला होता. आता आयुक्तांनी ही अन्यायकारक दरवाढ रद्द करा अथवा समायोजन करुन दया अशी मागणी करत मार्गदर्शन घेणार आहे. मुंढेच्या काळात लागू केलेली वाढीव करवाढ रद्द करण्यासाठी राजकीय पक्ष देखील आग्रही आहे.

# बडी दर्गाह मस्जिद ट्रस्टतर्फे पोलिसांना निवेदन

**जुने नाशिक : वार्ताहर**

**गाजियाबाद येथे आयोजित एका कार्यक्रमात यती नरसिंहानंद सरस्वती यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर तसेच इस्लाम धर्माबद्दल अवमानकारक भाषा वापरल्याने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बडी दर्गाह मस्जिद ट्रस्टतर्फे करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन भद्रकाली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र पाटील यांना काल (दि.४) दुपारी देण्यात आले.**



निवेदन देताना हाजी वसीम पीरजादा, हाजी हसीब पीरजादा, अन्सार खलील पीरजादा, माजिद अलीमुद्दीन पीरजादा, मुख्तार शेख यांच्यासह पीरजादा कुटुंबीय व अनेक मुस्लिम बांधव उपस्थित होते. दरम्यान देशातील विविध धर्मियांमधील सौहार्दाचे वातावरण दूषित करण्यासाठी अशा प्रकारचे कारस्थान केले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याप्रकरणी शासन व प्रशासनाने त्वरित कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान काल (दि.४) दुपारी शुक्रवारच्या सामुदायिक नमाजानंतर बडी दर्गाह येथून मुस्लिम बांधवांच्या एका शिष्टमंडळाने भद्रकाली पोलीस ठाण्यापर्यंत पायी जाऊन निवेदन दिले.

## जिल्हास्तरीय महिला मेळावा आज

**नाशिक :** शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, महिला सक्षमीकरण यासह विविध योजना राबविण्यात येतात. या योजना महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी जिल्हास्तरीय मेळाव्याचे शनिवार, ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या उपस्थितीत ठक्कर डोम ए.बी.बी. सर्कल, त्र्यंबक रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात आला आहे, असे जिल्हा माहिला व बाल विकास अधिकारी सुनिल दुसाने यांनी शासकीय प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# मराठा हायस्कूलमध्ये जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन

**नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलमध्ये जिल्हास्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन झाले.**

या उद्घाटन सोहळ्यासाठी भाऊसाहेब जाधव (जिल्हा क्रिडा अधिकारी नाशिक), मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल, रामनाथ रायते उपस्थित होते.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे मराठा हायस्कूल, नाशिक तसेच नाशिक जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १४, १७, आणि १९ वर्षांखालील मुले मुले नाशिक ग्रामीण व मनपा जिल्हास्तरीय स्पर्धांचे उद्घाटन मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात यांच्या हस्ते झाले.

आपल्या प्रास्ताविकात ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळाकडे देखील लक्ष दिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. उपस्थित सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक अनिल उगले यांनी तर आभार विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुयश कुंभार्डे यांनी मानले. यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व क्रीडा शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अजिंक्य घड्याळ विद्यार्थी संवाद कार्यक्रम



**नाशिक : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस आयोजित अजिंक्य घड्याळ विद्यार्थी संवाद हा कार्यक्रम प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या उपस्थित बलकवडे स्टेडियम येथे झाला.**

ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने त्यांनी विद्यार्थी खेळाडूंशी संवाद साधत विद्यार्थ्यांनी कागदावर पडलेल्या गुणांपेक्षा रक्तातील गुणांना जास्त वाव देण्याची आज गरज आहे, असे सूचक विधान प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी १० व्या अर्थसंकल्पात विद्यार्थी, युवक, महिला, शेतकरी यांच्या सर्वांगीण विकासासाठी जे निर्णय घेतले यावर सविस्तर बोलले. येणाऱ्या आपल्या जिल्ह्यातील खेळाडू हा जागतिक स्तरावर कसा खेळल त्यासाठी तालुका, जिल्हा पातळीवर सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे असतील.

याप्रसंगी अजित पवार यांनी घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करत उपस्थित सर्व कुस्ती खेळाडूंनी स्वाक्षरी अभियान राबवून घेतलेल्या निर्णयाना समर्थन दिले.

या स्पर्धेचे आयोजन कुस्तीगीर संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल बलकवडे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे यांनी केले. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुने, सोमनाथ बोराडे, युवक अध्यक्ष योगेश निसाळ, राजाराम धनवटे, विद्यार्थी अध्यक्ष अजय खांडबहाले, प्रसाद दळवी, रमेश पवार, मोहन गायकवाड, विलास कड, दिलीप सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नाशिक-पुणे महारेलला मिळणार गती : रेल मंत्री अश्विनी वैष्णव

## खासदार राजाभाऊ वाजे यांना रेल्वे मंत्र्यांचे आश्वासन

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. दरम्यान याप्रकरणी खासदार राजाभाऊ वाजे यांनी संदेच्या पहिल्याच अधिवेशनापासून याप्रकरणी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे पाठपुरावा सुरू केला आहे. तसेच हा रेल्वे प्रकल्प जुन्याच मार्गाने नाशिक, सिन्नर, संगमनेर, नारायणगाव, चाकण या मार्गाने व्हावा. आणि या प्रकल्पातील तांत्रिक त्रुटी तात्काळ दूर करुन त्यास गति मिळावी. याकरिता खा. वाजे आग्रही आहेत. तीन महिन्यापासून याप्रश्नी पाठपुरावा सुरु आहे. दरम्यान रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव नाशिक दौऱ्यावर आले असता खा. वाजे वाजे यांनी पुन्हा हा विषय त्यांच्याकडे मांडला असता रेल्वे मंत्र्यांनी सदर विषयाला गती देण्याचे आश्वासन खा. राजाभाऊ वाजे यांना दिले.**



### पंचवटी एक्सप्रेसची मांडली व्यथा

पंचवटी एक्सप्रेस मनमाड, लासलगांव, निफाड व नाशिक भागातील चाकरमान्यांसाठी जीवन वाहिनी आहे. मात्र, मागील काही वर्षात या दोन्ही रेल्वेची दुर्दशा झाली आहे. पंचवटीला सतत उशीर होतो. कपलिंग तुटण्याच्या गंभीर घटना देखील घडल्या आहेत. आदी समस्या खा. वाजे यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

### ना.रोडवरुन एकादशी एक्सप्रेसची मागणी

नाशिक येथून हजारो भाविक पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जात असतात. त्यांचा प्रवास सुखकर व्हावा आणि नाशिक ते पंढरपूर दरम्यान रेल्वे सेवा असावी या दृष्टीकोनातून खासदार वाजे यांनी दर आठवड्याला किंवा १५ दिवसाला नाशिकरोड ते पंढरपूर रेल्वे सेवा सुरु करावी. ती रेल्वे एकादशीच्या दिवशी किंवा पूर्वसंध्येला पंढरपूरला पोहचावी अशी देखील मागणी केली.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव नाशिक दौऱ्यावर आले असता यावेळी खा. राजाभाऊ वाजे यांनी त्यांची भेट घेत रेल्वेच्या संदर्भातील विषय त्यांच्याकडे मांडले. यात नाशिक-पुणे महारेल, नाशिक-कल्याण लोकल, नाशिक ते वावधान बंदर त्रंबकेश्वर मार्गे नवीन मार्ग आदीसह नऊ विषय रेल्वे मंत्र्यांकडे मांडले असता त्याबाबत त्यांनी सकारात्मकता दर्शवली. नाशिक-पुणे सेमी हायस्पीड महारेल प्रकल्प जुन्याच मार्गाने होणार यावर रेल्वे मंत्री वैष्णव यांनी शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, नारायणगाव लगत असलेल्या अंतरिक्ष अभ्यास केंद्राचा त्यास अडसरा असल्याने त्यास टाळून ९० किमीचा वळसा घेऊन हा मार्ग उभारला जाणार आहे. त्या अनुषंगाने नव्याने आराखडा बनवला जात असल्याचे रेल्वे मंत्र्यांनी सांगितले. नाशिकरोड रेल्वे स्थानकाला नव्याने निर्माण होत असलेल्या वावधान बंधारासोबत रेल्वे मार्गाने जोडावे आणि तो मार्ग त्रंबकेश्वर मार्गे असावा अशी देखील मागणी यावेळी करण्यात आली. याबाबात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी खा. राजाभाऊ वाजे यांना माहिती देताना म्हटले की, रेल्वे मंत्रालयाकडून याप्रश्नी कारवाई सुरु केली जाणार आहे. नाशिकरोड ते त्रंबकेश्वर रेल्वे मार्ग व्हावा अशी देखील मागणी संसदेच्या अधिवेशन काळात खासदार वाजे यांनी केली होती.

आगामी कुंभमेळा आणि सद्यस्थितीत असलेला नाशिकरोड रेल्वे स्थानकावरील तणाव तसेच अतिरिक्त भार लक्षात घेता नाशिक रोड रेल्वे स्थानकाची क्षमता वाढवणे आणि त्याचे नुतनीकरण होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीकोनातून खासदार राजाभाऊ वाजे यांनी पत्राद्वारे मंत्री वैष्णव यांच्याकडे मागणी केली आहे. नाशिकरोड ते कल्याणपर्यंत लोकल रेल्वे सेवा अनेक वर्षे खोळंबली आहे. मंत्री वैष्णव यांनी खासदार वाजे यांना लवकरच इंटरसिटी रेल्वे सेवा केंद्र सरकारकडून सुरु करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच या सेवेत नाशिक आणि मुंबईला जोडणारी सेवा अग्रक्रमाने सुरु होईल असे आश्वासन दिले आहे. त्रंबकेश्वर मार्गे नवीन रेल्वे मार्ग निर्माण करणे, नव्याने नाशिक ते पंढरपूर एकादशी एक्सप्रेस सुरु करणे, नाशिकरोड येथून तिरुपती, जम्मू, अजमेरसाठी थेट रेल्वे सेवा सुरु करणे, रेल्वे ओव्हरहेड ब्रिज, अंडरपास नव्याने उभारणे तसेच नूतनीकरण करणे, स्थानकांचे नुतनीकरण आणि मुलभूत सुविधा, पंचवटी आणि राज्यराणीला पुनर्वैभव प्राप्त करून देणे

## महत्त्वाचे

### जेलरोडला नवरात्रोत्सवाचा जल्लोष



**नाशिकरोड : प्रतिनिधी**

जेलरोड येथील श्री गजानन महाराज भजनी मंडळाच्या अध्यक्ष कांता सुरेश वराडे यांच्या उपस्थित गंधर्व नगरी येथे नवरात्र उत्सवाचे जल्लोषात आणि भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी महिला भजनी मंडळाने भजन गात देवी मातेची स्तुती केली. यावेळी परिसरातील महिलाची संख्या मोठया संख्येने उपस्थिती होती.

### ६५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी धुळ्याच्या कारागिराविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

फर्निचर तयार करण्याच्या कामासाठी ऑनलाईन ७६ हजार रुपये घेऊन काम पूर्ण न करता ६५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी धुळ्याच्या कारागिराविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयीत आरोपी विशाल शरद कोळी (रा. धुळे) याने किचन ट्रॉली, घरातील फर्निचर बनविण्याची ऑर्डर घेऊन पाहिजे त्या प्रकारची किचन ट्रॉली व फर्निचर बनवून देतो, असे सांगून फिर्यादी ज्ञानेश्वर सीताराम महाजन (रा. ओझर, ता. निफाड) यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर किचन ट्रॉली व फर्निचरच्या कामासाठी महाजन यांच्याकडून वेळोवेळी मोबाईल फोनवरून ऑनलाईनद्वारे ७६ हजार रुपये स्वीकारले. त्यानंतर फिर्यादी यांच्या घरी ११ हजार रुपये किमतीच्या टाईल्स पोहोचविल्या. मात्र राहत्या घरातील किचन ट्रॉली व फर्निचरचे काम न करता ६५ हजार रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार २२ ऑक्टोबर ते ११ डिसेंबर २०२३ या कालावधीत घडला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात विशाल कोळी यांच्याविरुद्ध आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेवाळे करीत आहेत.

### इंदिरानगरच्या ३५० महिलांना सप्तशृंगी गडाची सहल




**सिडको : विशेष प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातील इंदिरानगर परिसराच्या ३५० महिलांना सप्तशृंगी गडाची सहल घडवुन आणली. शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या हस्ते नारळ वाढविल्यानंतर या महिला सप्तशृंगी गडाकडे रवाना झाल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख देवानंद बिरारी, डी.जी.सूर्यवंशी, माजी नगरसेविका वंदना बिरारी, निलेश साळुंखे, रवींद्र गामणे आदी उपस्थित होते. जय सप्तशृंगी व जय भवानी मातेच्या जयजयकाराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

### विद्यापीठाच्या स्कूल कनेक्ट उपक्रमाचा प्रारंभ

**नाशिक :** भावी पिढी घडविण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील ग्रीन कॅम्पसला न्यू इरा इंग्लिश स्कुलच्या शिक्षकांनी भेट दिली. याप्रसंगी नाशिक येथील न्यू इरा इंग्लिश स्कुलच्या शिक्षकांशी संवाद साधला. याप्रसंगी विद्यापीठाच्या प्रति-कूलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील, न्यू इरा स्कुलच्या ट्रस्टी सुनिता बोहरा, उमा, उपकुलसचिव डॉ. सुनिल फुगारे, डॉ. स्वप्नील तोरणे, सहयोगी प्रा.डॉ. प्रदिप आवळे, सुबोध मुळगुंद, आदी मान्यवर उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
एम एम आर डी ए MMRDA
CIDCO
MMRC
THANE RING METRO
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
महाराष्ट्रासाठी ₹ 33,000 कोटींच्या
वेगवान विकासाची भेट
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी
यांच्या शुभहस्ते
महत्वाकांक्षी प्रकल्पांचा भूमिपूजन, शुभारंभ आणि लाभ वितरण सोहळा
महाराष्ट्रातील पहिली भूमिगत मेट्रो
कुलाबा-वांद्रे-सीप्झ : मुंबई मेट्रो मार्गिका - 3 टप्पा-1 (आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानक) शुभारंभ
• रोज सुमारे 17 लाख प्रवाशांची वाहतूक
• आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्लेक्स- 12.69 किमी
• एकूण- 10 स्थानके (9 भूमिगत व एक 1 जमीन स्तरावरील स्थानक)
परिवर्तनशील प्रवास, भविष्याला आकार
ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमिपूजन
• अखंड कनेक्टिव्हिटी आणि प्रवासाच्या वेळेत होणार बचत
• एकूण लांबी: 29 किमी
• आधुनिक आणि सुसज्ज 22 स्थानके
मुंबई प्रवासात... वेळ आणि इंधन कपात
पूर्व मुक्त मार्ग विस्तार छेडा नगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे प्रकल्पाचे भूमिपूजन
• दक्षिण मुंबई-ठाणे प्रवास वेगवान होणार
• ठाणे, नवी मुंबई आणि पूर्व उपनगराला दक्षिण मुंबईशी जोडणारा उन्नत मार्ग
• छेडा नगर ते आनंद नगर, ठाणे दरम्यान 13.40 किमी लांबीचा पूर्व मुक्त मार्ग विस्तार
सुनियोजित शहराची उभारणी, आरामदायी जीवनमानाची हमी!
नैना नगर रचना परियोजनेंतर्गत विविध पायाभूत सुविधा कामांचे भूमिपूजन
• जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा मिळाल्याने शहरांचा सुसज्ज विकास
• प्रथम टप्प्या अंतर्गत 42 चौ. कि.मी. क्षेत्राचा विकास
• 9 उड्डाणपूल, 12 लहान पूल, 26 पादचारी भुयारी मार्ग, 1 वाहन भुयारी मार्ग आणि एकूण 17.59 कि.मी. लांबीच्या रस्त्याचा समावेश
प्रशस्त इमारत करेल नागरिकांचे स्वागत
ठाणे महानगरपालिकेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन
• कार्यालये एकाच इमारतीत आल्याने नागरिकांना सुविधा मिळणार
• किल्ल्याच्या स्वरूपात इमारतीची रचना
• आधुनिक कार्यक्षमतेची 32 मजल्याची प्रशासकीय इमारत व महासभेची 5 मजली इमारत
सक्षम महिला... विचार पहिला
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सत्कार
• महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मिळाली गती
• लाभार्थी महिलांना लाभाचे प्रातिनिधिक वितरण
• आत्तापर्यंत 1.96 कोटी भगिनींना लाभाचे वितरण
शनिवार, 05 ऑक्टोबर 2024
दुपारी 1:00 वाजता
बोरीवडे मैदान, घोडबंदर रोड, ठाणे
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन /MahaDGIPR mahasamvad.in MAHARASHTRADGIPR थेट प्रक्षेपण DD NEWS

## मुंबईकर हैराण

**मुंबई :** गेल्या आठवड्यात मुंबई शहर, तसेच उपनगरांत मुसळधार पाऊस कोसळला. त्यानंतर पावसाने ओढ दिली. परिणामी मुंबईतील तापमानात वाढ झाली असून उन्हाच्या काहिलीने मुंबईकर हैराण झाले आहेत. दरम्यान, मुंबईत रविवारी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा, तर ठाणे भागात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.


**ग्रामपंचायत पाचोरे बु., निफाड, जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२०२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत पाचोरे बु/, ता. निफाड, जि. नाशिक येथे तांडावस्ती योजने अंतर्गत कामांकरिता दिनांक ०४/१०२०२४ पासून ई- निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in प्रसारित करण्यात येत आहे.अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदार यांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत पाचारे बु.,ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही/- ग्रामसेवक सही/- सरपंच सही/-उपसरपंच**
**ग्रामपंचायत पाचोरे बु., ता. निफाड, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत मातेरेवाडी ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. १/२०२४-२०२५**

ग्रामपंचायत कार्यालय मातेरेवाडी ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे नागरी सुविधा अंतर्गत गावांतर्गत कामे करणे कामी ई-निविदा मागवण्यात येत आहेत. ई- निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०४/१०/२०२४ ते१०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय मातेरेवाडी ता. दिंडोरी जि, नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी सही/- उपसरपंच सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत मातेरेवाडी ता. दिंडोरी जि.नाशिक**

**ग्रामपंचायत सायाळे, ता.सिन्नर, जि.नाशिक.**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०२/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत सायाळे, ता.सिन्नर, जि.नाशिक येथे जनसुविधा योजने अंतर्गत होणारे काम, स्मशानभूमी अनुषंगिक कामे(संरक्षक भिंत) बांधणे(रु.२०,००,०००/-) या कामाकरिता ई-निविदा शासनाच्या **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे. निविदा भरण्याची दिनांक ०३/१०/२०२४ ते ०९/१०/२०२४ आहे. अधिक माहिती वरील वेबसाईट वर उपलब्ध असून निविदाधारकांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत सायाळे, ता.सिन्नर, जि.नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**सही/-सरपंच सही/-ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सायाळे, ता.सिन्नर, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत बेरवाडी, ता.निफाड, जि.नाशिक.**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०२/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत बेरवाडी, ता.निफाड, जि.नाशिक येथे १५वा वित्त आयोग योजने अंतर्गत होणारी कामे, १)श्रीराम नगर येथे सौर ऊर्जा ग्रीड पॅक बसविणे(रु.३,००,०००/-), २) श्रीराम नगर येथे सौर पथदीप बसविणे(रु.१,००,०००/-), व ३) सौर पथदीप बसविणे(रु.२०,०००/-) या कामांकरिता ई-निविदा शासनाच्या **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे. निविदा भरण्याची दिनांक ०२/१०/२०२४ ते ०८/१०/२०२४ आहे. अधिक माहिती वरील वेबसाईट वर उपलब्ध असून निविदाधारकांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत बेरवाडी, ता.निफाड, जि.नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**सही/-सरपंच सही/-ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत बेरवाडी, ता.निफाड, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत दीक्षी ता. निफाड जि.नाशिक.**

**जाहीर निविदा सूचना क्रमांक ०३/२०२४-२०२५**

ग्रामपंचायत दिक्षी ता. निफाड जि.नाशिक सोलर स्ट्रीट लाईट, पाणीपुरवठा तसेच शौचालय युनिट बांधकाम करिता ई निविदा नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ऑनलाइन मागविण्यात येत आहे. दिनांक ०३/१०/२०२४ ते ०८/१०/२०२४ ला सायं. ०५.०० वाजेपर्यंत निविदा भरण्यात येईल. तसेच ०९/१०/२०२४ ला सायं ५.०० वा. निविदा उघडण्यात येईल उपरोक्त निविदा **http://www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावरऑनलाइन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. आहे.

**सही/-ग्रामसेवक सही/-सरपंच व उपसरपंच**
**ग्रामपंचायत दीक्षी ता. निफाड जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय शिंदवड ता. दिंडोरी जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय शिंदवड ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, जनसुविधा, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०४/१०/२०२४ पासून ते १०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय शिंदवड, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामसेवक उपसरपंच सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय शिंदवड ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय सावरपाडा ता. दिंडोरी जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय सावरपाडा ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०४/१०/२०२४ पासून ते १०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय सावरपाडा, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामसेवक उपसरपंच सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय सावरपाडा ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत सावरगाव ता. येवला जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र.०२/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)**

ग्रामपंचायत सावरगाव ता. येवला जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी प्रमाणपत्र, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा दिनांक ०५/१०/२०२४ सकाळी १०.०० वा. पासून ते दिनांक ०९/१०/२०२४ सायंकाळी ५.०० वा (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत माडसांगवी येथे जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक ११/१०/२०२४ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत सावरगाव ता. येवला जि. नाशिक येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबंधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत सावरगाव ता. येवला जि. नाशिक यांच्या कडे राखून ठेवण्यात आले आहे.

**कामाचे नाव-** आंबेडकर नगर भाग १ एल.ई.डी. स्ट्रीट लाईट अंदाजित रक्कम ६०००००/- २) आंबेडकर नगर भाग २ एल.ई.डी. स्ट्रीट लाईट अंदाजित रक्कम ४८००००/- ३) आंबेडकर नगर भाग ३ एल.ई.डी. स्ट्रीट लाईट अंदाजित रक्कम ३९००००/- ४) रोहीदास नगररस्ता कॉक्रीट करणे अंदाजित रक्कम २९००००/-

**सही/- ग्रामसेवक व सरपंच**
**ग्रामपंचायत सावरगाव ता. येवला जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय, लहवित ता. जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना क्र.३/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत लहवित ता.जि.नाशिक Underground Drainage System at Gp Lahvit Tal Nashik विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. ०४/१०/२०२४ ते ११/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत लहवित, ता. जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय ओझरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना क्र.१ २०२४-२५ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय ओझरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक येथे विविध विकास निधीचे विविध विकास कामे करण्यासाठी बंद लिफाफा व दरपत्रक पद्धतीने नोंदणीकृत ठेकेदार/ पुरवठादाकडून जाहीर खुली निविदा व दरपत्रक मागविण्यात येत असुन सदर जाहीर खुली निविदा कामांसाठी कोरे निविदा संच व दरपत्रक ग्रामपंचायत ओझरखेड येथे कार्वेयालयीन वेळेत उपलब्ध असून सदर जाहीर निविदा व दरपत्रक दिनांक ०४/१०/२०२४ रोजीपासून खरेदी व दाखल करता येतील. जाहीर खुली निविदा संचात माहिती, अटी व शर्ती उपलब्ध आहे. तसेच कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार सरपंच ग्रामपंचायत ओझरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक यांनी राखून ठेवले आहे.

**ग्रामसेवक प्रशासक**
**ग्रामपंचायत कार्यालय ओझरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय मडकीजांब ता. दिंडोरी जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय मडकीजांब ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०४/१०/२०२४ पासून ते १०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय मडकीजांब, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामसेवक उपसरपंच सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय मडकीजांब ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय लखमापूर ता. दिंडोरी जि. नाशिक**

**जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५ प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय लखमापूर ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, नागरी सुविधा योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०४/१०/२०२४ पासून ते १०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय लखमापूर, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामसेवक उपसरपंच सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय लखमापूर ता. दिंडोरी जि. नाशिक**



## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहीत निर्व्यसनी जोडपे पाहिजे.रहाण्याची सोय. **संपर्क:-सकाळी १० ते ५ नाशिक.मो.नं.९०४९०-३४९९९**

---

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

---

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो. नं.९०४९०-३४९९९**

---

न्यू अनारकली फॅशन &NX दुकानासाठी अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर व सेल्समन, हेल्पर पाहिजे. ठिकाण : एम.जी.रोड, भारत बुकसमोर, फावडे लेन,

---

**संपर्क- ९८८१३८३०१९**

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

### पाहिजेत

कॉलेजरोड नाशिक येथील नामांकित ब्युटी पार्लर व शासन मान्यताप्राप्त ब्युटी कल्चर कोर्सेस, ॲकेडमीसाठी अनुभवी ब्युटीशियन, उत्तम संवाद कौशल्य असलेल्या अनुभवी रिसेप्शनीस्ट, टेली कॉलर्स मुली, महिला पाहिजेत.-अपेक्षेसह बायोडेटा पाठवा. संपर्क ९३०९२४००७५, ८३७८८८७८६२

---

अशोक स्तंभावरील बॉईज होस्टेलसाठी कामासाठी जोडपे पाहिजे. राहण्याची व जेवणाची सोय. कामाचे स्वरूप स्वयंपाक, भांडे घासणे **मो. भूषण बागूल ७३८७३६३४७२ कल्याणी बागूल ९३७०७३२८६६**

---

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह भेटा- कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

### ब्राह्मण वधू पाहिजे

मुलगी उंच असावी, समजूतदार, मनमिळाऊ, पदवीधर, वय २४ ते २७. **संपर्क मोबाईल नंबर ९५५२२७७०९७, ९५११६८०९९८**

### ज्योतिष

गायत्री ज्योतित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### CHANGE OF NAME

I Tailor Pavan Poojaben Wife of No 15178852H Rank Hav Tailor Pavan Bhupendrabhi is serving at 341 Fd Regt, C/O 99 APO Add:- Vill- Bharuch, Post- Bharuch, Teh- Bharuch Dist- Bharuch, Gujrat 392001. That i have changed my Name from Tailor Pavan Poojaben to **Tailor Pooja Pavan** due to wrongly entered in service record of my husband as per affidavit NO 2068/2024

---

HAVE CHANGE OF MY OLD NAME PRAVINBANU AMANULLA SHAIKH (AS PER SCHOOL LIVING CERTIFICATE) TO NEW NAME AS **PARVIN SHAFIK SHAIKH** (ADHAR CARD NO.534008135170) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE TAHASILDAR KOPARGAON.
PLACE-KOPARGAON
DATE 19/09/2024
(DATE 26/09/2024)

### हरवले आहे

मी **जयश्री उत्तमराव धुमाळ** राहणार लासलगाव येथील रहिवाशी असून माझे शाळा सोडल्याचा दाखला **रजि क्रमांक ७६३** हरवले आहे. या बाबत मी लासलगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. सदर दाखला कोणाला सापडल्यास ८०८००७४९२३ या मोबाईल क्रमांक वर आणून द्यावे

### विकणे आहे

संपूर्ण प्लॅन्ट विकणे आहे ३६/७ ऑईल एक्सपेलिअर २ कन्व्हेअर ५० एचपी मोटार ३००० एल रिफायनी स्पेअर पार्ट सेट २, स्टार-डेल्टा स्टार्टर **संपर्क- ग्रीन लिफ इंडस्ट्रीज ९४२२९९०२७८**

### भाड्याने देणे आहे

संचेती टॉवरमागील पहिल्या मजल्यावरील १) 6'10"x6 SMALL ROOM 2) 23'x10" HALL 3)16'x11.10"- एकूण वापरलेले चटई क्षेत्र ४४४ फुट भाड्याने देणे. फक्त व्हॉट्सअॅप: 98693993772,

**जाहिरात छोटी किमया मोठी!**



**ग्रामपंचायत कार्यालय, जलालपूर ता. जि. नाशिक**

**सार्वजनिक निविदा/जाहीर ई निविदा/निविदा सूचना क्र/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत कार्यालय जलालपूर ता. जि.नाशिक, ई निविदा/जाहीर निविदा/साहित्य पुरवठा ई-निविदा साहित्य पुरवठा जाहीर ई- निविदा मागविण्यात येत असून, सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in व जाहीर निविदा फ्रॉर्म ग्रा. पं. कार्यालयात अटी व शर्तीसह सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा ०४/१०/२०२४ पासून ११/१०/२०२४ पर्यंत खरेदी आणि दाखल करता येतील. ई- निविदा संबधितची विस्तृत अटी व शर्ती सूचना फलकावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय, जलालपूर ता. जि. नाशिक हे राखून ठेवत आहेत.

**ग्रामविकास अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत जलालपूर ता. जि. नाशिक**

**ग्रामपंचायत डांगराळे ता. सुरगाणा, जि. नाशिक**

**जाहीर ई - निविदा सूचना क्र. १/२०२४-२०२५**

ग्रामपंचायत कार्यालय डांगराळे ता. सुरगाणा, जि. नाशिक येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय युनिट बांधणे कामी ई-निविदा मागवण्यात येत आहे. ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०४/१०/२०२४ ते १०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय डांगराळे ता. सुरगाणा, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/-उपसरपंच सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत डांगराळे ता. सुरगाणा जि. नाशिक**

**ग्रामपंचायत गोंदुने ता. सुरगाणा, जि. नाशिक**

**जाहीर ई - निविदा सूचना क्र. १/ २०२४ - २०२५**

ग्रामपंचायत कार्यालय गोंदुने ता. सुरगाणा, जि. नाशिक येथे हार्डवेर व बिल्डींग बांधकाम साहित्य पुरवणे कामी ई-निविदा मागवण्यात येत आहे. ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०४/१०/२०२४ ते १०/१०/२०२४ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय गोंदुने ता. सुरगाणा, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/-उपसरपंच**
**उपसरपंच ग्रामपंचायत गोंदुने ता. सुरगाणा जि. नाशिक**

**येवला नगरपरिषद येवला, जि.नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना प्रथम प्रसारीत सन-२०२४/२०२५**

येवला नगरपरिषद हद्दीतील मे. शासनाचे लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत एकुण ०८ (आठ) विकास कामे करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत, अनुभवी ठेकेदार/नोंदणीकृत मान्यताप्राप्त कंत्राटदार यांचेकडून मुख्याधिकारी, येवले नगरपरिषद, येवले जि. नाशिक शतनाम पध्दतीने सदर ई-निविदा शासनाच्या **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरुन दाखल करता येईल. ई-निविदा संबंधिची सविस्तर माहिती व अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/- (तुषार संजय आहेर)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**येवला नगर परिषद**


**IN THE COURT OF JUDICIAL MAGISTRATE (FIRST CLASS)**
**23 RD COURT, ESPLANADE, MUMBAI.**
**NOTICE IN C.C. NO. 164 /SUM/2023**

**To,**
**Mr. Sachin Sitaram Kasar**
Adds. At :- House No. 24, Village - Vasali, Satpur, Nashik Rural, Pincode - 422 009.

Whereas an application made by Advocate for complainant for issuing Proclamation against the above name accused On that application this court has passed following order on 12/08/2024.

**-ORDER-**

"Issue notice in one widely circulated news paper in the area of accused residence."

You are therefore directed to attend Judicial Magistrate (First Class) 23rd Court, Esplanade, Mumbai on 05/12/2024 at 11:00 am for further hearing, failing which this court shall proceed against you in accordance with law.

Mumbai
Dated - 20/09/2024

For Judicial Clerk
Judicial Magistrate (First class)
23rd court, Esplanade, Mumbai.

## टायटल व्हेरिफीकेशनसाठी नोटीस

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका चांदवड, पैकी **मौजे दहयाणे,** ग्रामपंचायत शिवारातील शेतजमिन मिळकत **गट नंबर ४९/१ यासी क्षेत्र ३ हेक्टर ८० आर + पो.ख. २ हेक्टर ८० आर यासी आकार १ रूपया २९ पैसे. अ) १ ) श्री. रामदास देवराम पाचोरकर** यांचे मालकीचे गटाचे पश्चिम कोपऱ्यात दक्षिण बाजुचे संपुर्ण क्षेत्र १ हेक्टर १० आर+पो.ख.१ हेक्टर ४० आर यासी आकार ० रूपये ३७ पैसे . ब) २) श्री. जितेंद्र गोरखराव पाटील. हिस्याचे गटाचे पश्चिम कोप-यात उत्तर बाजूचे संपूर्ण क्षेत्र १ हेक्टर ९० आर+ पो.ख.१ हेक्टर ४० आर यासी आकार ० रूपये ६४ पैसे. गट ४४६ यापैकी गटाचे उत्तर बाजुचे क्षेत्र ० हेक्टर ५९.५० आर यासी आकार २ रूपये ०० पैसे. रस्त्याची सोय :- सदरच्या शेतजमिनीत जाणे-येणेसाठी १५ फुट रूंदीचे पूर्वापारचे वागहिवाटी रस्ता असून त्या रस्त्याचे वागवहिवाटी हक्कासह शेतजमिन खरेदी देण्याचे ठरलेले आहे. यांसी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे यांचे खरेदीमालकीची मालकीची व कब्जावहिवाटीची असल्याचे सांगून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे सांगून त्याचेसोबत व्यवहाराची बोलणी केली आहे व विसाराची रक्कम ही स्वीकारलेली आहे. तथापि, उपरोक्त मिळकतीचे टायटल व्हेरिफीकेशनसाठी ही नोटीस प्रसिध्द करीत आहेत. सबब, उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, हक्क, हितसंबंध, करार मदार अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अगर कोणाचीही सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून खालील पत्यावर ७ **(सात)** दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. सबब, उपरोक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल यांची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस.**ता.०५/१०/२०२४.**

**ॲड. प्रकाश भास्कर बोडके.**
**ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी, ''श्री'' झेरॉक्स ॲण्ड स्टॅम्पवेंडर, २३ बसवंत मार्केट, पिंपळगाव (ब). ता. निफाड. जि. नाशिक मो.नं. ९८५०१५६५८८**

## जाहीर नोटीस

**नि.०६ प्रोसेस जमा**

**श्रीमती. किरण के. देवरे, (पवार)**
**ॲडव्होकेटस सटाणा (नाशिक)**

**जा.क्र.३१९८/२०२४/ ता.४/१०/२०२४, वारसा प्रमाणपत्र अ.नं.१२४/२०२४**
**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात.....**

**१) श्री. राजेंद्र चैत्राम नहिरे**, वय-५५ वर्ष **२) श्री. रविंद्र चैत्राम नहिरे**, वय-५४ वर्ष **३) सौ. सिंधुबाई सुकलाल साचले**, वय-५२ वर्ष **४) सौ. शोभा विठ्ठल मानकर**, वय-७३ वर्ष
धंदा - नं. १ ते ३ मजुरी, नं. ४ व ५ - घरकाम सर्व रा. ताहाराबाद, ता. बागलाण, जि. नाशिक- **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सा. वाला**

ज्याअर्थी अर्जदारांचे वडील **चेत्राम तुळशिराम नहिरे** हे **दि. २२/११/२०१०** रोजी **मौजे ताहाराबाद**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारांची आई **अनुसयाबाई चैत्राम नहिरे** ही **दि. ०८/०५/१९८६** रोजी **मौजे ताहाराबाद**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झाली आहे. **कै. चैत्राम तुळशिराम नहिरे व कै. अनुसयाबाई चैत्राम नहिरे** यांचे अर्जदार हेच एकमेव वारस असले बाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडून अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणे कामी मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **कै. चैत्राम तुळशिराम नहिरे व कै. अनुसयाबाई चैत्राम नहिरे** यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि. ५/११/२०२४** रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणने दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करतील मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणने ऐकले जाणार नाही. आज दिनांक १६/०९/२०२४ रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**कामगिरी लिपिक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा (नाशिक)**

(शिक्का)

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय सटाणा (नाशिक)**


**ग्रामपंचायत हिवरगाव ता, सिन्नर जि.नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. २ सन २०२३-२४**

**मौजे हिवरगाव** ताः सिन्नर, जि नाशिक येथे १५ वित्त आयोग निधी अंतर्गत व दलित वस्ती योजने अंतर्गत विविध विकास कामाकरीता जाहीर निविदा नोंदणीकृत संस्थेकडून मागवण्यात येत आहे

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे हिवरगाव येथे स्वच्छता संकुल (सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे | २,५०,००० रुपये | २६० | २५०० |
| २ | दलित वस्ती योजने अंतर्गत हिवरगाव येथे भूमिगत गटार करणे | २,००,००० | २६० | २००० |

१) निविदा सादर करण्याची तारीख २/१०/२०२४ ते ९/१०/२०२४ असेल
२) व निविदा उघडण्याची अंतिम तारीख १०/१०/२०२४ असेल.
३) निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायत हिवरगाव यांना असेल.

**सरपंच उपसरपंच ग्रामसेवक**


## टायटल व्हेरिफिकेशन कामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी ग्राम पंचायत **पिंपळणारे** या गावचे शिवारातील मिळकत यांसी **भूमापन/गट क्र.६९ यांसी क्षेत्र १ हे. ८५ आर. यांसी आकार रुपये २.३९ पैसे** ही मिळकत **श्री. नामदेव भास्कर खांदवे** यांचे कायदेशीर मालकीची व कबजे वहिवाटीतील शेती मिळकत असून त्यांनी त्यापैकी **क्षेत्र हे. ०.२० आर.** अशी शेती मिळकत आमचे पक्षकारास विक्री करण्याचे ठरविलेले आहे व त्यानुसार त्यांनी विसार स्वीकारलेला आहे.

सबब वरील शेती मिळकतीवर कोणाचाही काही गहाण, दान, कर्ज, जामिनकी, विसारपावती, साठेखत, बक्षीस पत्र अथवा कोर्ट दावा वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ **(पाच)** दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही काही एक हरकत न आल्यास वरील शेती मिळकत ही निर्वेध आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल नंतर कोणाचीही काहीही तक्रार किंवा पत्र व्यवहार चालणार नाही तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द केलेल्या हरकती आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही कळावे ही जाहीर नोटीस.

**दिनांक : ०४/१०/२०२४**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. विनय श्रीचंद जैन,**
**ॲडव्होकेट**
**श्रमसाफल्य, स्नेह नगर, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ मो.क्र.- ९२२६७१२२७१**

## जाहीर नोटीस

**ॲड.बर्डे,**
**(दिंडोरी न्यायालय)दिंडोरी**

**किरकोळ चौकशी अर्ज नं:८५/२०२४**

**दिंडोरी येथील मे.तहसिलदार तथा दंडाधिकारी सो.दिंडोरी यांचे कोर्टात,**

**श्री. दत्तू विष्णू जाधव** **अर्जदार**

**विरुध्द**

**ग्रामसेवक / ग्रुप ग्रामपंचायत-मुळाणे,**
ता.दिंडोरी, जि.नाशिक **सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदाराची मुलगी नामे. **मंजिरी दत्तू जाधव** हिचा मौजे-संगमनेर, पो.मावडी, ता.दिंडोरी, जि.नाशिक या गावी सन-२००९ साली जन्म झालेला आहे,तिचे जन्माची नोंद ही सामनेवाले ग्रुप ग्रामपंचायत मुळाणे, ता. दिंडोरी, जि.नाशिक यांचेकडील जन्म-मृत्यू रजिष्टरला होणेकामी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे.कोर्टात जन्म-मृत्यू कायदा कलम १३ (३) प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वरील अर्जदार यांनी केलेल्या अर्जाबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून **एक (१)** महिन्यांचे आत अथवा **दि:०१/११/२०२४** सकाळी **११:३०** वाजता, दिंडोरी येथील मे.तहसिलदार सो. तहसिल कार्यालय,दिंडोरी, ता. दिंडोरी येथे हजर राहून लेखी हरकत नोंदवावी, सदरहू मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जाचे चौकशीचे काम पुढे चालविणेत येईल याची नोंद घ्यावी,ही जाहिर नोटीस, आज **दि.३०/८/२०२४** रोजी माझी सही व मे.कोर्टाचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केली..

**कनिष्ठ लिपिक**
**दिंडोरी, तहसील कार्यालय**

(शिक्का)

**तहसीलदार**
**दिंडोरी, तहसील कार्यालय**

## जाहीर नोटीस

**ॲड. एस.एम.पाटील**
**दिंडोरी न्यायालय, दिंडोरी**

**चौकशी अर्ज नंबर:९६/२०२४**

**दिंडोरी येथील महेरबान मा.कार्यकारी दंडाधिकारी,साहेब,दिंडोरी यांचे कोर्टात,**

**कु.अनिता अशोक लिलके,** **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म- मृत्यु नोंदणी अधिकारी,**
ग्रामपंचायत नाळेगांव,ता.दिंडोरी **सामनेवाले**

ज्याअर्थी **कु. अनिता अशोक लिलके** हिचा जन्म **मौजे.नाळेगांव,** ता. दिंडोरी, जि.नाशिक येथे दिनांक: ३०/०६/२००२ रोजी झालेला असुन, अर्जदाराचे आई- वडील हे अशिक्षित, आडाणी असल्याने त्यावेळी त्यांच्याकडून अर्जदार हिचे जन्माची नोंद ही ग्रामपंचायत नाळेगांव यांचेकडील जन्म रजिस्ट्ररला करण्याचे राहुन गेलेले आहे. परंतु अर्जदाराचे शालेय दप्तरी तशी नोंद करण्यात आलेली आहे,अर्जदाराने जन्म-मृत्यु कायदा कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांनी केलेल्या अर्जास कुणाचीही,कोणत्याही प्रकारे हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासून **एक (१)** महीन्याचे आत अथवा **दिनांक: २३/१०/२०२४** रोजी स्वतःअगर वकिलांमार्फत हजर होवुन लेखी हरकत नोंदवावी,मुदतीत कुणाची हरकत न आलेस पुढील आदेश केले जातील,याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली. **दि:०१/१०/२०२४.**

**लिपिक**
**तहसील कार्यालय, दिंडोरी**

(शिक्का)

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसील कार्यालय, दिंडोरी**

## जाहीर नोटीस

**ॲड. एस.एम.पाटील**

**चौकशी अर्ज नंबर:९५/२०२४**

**दिंडोरी येथील मेहेरबान मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब, दिंडोरी याचे कोर्टात.**

**श्री.अण्णा छबू चौधरी,** **अर्जदार**

**विरुद्ध**

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी,**
ग्रामपंचायत, पिंपरी-अचला,ता.दिंडोरी **सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार याच्या पत्नीचे नाव **सौ.वैशाली अण्णा चौधरी** मुलीचे नाव **कु. गायत्री अण्णा चौधरी** असे असून, अर्जदार याळच्या मुलीच्या जन्म **मौजे-पिंपरी-अचला**, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथे दिनांक:**११/०७/२०११** रोजी घरीच झालेला असून अर्जदार व त्याच्या कुटुंबियांकडून त्यावेळी मुलीच्या जन्माची नोंद अशिक्षित अडाणी व माहिती अभावी करण्याचे राहून गेलेले आहे,परंतु अर्जदाराचे शालेय दप्तरी तशी नोंद करण्यात आलेली आहे,अर्जदार यांनी त्यांचे मुलीच्या जन्माची नोंद जन्म-मृत्यू कायदा कलम १३-३ प्रमाणे जन्माची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे, त्याअर्थी अर्जदार यांनी केलेल्या अर्जास कुणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्धीपासून **एक (१)** महिन्याचे आत अथवा **दि:२३/१०/२०२४** रोजी स्वतःअगर वकिलामार्फत हजर राहून लेखी हरकत नोंदवावी,मुदतीत कुणाची हरकत न आलेस पुढील आदेश केले जातील याची नोंद घ्यावी सदरची नोटीस माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली **दि:०१/१०/२०२४**

**लिपिक**
**तहसील कार्यालय, दिंडोरी**

(शिक्का)

**तहसीलदार**
**तहसील कार्यालय, दिंडोरी**

## जाहीर नोटीस

**ॲड. एस.एम.पाटील**
**दिंडोरी न्यायालय, दिंडोरी**

**चौकशी अर्ज नंबर:९४/२०२४**

**दिंडोरी येथील महेरबान मा.कार्यकारी दंडाधिकारी, साहेब, दिंडोरी, यांचे कोर्टात,**

**कु.दर्शन बाळासाहेब जाधव,** **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी,**
ग्रामपंचायत, मोहाडी, ता. दिंडोरी, **सामनेवाले**

ज्याअर्थी मौजे-मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील कायमचा रहिवासी असून कुटूंबासह वास्तव्यास आहे. अर्जदार यांचे चुलते नामे.**रमेश जनार्दन जाधव** हे मोहाडी, ता. दिंडोरी, जि.नाशिक या गावी रहात असतांना आजारपणामुळे दिनांक: १२/११/२०१९ रोजी मयत झालेले असून अर्जदार व त्यांचे कुटूंबीयांकडून **कै.रमेश जनार्दन जाधव** यांचे **ता.१२/११/२०१९** रोजीच्या मृत्युची नोंद ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोहाडी यांचेकडील मृत्यु रजिस्ट्ररला करण्याचे राहून गेलेले आहे, अर्जदार यांनी त्यांचे पतीचे मृत्युची नोंद होणेकामी जन्म-मृत्यु कायदा कलम १३(३) प्रमाणे सदरचा अर्ज दाखल केला आहे,

त्याअर्थी अर्जदार यांनी केलेल्या अर्जास कुणाचीही,कोणत्याही प्रकारे हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन **एक (१)** महीन्याचे आत अथवा दिनांक: **२३/१०/२०२४** रोजी स्वतःअगर वकिलांमार्फत हजर होवुन लेखी हरकत नोंदवावी,मुदतीत कुणाची हरकत न आलेस पुढील आदेश केले जातील,याची नोंद घ्यावी, सदरची नोटीस माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली. **दि: ०१/१०/२०२४**

**लिपिक**
**तहसील कार्यालय, दिंडोरी**

(शिक्का)

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसील कार्यालय, दिंडोरी**

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ४१ ■ नाशिक, शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

## महत्त्वाचे

### किम जोंग-उन यांची आण्विक हल्ल्याची धमकी

**नवी दिल्ली :** उत्तर कोरियाचा हुकूमशाह किम जोंग-उनने अण्वस्त्र हल्ला करण्याची धमकी दिली आहे. दक्षिण कोरिया आणि त्यांचा मित्र अमेरिकेने मिळून प्योंगयांग प्रदेशावर हल्ला केला तर आमचं सैन्य कुठलाही संकोच न करता अण्वस्त्रांचा वापर करेल, किम जोंग-उन म्हणाला. एकीकडे इस्रायल-हमास, इस्रायल-लेबनॉनपाठोपाठ इस्रायल-इराण युद्ध पेटलं आहे. रशिया-युक्रेन संघर्ष देखील थांबलेला नाही. अशातच आता उत्तर कोरियाने दक्षिण कोरियाला अण्वस्त्र हल्ल्याची धमकी दिल्यामुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे की काय, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

### हिंदूंवरील अत्याचार थांबवा अमेरिकेत झळकला बॅनर

**न्यूयॉर्क :** बांगलादेशमध्ये हिंदूंवरील अत्याचाराबाबत भारताकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. आता या घटनेचे पडसाद अमेरिकेतही उमटले आहेत. अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील आकाशात एक मोठा बॅनर हवेत उडाताना दिसला. ज्यावर इंग्रजीत Stop Violence on Bangladeshi Hindus असे लिहिले होते. न्यूयॉर्क मधील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी या पुतळ्याजवळ आणि प्रसिद्ध हड्सन नदीजवळील आकाशात हा बॅनर उडताना दिसून आला. या घटनेचा व्हिडिओ आता जगभरात व्हायरल झाला असून या विषयाकडे लक्ष वेधून घेतले गेले आहे.

### ट्रॉलीला ट्रकची धडक; १० जणांचा मृत्यू

**मिर्झापूर :** उत्तर प्रदेशच्या मिर्झापूर येथे काल मध्यरात्री मजुरांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीचा भीषण अपघात झाला. या अपघातात दहा जण ठार तर तीनजण जखमी आहे. मिर्झापूर-वाराणसी सीमेवरील कछावन आणि मिर्झामुराद भागांदरम्यान जीटी रोडवर मध्यरात्री एकच्या सुमारास ही घटना घडली, असे पोलिस अधीक्षक (मिर्झापूर) अभिनंदन यांनी सांगितले. भदोही जिल्ह्यात बांधकामाच्या कामावरून परतत असलेल्या १३ मजुरांना घेऊन जात असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला चालकाच्या ट्रकने मागून धडक दिली.

### सलील अंकोला यांच्या आईचा संशयास्पद मृत्यू

**पुणे :** माजी क्रिकेटपटू सलील अंकोला यांच्या आईचा शुक्रवारी संशयास्पद मृत्यू झाल्याचे उघडकीस आले. मृत्यूमागचे निश्चित कारण समजू शकले नाही. या प्रकरणाचा सखोल तपास डेक्कन पोलिसांकडून करण्यात येत आहे. माला अशोक अंकोला, वय ७७ वर्षे असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. माला अंकोला माजी क्रिकेटपटू सलील यांच्या आई आहेत. त्या प्रभात रस्त्यावरील गल्ली क्रमांक १४ येथे आधी अपार्टमेंटमध्ये एकट्याच राहत होत्या. शुक्रवारी सकाळी त्या मृतावस्थेत पडल्याचे मोलकरणीने पाहिले.

### कारची दुचाकीला धडक आईसह लेकीचा मृत्यू

**लातूर :** औसा रस्त्यावर अपघातात आईसह ३ वर्षीय लेकीचा मृत्यू झाला आहे. भरधाव कारने एका दुचाकीला धडक दिली. या धडकेत एका महिलेसह तिच्या तीन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. कारमधील पाच जणांवर औसा पोलिसांनी मृत्यूस कारणीभूत ठरवत हलगर्जीपणाने कार चालवत आई आणि मुलीची हत्या केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ड्रिंक अँड ड्राइव्हमधून घडली असल्याचा पोलिसांना संशय आहे.

### तरुणीवर तिघांनी केला सामूहिक बलात्कार

**पुणे :** पुण्यातल्या बोपदेव घाट या भागात मित्रासह फिरायला गेलेल्या तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गुरुवारी रात्री २१ वर्षीय मुलगी तिच्या मित्रासह पुण्याजवळील बोपदेव घाटात फिरायला गेली होती. रात्री ११ च्या सुमारास ते तिथे गेले होते. मानवाधिकार संघटनेचे कार्यकर्ते असल्याचं कारण देत या दोघांचं तिघांनी अपहरण केलं. त्यानंतर तरुणाला बांधून ठेवत तरुणीवर सामूहिक बलात्कार केला.

# निर्णयांचा धडाका !

## अकृषिक कर माफ, लाडकी बहीण योजनेला मुदतवाढ

**मुंबई : विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी मंत्रिमंडळाकडून निर्णयांचा धडाका सुरू आहे. काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तब्बल ४१ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यात यापुढे अकृषिक कर पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. तर जैन समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येणार असून, नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील किकवी प्रकल्पाला मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेलाही मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे लाखो महिलांना दिलासा मिळाला आहे. तसेच गडकिल्ल्यांवर दारू, ड्रग्ज घेतल्यास २ वर्षांची शिक्षा आणि १ लाख दंड आकारला जाणार आहे.**



विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता पुढील आठवड्यात लागणार आहे. तत्पूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल (४ ऑक्टोबर) राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील वेगवेगळ्या विभागांतर्गत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ करणे, पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना गती, राज्यातील १०४ आयटीआय संस्थांचे नामकरण, जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे, कागल (कोल्हापूर) येथील सागावमध्ये नवीन शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय आणि महाराष्ट्र सागरी मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

यासह मुंबईतील वडाळा सॉल्ट पॅनमधील भूखंड शैक्षणिक कारणांसाठी देण्याचा आणि रमाई आवास, शबरी आवास योजनेतील घरकुल अनुदानात वाढ करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

**कॅबिनेट बैठकीतील निर्णय**

महसूल न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवणार, दौंड येथे बहुद्देशीय सभागृह नाट्यगृहासाठी शासकीय जमीन, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामास मान्यता, टेंभू उपसा सिंचन योजनेस दिवंगत अनिल बाबर यांचे नाव, पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना गती देणार, सिल्लोडमधील जमिनीला सिंचन, प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद, राज्यातील खेळाडूंसाठी पारितोषिक रक्कम वाढवली. राज्यातील आणखी १०४ आयटीआय संस्थांचे नामकरण, संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवणार, लहान जलविद्युत प्रकल्पांसाठी बांधा वापरा हस्तांतरण धोरण, कोकण, पुणे विभागासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्या, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणे, जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र भूजलाशयीन मच्छीमार कल्याणकारी महामंडळ, आजरा तालुक्यातील वेळवट्टी, /-.. ७



# मंत्रालयातील संरक्षक जाळीवर आदिवासी आमदारांच्या उड्या

## आ. नरहरी झिरवाळांसह तिघा लोकप्रतिनिधींचा पवित्रा

**मुंबई : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे वेळ देत नसल्याने विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह सत्ताधारी पक्षाच्या आदिवासी आमदारांनी थेट मंत्रालयातील संरक्षक जाळीवर उड्या मारल्याने मंत्रालयात अधिकारी वर्गाची मोठी धावपळ झाली. दरम्यान, या प्रकारानंतर तातडीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी बैठक घेऊन पेसा भरती न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

### राज ठाकरेंची संतप्त पोस्ट




राज ठाकरे यांनी या आंदोलनावर आपल्या तिखट शैलीत टीका केली आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवळ यांनी आणि इतर दोन आमदारांनी, आदिवासी समाजवर होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी मंत्रालयात संरक्षक जाळीवर उड्या मारून, म्हणे यांनी निषेध नोंदवला. हा कुठला निषेध?, असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. सत्तेशिवाय राहू शकत नाही, असं म्हणणं शक्य नव्हतं, म्हणून 'जनतेच्या सेवेला सत्ता हवी', म्हणत तुम्हीच आणि तुमच्या सरदाराने सत्तेच्या जाळ्यात उड्या मारल्या होत्यात ना?, असाही प्रश्न राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टमधून विचारला आहे.

आदिवासी समाजाच्या आरक्षणामध्ये धनगर समाजास सामील करू नये व पेसा भरती योजनांमध्ये आदिवासी समाजाला न्याय देऊन भरतीप्रक्रिया सुरू करण्यात /-.. ७

# अहमदनगर नव्हे, आता अहिल्यानगर

## केंद्र सरकारची नाव बदलला मंजुरी

**नवी दिल्ली : औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशीव आणि आता अहमदनगर जिल्ह्याचे अहिल्यानगर नामकरण झाले आहे. गेल्या वर्षी राज्य सरकारने नाव बदलण्याचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण करण्यात आले आहे. नगर जिल्ह्याचे नाव आता अहिल्यानगर करण्याला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.**




अहमदनगर जिल्हा आता अहिल्यानगर या नावाने ओळखला जाणार आहे. अहमदनगरचे नाव बदलण्याची अनेक दिवसांची मागणी होती. केंद्र सरकारने जिल्ह्याचे नाव बदलण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यात आनंदाची लाट पसरली आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याविषयीची माहिती दिली आहे. त्यांनी समाजमाध्यमावर ट्विट करत केंद्र सरकारचे आभार मानले आहे. औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, /-.. ७

### एस. जयशंकर पाक दौऱ्यावर जाणार!



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाहोरला २०१५ मध्ये अचानक भेट दिल्यानंतर देशभरात खळबळ उडाली होती. त्यानंतर ९ वर्षांनी पुन्हा एकदा परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर १५-१६ ऑक्टोबरला पाकिस्तानला भेट देणार आहेत. ते इस्लामाबादमध्ये बैठकीला उपस्थित राहणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गेल्या ९ वर्षांत भारतीय मंत्री पाकिस्तानला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ठाण्यात

# मोदींच्या दौऱ्यानिमित्त वाहतुकीत मोठे बदल, महत्त्वाचे रस्ते बंद, पार्किंग करण्यासही मनाई

**मुंबई : आगामी विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. त्यातच आता महिला सशक्तीकरण कार्यक्रमासह विविध प्रकल्पांच्या भूमिपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज ठाण्यात येत आहेत.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ठाण्यातील घोडबंदर रोड भागात दौरा आयोजित करण्यात आला आहे. घोडबंदर रोडवरील वालावलकर मैदानावर संध्याकाळी ४ वाजता भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यानिमित्ताने मोठी जय्यत तयारीही केली जात आहे. त्यासोबतच वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी ठाणे शहरातील वाहतूक मार्गांमध्ये बदल करण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ठाणे दौऱ्यासाठी पावसाचा अंदाज घेऊन मुख्य सभामंडपाच्या ठिकाणी भव्य तिहेरी आच्छादित तंबू उभारण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सभास्थानापासून ८०० मीटर अंतरावर तीन हेलिपॅड बनवण्यात आले आहेत. तसेच ४० हजारांपेक्षा जास्त नागरिकांच्या बसण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तसेच मैदानापासून काही अंतरावर १२ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था असणार /-.. ७

# हर्षवर्धन पाटलांचा अखेर भाजपाला रामराम

## शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणार

**सांगली : विधानसभा निवडणुकांपूर्वी भाजपामध्ये होणाऱ्या मेगाभरतीची जोरदार चर्चा होती. हर्षवर्धन पाटील यांनी ११ सप्टेंबर रोजी भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे काँग्रेसला इंदापुरात मोठा धक्का बसला.**

त्यानंतर बरोबर दोन वर्षांनी १३ ऑक्टोबर २०२१ ला हर्षवर्धन पाटील म्हणाले, भाजपात आल्यापासून आता शांत झोप लागते. आता बरोबर तीन वर्षांनी आणि पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकांच्याच आधी हर्षवर्धन पाटील यांनी भाजपाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची वाट धरली आहे. 'आता झोप लागते का?' असा प्रश्न पत्रकार परिषदेत विचारल्यावर त्यांचं उत्तर होतं 'नो कमेंट्स'!

जवळपास दीड महिन्यापासून प्रत्यक्ष चर्चा आणि त्याआधी अप्रत्यक्ष घडलेल्या घडामोडी



या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन पाटील लवकरच भाजपातून बाहेर पडतील असे सांगितले जात होते. भाजपाच्या नेत्यांकडून पाटील यांनी तसे काही सांगितले नसल्याचे धोरण /-.. ७

## राज्य मंत्रिमंडळाकडून अभिनंदन

# तीन ऑक्टोबर आता मराठी अभिजात भाषा गौरव दिन

**मुंबई : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल काल राज्य मंत्रिमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाचे अभिनंदन केले.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व इतर मंत्रिगण या बैठकीस उपस्थित होते. तसेच तीन ऑक्टोबर हा



दिवस यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

या संदर्भातील मंत्रिमंडळाचा ठराव मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी वाचून दाखवला. यात म्हटले आहे की, या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्य मंत्रिमंडळ पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार व्यक्त करते, तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या वतीने केंद्रीय मंत्रिमंडळाचे अभिनंदन करण्यात येत आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने भाषा संवर्धनाच्या दृष्टीने /-.. ७

# आरक्षणावरून भांडणे लावण्याचे काम

## खा. राऊतांची टीका : सरकार आल्यास आरक्षण वाढवणार

**नाशिक : प्रतिनिधी :**

**मिंधे सरकार आरक्षणावरून भांडण लावण्याचे काम करत आहे. केंद्राने आरक्षण वाढवून देण्याची गरज आहे. आम्ही वारंवार हेच सांगत आहोत. आमचं सरकार आले तर आम्ही ५० टक्क्यांच्या वरती आरक्षण देऊ. तात्काळ आरक्षण वाढवून सगळ्यांना न्याय दिला पाहिजे. तामिळनाडूमध्ये आरक्षण टाकलेला आहे. बिहारचे आरक्षण टिकले नाही, राज्य सरकारने देखील हा विषय केंद्राकडे न्यायला हवा. तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी भाजपाचे वस्त्र नेसून त्यांच्या घरात नांदायचं बाकी असल्याची खरमरीत टीका ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी केली.**

खा. राऊत खासगी कार्यक्रमानिमित्ताने नाशिकमधून जात असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला असता राज्य सरकारवर सडकून टीका केली.

पुढे ते म्हणाले, खाण्यापिण्यावरून हिंदुत्व आणि इस्लाम ठरत नाही. फडणवीस आणि मिंधेंनी बदलापुरात एन्काउंटर केले.

आता पुण्यातील घटनेतील आरोपीबाबतही तेच करावे. अल्पवयीन मुलीवर तिघे जण बलात्कार करतात. ही भयानक घटना आहे. त्यामुळे फडणवीसांनी आपल्या कमरेला जे पिस्तूल आहे ते त्यांनी काढावे आणि फोटोमधून बाहेर यावं.



फटा पोस्टर आणि निकला क्या खलनायक असं नाही चालणार.

सरकारने एन्काउंटर करावं, पोस्टरमधून त्यांनी बाहेर यावं. एकनाथ शिंदे भाजपात आहेत. त्यांचा शिवसेनेची काय संबंध. तात्पुरते त्यांनी लेबल लावले असून, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे नेते नरेंद्र मोदी आणि अमित शहा आहेत. ते भाजपमध्येच आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी तोडायची होती. त्यामुळे त्यांचा वापर केला. बारामतीमध्ये अजित पवार यांची परिस्थिती फारशी चांगली नाही. तसेच आमच्याकडे असताना पालकमंत्र्यांना शक्तिप्रदर्शन करण्याची गरज नव्हती, असे म्हणत खा. राऊत यांनी ना. दादा भुसे यांना टोला मारला.

# रेल्वेच्या खासगीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही

## नाशकात रेल्वेमंत्र्यांची स्पष्टोक्ती

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतीय नागरिकांचा रेल्वे प्रवास सुरक्षित करण्याबरोबरच रेल्वेचा वेग वाढवणे हे आपल्या सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रेल्वेच्या खासगीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच सामान्य नागरिकांसाठी रेल्वेच्या सुविधा वाढवण्यासाठी सरकार काम करत असल्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

काल रेल्वेमंत्री नाशिकमध्ये आले असताना त्यांनी नाशिकमध्ये माध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, रेल्वेच्या खासगीकरणाचा प्रश्नच उदभवत नाही. उलट सरकार सर्वसामान्यांसाठी रेल्वे अधिक सोयीस्कर कशी बनवता येईल यासाठी काम करत आहे. देशातील सामान्य नागरिकांनी अवघ्या ४०० रुपयांमध्ये लक्झरी सुविधांचा लाभ घेत १,००० कि.मी.पर्यंतचा प्रवास करावा, हे आमचं उद्दिष्ट आहे. त्यासाठीचा रोडमॅप आम्ही तयार केला आहे.

# कृषी विज्ञान संकुलाच्या माध्यमातून घडणार शेतकऱ्यांची सेवा : मुख्यमंत्री शिंदे

## दूरध्वनीवरून साधला संवाद; पालकमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते कृषी विज्ञान संकुलाचे लोकार्पण



**नाशिक/मालेगाव : प्रतिनिधी**

**तालुक्यातील काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सेवा घडेल, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कृषी विज्ञान संकुलाच्या पहिल्या टप्प्याच्या लोकार्पण सोहळ्यास दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाचे पहिल्या टप्प्याचे लोकार्पण पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत झाले. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दूरध्वनीवरून संवाद साधला.**

या कार्यक्रमास खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार किशोर दराडे, मंजुळताई गावित, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे, महानगरपालिका आयुक्त रवींद्र जाधव, अपर पोलिस अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय अधिकारी नितीन सदगीर, कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. सचिन नांदगुडे, तहसीलदार विशाल सोनवणे, तालुका कृषी अधिकारी भगवान गोर्डे यांच्यासह अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यामातून विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुल पाहण्यासाठी निश्चित येऊन नागरिकांशी लवकरच संवाद साधू, असेही त्यांनी दूरध्वनीवरून शुभेच्छा देताना सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध होणार असून, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापकांकडून मिळणार आहे. तसेच कृषी विज्ञान संकुल हे कृषी पंढरी म्हणून नावारूपास येणार असून, विद्यार्थी, शेतकऱ्यांसह उत्तर महाराष्ट्रास मार्गदर्शक केंद्र ठरेल, असे पालकमंत्री दादाजी भुसे यावेळी म्हणाले.

पालकमंत्री श्री. भुसे पुढे म्हणाले, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत वर्ष २०२०-२१ मध्ये मालेगाव तालुक्यातील काष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाची स्थापना झाली. देशातील एकमेव संकुल आहे की, यामध्ये एकाच ठिकाणी ५ कृषी व संलग्न महाविद्यालय व १ कृषी तंत्रनिकेतन सुरू झाले आहे. या संकुलातील महाविद्यालयांमध्ये प्रत्येक वर्षी ३०० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. एकूण १२०० ते १३०० विद्यार्थी एकाच वेळेच कृषी व संलग्न पदवीचे शिक्षण घेणार आहेत. संकुलात एकूण ५०० ते ६०० अधिकारी/कर्मचारी कार्यरत असणार आहेत. येणाऱ्या काळात विद्यार्थी येथे कृषीविषयक प्रगत तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन यशस्वी होतील. छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाच्या दुसऱ्या टप्प्याचे कामही प्रगतीपथावर असून, लवकरच पूर्ण केले जाणार असल्याचे मंत्री श्री. भुसे यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील कृषी शिक्षणाचा आदर्श परिसर म्हणून विकसित करणे, राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषीविषयक समस्यांचे वैज्ञानिकदृष्ट्या अध्ययन करून कृषी विस्तार तंत्रज्ञानाद्वारे त्यांचा प्रचार-प्रसार करणे तसेच शेतकऱ्यांच्या समस्या बांधावर जाऊन सोडविणे हाच कृषी विज्ञान संकुल स्थापनेमागचा मूळ उद्देश आहे. भविष्यात कृषी व संलग्न शाखांचे पदव्युत्तर पीएच.डी पदवी अभ्यासक्रम देखील या कृषी विज्ञान संकुलात सुरू करण्याचे प्रस्तापित करण्यात आलेले आहे.

नार-पार हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, यासाठी ७.५० हजार कोटींचा निधी प्रस्तावित आहे. येणाऱ्या पाच ते सात वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होणार असून, पाण्याची समस्या कायमस्वरूपी निकाली निघणार आहे. मालेगाव शहरात महिला व बालकल्याण रुग्णालयाचे लोकार्पण झाले असून, या रुग्णालयात १७ दिवसांत ३१२ महिला रुग्णांना उपचार देण्यात आले आहेत. मुंबई येथील रुग्णालयांच्या धर्तीवर या रुग्णालयात उच्च प्रतीच्या आरोग्य सुविधा देण्यात येत आहेत. संजय गांधी निराधार योजनेचा शहरी व ग्रामीण भागातून ७१ हजार ५०० लाभार्थ्यांना लाभ प्रदान करण्यात आला आहे.

### शेतकऱ्यांना होणार फायदा

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार इ. जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये फळपिके व इतर भाजीपाला पिकांची लागवड केली जाते. यामध्ये प्रामुख्याने द्राक्ष, डाळिंब, केळी, तसेच कापूस हे महत्त्वाचे पिके आहेत. या सर्व पिकांचे अत्याधुनिक तंत्रज्ञान यंत्रसामग्रीचा वापर करून शेतकरी बांधवांचे जास्तीत जास्त उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

### विद्यार्थ्यांना या करिअर संधी :

■ पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी देशातील नामांकित विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवीचे शिक्षण घेऊ शकतात. ■ देशातील IIMs, IITs आणि केंद्र व विविध राज्यातील कृषी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण. ■ कृषी क्षेत्रातील पदवी / पदव्युत्तर पदवी/आचार्य शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना कृषी विद्यापीठे, कृषी विभागातील विविध पदे, बँकिंग, पणन, स्थानिक स्वराज्य संस्था इ. तसेच कृषी व संलग्न क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एनजीओ खासगी कंपन्या इ. ठिकाणी नोकरी करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. ■ केंद्रीय लोकसेवा आयोग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध प्रशासकीय विभागात वर्ग १ ते ३ मध्ये नोकरीच्या संधी. ■ खासगी कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी. ■ कृषीचे शिक्षण घेऊन विद्यार्थी शेतीपूरक विविध व्यवसाय सुरू करू शकतात. ■ परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत.

### कृषि विज्ञान संकुलामध्ये या आहेत सोयी-सुविधा

■ सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेले सुसज्ज वसतिगृह. ■ वसतिगृहामध्येच सहकारी तत्वावर भोजनालय ■ उच्च शिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्ग. ■ आधुनिक तंत्रज्ञानयुक्त वर्गखोल्या ■ विद्यार्थांना प्रत्येक विषयांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त प्रयोगशाळा ■ अभ्यासासाठी सर्व विषयांचे पुस्तके उपलब्ध असलेले ग्रंथालय. ■ संपूर्ण परिसरात इंटरनेट सुविधा ■ विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी २४ तास वाचन कक्ष ■ विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन. ■ प्रवेश घेतल्यानंतर ते पदवी पूर्ण होईपर्यंत एका प्राध्यापकाची विद्यार्थ्यांसाठी समुपदेशक पदी नियुक्ती करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच दैनंदिन अडचणी इत्यादी गोष्टींसाठी मार्गदर्शन. ■ विद्यार्थ्यांसाठी क्रीड़ा स्पर्धांचे आयोजन. ■ उत्कृष्ट खेळाडूना भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी. ■ अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक सहलींचे / अभ्यास दौऱ्यांचे आयोजन. ■ विद्यार्थ्यांना विविध कृषि व पूरक उद्योग/ कंपन्यांना, कृषि प्रदर्शनांना भेटी देण्याचे आयोजन. ■ स्पर्धा परीक्षांच्या तयारी करीता व्याख्यानांचे आयोजन. ■ उद्योजकता व नोकरीच्या संधी उपलब्ध करण्यासाठी विशिष्ट कक्ष (ढीरळपळपस रपव झश्ररलशाशपीं उशश्रश्र). ■ वार्षिक सांस्कृतिक स्नेह-संमेलन तसेच पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन, ■ विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासासाठी विवध विषयांच्या अतिथींची व्याख्याने. ■ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करण्यासाठी प्रक्षेत्राची सुविधा. ■ शेवटच्या वर्षातील विद्यार्थांसाठी एड्झ कार्यक्रम. ■ शेवटच्या वर्षातील विद्यार्थांसाठी प्रत्यक्ष शेतीचा अनुभव घेण्यासाठी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम.

# गणेश गितेंच्या होर्डिंगजची अज्ञात टवाळखोरांकडून चिरफाड

**पंचवटी : वार्ताहर**

**आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्थायी समितीचे माजी सभापती गणेश गिते यांच्याकडून नागरिकांना शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज पूर्व विधानसभा मतदारसंघात ठिकठिकाणी लावण्यात आले आहे. मात्र, काही टवाळखोरांकडून होर्डिंग्जची चिरफाड करण्यात आल्याने सण-उत्सवाला धार्मिक रंग देण्याचा प्रकार होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.**

सध्या शारदीय नवरात्रोत्सव सुरू असून, यानिमित्ताने मनपाचे माजी स्थायी समिती सभापती गणेश गिते यांनी नवरात्रोत्सवाच्या आणि दसऱ्याच्या शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज पंचवटी परिसरातील मखमलाबाद रोड, हिरावाडी, पंचवटी कारंजा, फुलेनगर, दिंडोरी रोड आदी भागात लावलेले आहे. गणेश गिते हे नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता असल्याने राजकीय घमासान होण्यास यानिमित्त सुरुवात झाल्याचे दिसून येत असून, निवडणुकीपूर्वीच गणेश गिते यांनी लावलेल्या होर्डिंग्जवरील गितेंचा फोटो अज्ञात टवाळखोरांनी फाडल्याने धार्मिक वातावरणास राजकीय रंग देण्याचे काम सुरू असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच ही सर्व घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागल्याने गणेश गिते हे नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघातून प्रबळ दावेदार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. मात्र, अशा पद्धतीने निवडणुकीआधीच गितेंचा होर्डिंग्जवरील फोटो फाडल्याने पुढील काळात वातावरण चिघळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मखमलाबाद रोड, आरटीओ कॉर्नर, ड्रीम कॅस्टल, रासबिहारी रोड, पंचवटी कारंजा, फुलेनगर, दिंडोरी रोड या रस्त्यावरील अनेक बॅनरवरील गितेंचे फोटो फाडण्यात आले असून, होर्डिंग्ज फाडणारे तरुण सीसीटीव्हीमध्ये स्पष्टपणे दिसत आहेत. याबाबत कुठलीही तक्रार दाखल करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. मात्र, आता पोलीस या टवाळखोरांवर काय कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

### अनधिकृत होर्डिंग्जचा प्रश्न ऐरणीवर

शहर आणि परिसरात वाढदिवसाच्या तसेच निवड, नियुक्ती, सण-उत्सवाच्या शुभेच्छा देणाऱ्या अनधिकृत होर्डिंग्जमुळे शहराचे विद्रुपीकरण तर होतेच. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नावर देखील परिणाम होतो. मात्र, मनपाच्या जाहिरात, कर (एमटीएस) विभागाचे का दुर्लक्ष होते हाही प्रश्न पडतो. शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंग्जचे पेव फुटले असताना मनपाच्या संबंधित विभागाकडून का डोळेझाक केली जाते, असाही प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.

### कुठलीही तक्रार दाखल नाही

होर्डिंग्ज फाडल्याबाबतची तक्रार कुणीही पंचवटी पोलिस ठाण्यात दिलेली नाही. तसेच संबंधितांनी देखील होर्डिंग्ज लावण्यासंदर्भात पंचवटी पोलीस स्टेशनकडून परवानगी घेतलेली नाही. पंचवटी पोलीस स्टेशनकडून अनधिकृत बॅनर काढण्याबाबत महानगरपालिकेस पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.




पान नं. १ वरून...

## निर्णयांचा धडाका!

गवसे, घाटकरवाडी येथे बंदिस्त पाईपलाईन टाकणार, बंजारा, लमाण तांड्यात ग्रामपंचायतसाठी लोकसंख्येची अट शिथिल, कागल येथील सागावमध्ये नवीन शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, महाराष्ट्र सागरी मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करणार, कुडाळ तालुक्यातील डोंगरेवाडीत साठवण तलाव, बारी, तेली, हिंदू खाटीक, लोणारी समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना कायमस्वरूपी राबवणार २,६०४ कोटीस मान्यता, राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क स्थापन करणार १ लाख ६० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित,उच्च तंत्रज्ञानावरील अतिविशाल प्रकल्प योजनेत सुधारणा अधिकाधिक प्रकल्पांना प्रोत्साहन, राळेगणसिद्धी येथील उपसा सिंचन योजनेचे सक्षमीकरण, शिरोळ तालुक्यातील गावांमध्ये भूमिगत चर योजना राबवणार, बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांना दहा लाखांपर्यंत अनुदान योजना, सोलापूर ते मुंबई हवाई मार्गासाठी व्हायबिलिटी गॅप फंडिंग देणार, वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देणार, डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना, वडाळा सॉल्ट पॅनमधील भूखंड शैक्षणिक कारणांसाठी, रमाई आवास, शबरी आवास योजनेतील घरकूल अनुदानात वाढ. आदी निर्णय घेण्यात आले.

## आदिवासी आमदारांच्या उड्या

यावी या प्रमुख मागणीसाठी मुंबई येथील मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट निष्फळ ठरल्यानंतर दुसऱ्यांदा मुख्यमंत्री भेट देत नसल्याने विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह भाजप खासदार हेमंत सावरा,पवार गटाचे आमदार सुनील भुसारा, किरण लहामटे या तिघांनी मंत्रालयाच्या संरक्षण जाळीवर उड्या मारल्याने मंत्रालयातील अधिकारी वर्गाची मोठी धावपळ उडाली होती. मुख्यमंत्र्यांनी आम्हास वेळ देता येत नसल्यास किंवा आमच्या समस्या ऐकत नसतील तर आमच्याकडे प्लॅन बी तयार आहे, असे विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी म्हटले होते. तसेच आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये ही मूळ मागणी आदिवासी खासदार व आमदार यांची आहे, त्यांनतर नरहरी झिरवाळ यांची प्रकृती बिघडली. मागील पंधरा दिवसापासून आदिवासी विद्यार्थी पेसा अंर्गत भरती करा या मागणी साठी ठीकठिकाणी आंदोलन केले आहे

## अहमदनगर नव्हे, आता अहिल्यानगर

उस्मानाबादचे धाराशीव आणि आता अहमदनगर जिल्ह्याचे अहिल्यानगर नामाकरण झाले आहे.

### केंद्रीय मंत्रिमंडळाचा ग्रीन सिग्नल

अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर असे करण्याची मागणी गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात येत होती. औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे नाव बदलल्यानंतर अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलण्याच्या मागणीला जोर चढला. गेल्या वर्षी चोंडी येथे झालेल्या अहिल्यादेवींच्या जयंती दिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलण्याची घोषणा केली होती. त्यांनी जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी नाव देण्याची घोषणा केली होती. अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने अगोदरच केंद्र सरकारकडे पाठवला होता. आता ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर या मागणीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. केंद्र सरकारने राज्य सरकारच्या प्रस्तावाला ग्रीन सिग्नल दिला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूरी दिली. राज्याचे महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोशल मीडियावर याविषयीची माहिती दिली. नगर जिल्ह्याचे नामांतर अहील्यानगर करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजूरी दिली. मंत्रीमंडळाच्या बैठकीत जिल्ह्याचे नामकरण अहील्यानगर करण्यास मान्यता मिळाल्याने वचनपूर्ती झाल्याचा मनस्वी आनंद आहे. निर्णय होण्याकरीता सहकार्य करणारे नगर जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजूरी दिली. आज केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर करण्यास मान्यता देण्यात आली. त्यामुळे महायुती सरकारने दिलेल्या वचनपूर्तीचा मनस्वी आनंद होत असल्याची प्रतिक्रिया महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

## मोदींच्या दौऱ्यानिमित्त वाहतुकीत मोठे बदल

आहे. पंतप्रधान मोदी सशक्तीकरण अभियान कार्यक्रमासह ठाण्यातील अंतर्गत मेट्रो, नवीन महापालिका मुख्यालय, नैना पायाभूत सुविधा प्रकल्प यांचे भूमिपूजन करणार आहेत.

## हर्षवर्धन पाटलांचा अखेर भाजपाला रामराम

अगदी काल-परवापर्यंत कायम ठेवले नसले तरी याबाबत आपण देवेंद्र फडणवीसांशी चर्चा करून त्यानंतर निर्णय घेतल्याचं हर्षवर्धन पाटील यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. त्यामुळे त्यांच्यात आणि पक्षाच्या राज्यातील नेत्यांमध्ये याबाबत चर्चा झाल्याचं आता स्पष्ट झाले आहे.

पाच वर्षांपूर्वी निवडणुकांच्या आधी पाटील यांनी मतदारसंघाची कामं व नागरिकांसाठीच्या योजनांचा हवाला देऊन भाजपामध्ये प्रवेश केला होता. पण गेल्या काही महिन्यांपासून हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी मिळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. शिवाय तीन पक्ष सत्ताधारी गटात असल्यामुळे तिथे इच्छुकांची संख्याही तिप्पट झाली आहे. त्यामुळे हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीबाबत अनिश्चितता वाटू लागली होता. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी आपले पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भाजपाला सोडचिठ्ठी दिली आहे. मात्र, यावेळी पत्रकार परिषदेत त्यांच्याच 'झोप चांगली लागते' विधानाबाबत विचारणा केली असता त्यावर त्यांनी फक्त 'नो कमेंट्स' म्हणत कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

## आता मराठी अभिजात भाषा गौरव दिन

मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे. प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांचे बळकटीकरण, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थ्यांना भरीव मदत करणे या गोष्टी साध्य होणार असल्याचेही प्रा. पठारे यांच्या समितीने नमूद केले आहे.

# राजकीय दबावामुळे रेल्वेमंत्र्यांनी अचानक बदलला 'ट्रॅक'

## महात्मा गांधी संस्थेच्या कार्यक्रमाला येणे टाळले!

**नाशिक : प्रतिनिधी**



**खुद्द रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी तारीख निश्चित केल्यानंतर महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातर्फे काल युवा शक्ती फॉर विकसित भारत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची घटिका समीप आली असतानाच व सर्व जय्यत तयारी पूर्ण झाली असतानाच अचानक माशी शिंकली अन् रेल्वेमंत्र्यांचा दौरा रद्द झाल्याचा निरोप संस्थेला आला. त्यामुळे संस्थेला ऐनवेळी कार्यक्रमच रद्द करण्याची नामुष्की ओढावली. पण रेल्वेमंत्र्यांचा दौरा रद्द झालाच नव्हता. केवळ या कार्यक्रमाला उपस्थित राहावयाचे नसल्याने दौरा रद्दची बातमी पेरण्यात आली. यामागे काही हिरे विरोधकांनीच मंत्र्यांना या कार्यक्रमाला न येण्यासाठी दबाव आणल्याची चर्चा रंगली आहे.**

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था ही भाऊसाहेब हिरे यांनी स्थापन केली. सध्या या संस्थेचे सूत्रे हिरे घराण्याची पुढील पिढी म्हणजेच माजी आमदार अपूर्व हिरे हे सांभाळत आहेत. अपूर्व हिरे हे पूर्वाश्रमीचे भाजपात होते. मात्र सध्या भाजपापासून ते काहीसे दूर आहेत. तर त्यांचे बंधू अद्वय हिरे यांनी काही महिन्यांपूर्वी भाजपा सोडत ठाकरे गटात प्रवेश केला. त्यानंतर त्यांना एका प्रकरणात अटक झाली आणि बरीच महिने तुरुंगात रहावी लागली. अपूर्व हिरे हे सध्या शरद पवार गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा आहेत. असे असले तरी संस्थेने जो कार्यक्रम आयोजित केला होता तो केंद्रीय मंत्रालयाशी संबंधित होता. नेहरू युवा संघठन यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या या कार्यक्रमासाठी तब्बल अडीच हजार युवकांना आमंत्रित करण्यात आले होते.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह देखील त्यासाठी बुक करण्यात आले होते. सर्वांची भोजनाची व्यवस्थाही होण्यासाठी केटरर्सना ऑर्डर दिली गेली होती. मात्र, अचानक गुरुवारी रात्री मंत्री येणार नसल्याचा निरोप देण्यात आला अन् हा कार्यक्रमच रद्द करण्याची नामुष्की संस्थेवर आली. वास्तविक हा कार्यक्रम युवकांशी संबंधित आणि अराजकीय होता. मात्र, हिरेंबरोबर काही मंडळींशी असलेल्या राजकीय स्पर्धेमुळे भाजपाच्याच काही मंडळींनी मंत्री वैष्णव हे या कार्यक्रमाला येऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात आल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, रेल्वेमंत्री खास या कार्यक्रमाला येणार होते. त्याप्रमाणे ते नाशिकमध्ये आलेदेखील.

पण रेल्वे सुरक्षा बलाच्या कार्यक्रमाला हजेरी लावत त्यांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. सामाजिक आणि युवकांच्या कार्यक्रमातही अशा प्रकारचे राजकारण आणून युवकांचा हा कार्यक्रम हाणून पाडल्याची चर्चा मात्र काल रंगली होती.

## शाळेत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पुणे :** खराडी भागातील एका शाळेत पीडित मुलगी तिसरीत आहे. १ ऑक्टोबर रोजी मुलीची आई तिला घरात चांगल्या आणि वाईट स्पर्शाबाबत (गुड टच आणि बॅड टच) माहिती देत होती. त्यावेळी मुलीने शाळेतील संजय सर नावाच्या एका व्यक्तीने प्रसाधनगृहाच्या बाहेर वाईट पद्धतीने स्पर्श केल्याचे मुलीने आईला सांगितले. केल्याचे आईला सांगितले.

घटनेचे गांभीर्य ओळखून त्वरीत पोलिसांच्या दामिनी पथकाला याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी त्वरीत गुन्हा दाखल करून घेत आरोपीचा शोध सुरू केला आहे. मुलीला शाळेतील शिक्षकांची छायाचित्रे दाखविण्यात आली. मात्र, अश्लील कृत्य करणारी व्यक्ती दुसरी असल्याचे तिने सांगितले. पोलिसांनी शाळेतीली सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले आहे.

## अल्पवयीन भाचीचा मामाकडून विनयभंग

**सिडको : विशेष प्रतिनिधी भाचीला समजावून सांगण्याच्या बहाण्याने बेडरूममध्ये घेऊन जात तिचा विनयभंग करणाऱ्या मामाला अंबड पोलिसांनी अटक केली आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की पीडित अल्पवयीन मुलगी ही तिच्या आजीच्या घरी आली होती. त्यावेळी ही पीडित मुलगी तिच्या आईशी बोलत होती. तेव्हा आरोपी संतोष जगताप हा तेथे आला. त्याने या पीडित मुलीला समजावून सांगण्याचा बहाणा करून बेडरूममध्ये नेले व तिच्याशी लगट करून तिचा विनयभंग केला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात पीडित मुलीच्या फिर्यादीनुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला असून, मामाला अटक केली आहे.

## अखंड मशालीसह शिवसेना उबाठाचा हायटेक दांडिया

**इंदिरानगर : वार्ताहर**

**उबाठा गटाच्या माध्यमातून मशाल पेटवत नवरात्र महोत्सवाला सुरुवात केली. जिल्हाध्यक्ष सुधाकर बडगुजर यांच्या हस्ते प्रज्वलन सप्तशृंगगडावरून आणलेल्या मशालीचे प्रज्वलन करण्यात आले. शेरावाली मातेची मूर्ती स्थापित करून घट बसवण्यात आला.**



**इंदिरानगर : सप्तशृंगगडावरून आणलेली मशाल नेताना उबाठा जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते. (छाया : बाबा खरोटे)**

गेल्या दोन वर्षांपासून गामणे मैदानावरील दांडिया कार्यक्रम आयोजनाची पद्धती व तरुण - तरुणींची गर्दी यामुळे चर्चेत होता. यंदा मात्र जागेच्या वादामुळे चर्चेला आला. शिंदे गट व ठाकरे गट या दोघांनीही दांडियासाठी या जागेची मागणी केली होती. विशेष म्हणजे मनपाने दोघांनाही परवानगी दिल्याने नवा पेच निर्माण झाला होता. परंतु आपापसात चर्चा करून समंजस्यची भूमिका घेत ठाकरे गटाला जागा दिल्याने ठाकरे गटाच्या वतीने भव्य दांडियाचे आयोजन केले आहे.

उबाठाने कमी अवधीमध्ये भव्य स्टेज उभारून दांडियाप्रेमींचा उत्साह वाढवला आहे. या ठिकाणी बक्षिसांची खैरात केली जाणार असून, सिने, नाट्य क्षेत्रातील कलाकारांची माहिती देण्यात आली आहे.

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण मैदान भर, मैदानाबाहेरही सीसीटीव्हीची करडी नजर असणार आहे. तर महिला बाऊन्सर ही या ठिकाणी पाचारण करण्यात आले आहे. सोनू शिरसाट, विजय शिरसाट, महेश शिरसाठ आदींनी वणी सप्तशृंगगडावरून आणलेली मशाल ज्योत प्रज्वलित ठेवण्यात येणार आहे.

यावेळी महानगरप्रमुख विलास शिंदे, उपजिल्हाप्रमुख देवानंद बिरारी, माजी नगरसेवक डी. जी. सूर्यवंशी, कार्यक्रमाचे संयोजक उपमहानगरप्रमुख विनोद दळवी, नीलेश साळुंखे, युवा जिल्हाप्रमुख बाळकृष्ण शिरसाठ, महानगर समन्वयक त्र्यंबक कोंबडे, मदन ढेमसे, रवींद्र गामणे तसेच पश्चिम विधानसभा विस्तारक सचिन राणे, सुभाष गायधनी, नाना पाटील, धनंजय गवळी, शारदा दोंदे, श्रुती नाईक, संदेश एकमोडे, दादा मेढे आदींसह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

### चुकीची दुरुस्ती

दै.गावकरी या वर्तमान पत्रात दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी पान क्र.४ वर ॲड.आर.पी. दुशींग यांचे अर्जदार कलीम गुलाब हुसेन शेख व शकील अहमद मिरावल यांचे रांजणगाव देशमुख तालुका कोपरगाव यांचे गट क्र.१३६/१ क्षेत्र ९ हे.३१ आर.ची नोटीस प्रसिद्ध झाली असून त्यातील दुसऱ्या अर्जदाराचे नाव चुकून अकील अहमद मिरवल असे झाले आहे ते **शकील अहमद मिरावल** असे वाचावे.

### जाहीर नोटीस

मी खाली सही करणार **श्रीमती कमलाबाई राजाराम पवार** आज दि.०५/१०/२०२४ रोजी जाहीर करते की, माझे पती **कै.राजाराम गोविंदा पवार** यांचे **दि.२१/०६/२०२१** रोजी निधन झाल्याने त्यांच्या नावे असलेले वाहन **MARUTI ALTO LXI BSIII** क्र. **MH-15CD9866** माझ्या नावावर हस्तांतरण करणेकामी मी श्रीमती कमलाबाई राजाराम पवार, रा. पो.भोरमाळ, ता. सुरगाणा, जि.नाशिक-४२२२११ वारसदार (पत्नी) म्हणून मी प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर वाहन हस्तांतर करणेकामी कोणाची काही हरकत असल्यास **७ (सात)** दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवो, अथवा मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. कळावे.

**सही/-**
**श्रीमती कमलाबाई राजाराम पवार**

**ग्रामपंचायत दिंडोरी (तास), ता. निफाड, जि. नाशिक.**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०२/२०२३-२४ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत दिंडोरी (तास), ता. निफाड, जि.नाशिक येथील ग्रामपंचायत दिंडोरी (तास) येथे सार्वजनीक विहीरिस सौर ऊर्जा प्रणाली बसवणे (४,१७,११७/-) या कामाकरिता ई - निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे. निविदा भरण्याची दिनांक ०३.१०.२०२४ ते ०९.१०.२०२४ आहे. अधिक माहिती वरील वेबसाईट वर उपलब्ध असून निविदाधारकांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत दिंडोरी (तास), ता. निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**सही/- प्रशासक** **ग्रामविकास अधिकारी**
**ग्रा.पं. सदस्य**
**ग्रामपंचायत दिंडोरी (तास), ता. निफाड, जि. नाशिक**

### टायटल व्हेरिफ़ीकेशन कामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगर पालिका हद्दीतील **मौजे नाशिक शहर** येथील **स. नं. १९२/१/४५** वर बांधलेल्या "**हिंगलाज अपार्टमेंट**" या प्रकल्पातील तळ मजल्यावरील **फ्लॅट नं. ०२ यांसी क्षेत्र १७.३२ चौ.मी.** अशी मिळकत **श्रीमती गंगाबाई लालजी शर्मा** यांचे मालकीची असून त्यांनी सदरची मिळकत आमचे पक्षकारास विक्री करण्याचे ठरविलेले आहे व त्यानुसार त्यांनी विसार स्वीकारलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध आहे असे त्यांनी खात्रीपूर्वक सांगितलेले आहे. सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सबब वरील मिळकतीवर कोणाचाही काही गहाण, दान, कर्ज, जामिनकी, विसारपावती, साठेखत, बक्षीसपत्र अथवा कोर्ट दावा वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०५ (पाच)** दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही काही एक हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. नंतर कोणाचीही काहीही तक्रार किवा पत्र व्यवहार चालणार नाहीं तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द केलेल्या हरकती आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही कळावे ही जाहीर नोटीस.

दिनांक : ०३/१०/२०२४

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. विनय श्रीचंद जैन ॲडव्होकेट**
**श्रमसाफल्य, स्नेह नगर, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४ मो.क्र.९२२६७१२२७१**

### जाहिर नोटीस

**(मौजे नाशिक यासी स.नं. ८०७/१/२/५ ते ७/प्लॉट नं. ६ यांसी एकुण क्षेत्र ६७५.५० चौ.मी. पैकी २५६.५० चौ.मी. असे रस्त्यालगतच्या नाल्याखालिल क्षेत्र ३१५x३x३ मीटर असा बांधिव बॉक्स कलव्हर्ट कामी कन्स्ट्रक्शन ॲमेनिटीनुसार टी.डी. आर. मिळणेबाबत)**

तमांम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे नाशिक यासी स.नं. ८०७/१/२/५ ते ७/प्लॉट नं. ६ यासी एकुण क्षेत्र ६७५.५० चौ.मी. असून, त्यापैकी २५६.५० चौ.मी. ही मिळकत झिल इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. व सन इनफ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. यांच्या मालकीची आहे व सदर मिळकत मालकांनी नाशिक महानगरपालिकेने मंजुर केलेल्या नकाशानुसार संपुर्ण बांधकाम केलेले असुन पुर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला आहे.

**नाशिक महानगरपालिकेच्या युडीसीपीआर (UDCPR)-२०२० मधील नियम क्र. ११.२.५ अन्वये बांधिव व विकसित केलेल्या ॲमेनिटी आणि विनामोबदला हस्तांतरित केलेल्या मिळकतीबाबत कन्स्ट्रक्शन ॲमेनिटी टी.डी. आर. कामी उपरोक्त मिळकत मालकांनी सदर मिळकतीच्या अभिन्यासातील रस्त्यालगतच्या नाल्याखालील क्षेत्र ३१५x३x३ मीटर असे बांधिव बॉक्स कलव्हर्ट पुर्ण करुन नाशिक महानगरपालिकेचे संबंधित विभागाकडुन ना हरकत दाखला दि. २१/१०/२०१६ रोजी प्राप्त केलेला आहे आणि या अनुषंगाने मिळकत मालक तसा प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेकडे दाखल करणार आहेत.**

उपरोक्त क्षेत्र हे निर्वेध व बोजारहित असल्याचे वरील मिळकत मालकांनी सांगितलेले आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेला विनामोबदला हस्तांतरित केलेल्या बांधिव बॉक्स कलव्हर्ट केलेला नाला क्षेत्रासंबंधाने मिळणा-या कन्स्ट्रक्शन ॲमेनिटी टी.डी. आर. बाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी खालिल नमुद पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांपावेतो मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी, मुदतीनंतर आलेल्या तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या हरकतीस उपरोक्त मिळकतीवर तसेच आमचे पक्षकारांनी केलेल्या व्यवहारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहिर नोटीस.

**दिनांक: ०१/१०/२०२४**

**सही/- ॲड. रेवती महेंद्र कोतवाल**
**४, भास्कर बंगला, संकलेचा हॉस्पिटलजवळ, गोविंद नगर, नाशिक-९. मोबा. ९४२२७५४४४३**

### जाहिर नोटीस

**(मौजे नाशिक यासी स.नं. ५६७/१, ५६७/२, ५६७/३ यांसी फायनल प्लॉट नं. ६० यासी एकुण क्षेत्र ६८३२.०० चौ.मी. पैकी अकोमोडेशन रिझर्व्हेशन क्र.३४९ आणि ३५० यासी वाहनतळ आणि पोलिस चौकी कामी कन्स्ट्रक्शन ऑफ ॲमेनिटीनुसार टी.डी. आर. मिळणेबाबत)**

तमांम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे नाशिक यासी स.नं. ५६७/१, ५६७/२, ५६७/३ **यांसी फायनल प्लॉट नं. ६० यासी एकुण क्षेत्र ६८३२.०० चौ. मी.** असून ही मिळकत श्री. शाम रामचंद्र माळी (कमोद) व इतर यांचे विकसक व जनरल मुखत्यार नाशिक इंडस्ट्रियल पार्क प्रा.लि. तर्फे संचालक श्री अनंत केशव राजेगावकर आणि वैशाली जैन यांचे जनरल मुखत्यार श्री. अनिल भवरलाल जैन यांनी नाशिक महानगरपालिकेने मंजुर केलेल्या नकाशानुसार संपुर्ण बांधकाम केलेले असुन पुर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला आहे.

**नाशिक महानगरपालिकेच्या युडीसीपीआर (UDCPR)-२०२० मधील नियम क्र. ११.२.५ अन्वये बांधिव व विकसित केलेल्या ॲमेनिटी आणि विनामोबदला हस्तांतरीत केलेल्या मिळकतीबाबत कन्स्ट्रक्शन ॲमेनिटी टी. डी. आर. कामी उपरोक्त विकसक हे सदर मिळकतीतील अकोमोडेशन रिझर्व्हेशन क्र. ३४९ आणि ३५० यासी वाहनतळ २७७३.०० चौ.मी. आणि पोलिस चौकी ४०२.०० चौ.मी. बाबतच्या अनुषंगाने प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेकडे दाखल करणार आहेत.**

उपरोक्त क्षेत्र हे निर्वेध व बोजारहित असल्याचे वरील विकसकांनी सांगितलेले आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेला विनामोबदला हस्तांतरित केलेल्या वाहनतळ आणि पोलिस चौकी क्षेत्रासंबंधाने मिळणा-या कन्स्ट्रक्शन ॲमेनिटी टी.डी. आर. बाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी खालिल नमुद पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांपावेतो मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी, मुदतीनंतर आलेल्या तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या हरकतीस उपरोक्त मिळकतीवर तसेच आमचे पक्षकारांनी केलेल्या व्यवहारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहिर नोटीस.

**दिनांक: ०१/१०/२०२४**

**सही/- ॲड. रेवती महेंद्र कोतवाल**
**४, भास्कर बंगला, संकलेचा हॉस्पिटलजवळ, गोविंद नगर, नाशिक-९. मोबा. ९४२२७५४४४३**

## किरकोळ वादातून दारूच्या नशेत एकाची हत्या; आरोपीस अटक

**मोखाडा : प्रतिनिधी**

किरकोळ वादातून दारूच्या नशेत मोखाड्यात २८ वर्षीय तरुणाची हत्या झाल्याची घटना घडली या घटनेने मोखाडा शहरात एकच खळबळ निर्माण झाली असून, पोलिसांनी मात्र तात्काळ आरोपीला अटक केली आहे.

मोखाडा शहरात दर्गाआळी येथे रहाणारे आरोपी वीरेंद्र उर्फ वीरू भोये वय १९वर्ष व मयत महेश मोरे वय २८ वर्ष व सोबत मित्र असे तिघे जण दारू पिऊन आनंदवाडी येथून रस्त्याने चालत येत असताना महेश मोरे ह्याला दारू जास्त झाल्याने आरोपी वीरेंद्र भोये ह्याची सायकल फेकून दिली तसेच त्याला आई बहिणीवरून शिवीगाळी केल्याने आरोपी वीरेंद्र ह्याला राग अनावर झाल्याने संतापाच्या भरात महेश मोरे ह्याची बोथट हत्याराने डोक्यात वार करून खून केला सदरची घटना गुरुवारी रात्रीच्या १२:०० वाजताच्या सुमारास घडली असून या घटनेचा अधिक तपास मोखाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमनाथ ढोले करत आहेत.

## ऐन दिवाळीत खाद्यतेलाचा तुटवडा भासणार

**पुणे :** केंद्र सरकारने खाद्यतेलाच्या आयात शुल्कात वाढ केल्यामुळे खाद्यतेलाची आयात मोठ्या प्रमाणावर घटली आहे. पामतेलाची ३४ टक्क्यांनी, सोयाबीन तेलाची १५ टक्क्यांनी आणि सूर्यफूल तेलाची ४९ टक्क्यांनी घटली आहे.

खाद्यतेलाचे आयातदारांच्या हवाल्याने रॉयटर्स वृत्तसंस्थेने या बाबतचे वृत्त दिले आहे. ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत सप्टेंबरमध्ये पामतेलाची आयात ३४ टक्क्यांनी घटली आहे. ऑगस्टमध्ये ५.३० लाख टन तेलाची आयात झाली होती. पामतेलाची आयात गेल्या सहा महिन्यांतील सर्वात कमी आयात ठरली आहे.

**इवद विभाग क्रमांक २**
**जिल्हा परिषद नाशिक**

इवद विभाग क्रमांक २ जिल्हा परिषद नाशिक इवद विभाग क्रमांक २ जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत हया कार्यालयाकड विविध लेखाशिर्षांतर्गत मिळालेल्या प्रशासकिय मान्यता विकास कामांची ई निविदा www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- **५.१०.२०२४ ते ८.१०.२०२४** रोजी निविदा उक्त संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निविदाकारांनी उक्त नमुद संकेतस्थळावर निविदांचे अवलोकन करुन ऑनलाईन निविदा सादर करावी. निविदा फी व ज्या निविदानां रकमेच्या १% बयाणारक्कम आवश्यक असणार आहे त्या निविदाकारांनी ऑनलाईन इंटरनेट बँकींगच्या पध्दतीने निविदा फी व बयाणा रक्कम जमा करणे आवश्यक आहे. निविदा ऑनलाईन सादर करणे विषयी सविस्तर माहीती साठी सविस्तर निविदा सुचनेचे अवलोकन www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर करावे.

**सही/-** **सही/-**
**कार्यकारी अभियंता इवद-२** **अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक** **जिल्हा परिषद नाशिक**

**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक या प्राधिकरणाकडील आदेश जा. क्र. ७७५७ प्रशा./ने. रिक्त जागा/प्रा. अधि./नियुक्ती/२०२४**

**परिशिष्ट १**

**शिरवाडे वणी विविध का. सह. (विकास) सेवा संस्था मर्या. शिरवाडे वणी, ता. निफाड जि.नाशिक**

**जा.क्र ५/२०२४** **दिनांक :- ३/१०/२०२४**

**नोटीस**

शिरवाडे वणी विविध का. सह. (विकास) सेवा संस्था मर्या. शिरवाडे वणी, ता. निफाड जि. नाशिक या सहकारी संस्थेच्या सर्व या संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण या प्रवर्गातील/मतदारसंघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी दत्तात्रय नाईकरे, सहकार अधिकारी (प्रथम श्रेणी) अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, निफाड यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक ११/१०/२०२४ वार शुक्रवार रांजी दुपारी १२.०० वाजता** संस्था कार्यालय या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | दुपारी १२.०० ते दुपारी १.०० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | दुपारी १२.०० ते दुपारी १.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी २.०० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी २.०० ते दुपारी २.३० |
| ५ | अंतिम उमेदवारांची यादी जाहीर करणे | दुपारी २.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी ३.०० ते दुपारी ३.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी ३.३० ते दुपारी ४.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे | दुपारी ४.०० |

टीप- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

मा.(अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने) **स्वाक्षरी**

दिनांक-३/१०/२०२४ सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण:शिरवाडेवणी शिरवाडे वणी विविध कार्यकारी सहकारी (वि.) संस्था मर्या., ता.निफाड, जि. नाशिक

**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**जाहिर ई निविदा सूचना क्र. ०७/२०२४-२५**

मा. आयुक्त तथा प्रशासक, मालेगाव महानगरपालिका, हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मनपा निधी अंतर्गत एकूण १६ कामांची निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा ऑनलाईन असुन मा. शासनाच्या https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निविदा सूचनेत कामासंबंधी संपूर्ण माहिती, अटी शर्ती, निविदा प्रपत्र विक्री, निविदा दाखल करणेचा दिनांक, निविदा उघडणेचा दिनांक व ई माहिती वरील संकेतस्थळावर दिनांक: **०४/१०/२०२४ दुपारी १५.००** वाजेपासून ते दिनांक **१२/१०/२०२४ सायंकाळी १७.००** वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी आवश्यक ती माहिती उपअभियंता सा. बांध विभाग, म.न.पा मुख्य कार्यालय यांचे कडुन प्राप्त करता येईल.

**इ- निविदा क्रमांक: १ ते १६**

**आयुक्त तथा प्रशासक**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

MOTILAL OSWAL HOME LOANS

**मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड**

**नोंदणी कार्यालय :** मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परेल एस.टी. डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५ **ग्राहक सेवा :** ८२९१८८९८९८ **वेबसाईट :**www.motilaloswalhf.com **ई-मेल :** hfquery@motilaloswal.com

**कब्जा सूचना (स्थावर मिळकत/तींकरिता)**

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अन्वये)**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. असे ज्ञात) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खालील नमूद तारखेस मागणी सूचना जारी करून पुढील कर्जदारांना सूचनेत नमूद रकमेची परतफेड सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यात पुढील कर्जदारांनी कसूर केली आहे, याद्वारे पुढील कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्न स्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टचे कलम १३ चे उप कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून वरील वर्णन केलेल्या मिळकतींचा कब्जा येथे खालील नमूद केलेल्या तारखांना घेतला आहे.

| अ. क्र. | कर्ज करार क्र./कर्जदार/ सह-कर्जदार/हमीदार यांचे नाव | मागणी सूचनाची तारीख आणि थकबाकी | कब्जा घेतल्याची तारीख | स्थावर मालमत्तांचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | LXNAS00315-160016574/ विजय दगडू नेहेरकर आणि आकाश विजय नेहेरकर | २५-१०-२०१८ रोजीस रू.११४६३३९/- | ३०-०९-२०२४ | फ्लॅट नं. ०८ स्टिल्ट ३ फ्लोअर, एस. नं.६६/ए-१, प्लॉट क्र. २२ कृष्णा अपार्टमेंट दत्ता नगर चुंचाळे शिवार एनईसी सेंटर समोर अंबड एमआयडीसी चुंचाळे शिवार ४२२०१० नाशिक नाशिक महाराष्ट्र भारत |

विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतींशी व्यवहार करू नये आणि सदर मिळकतींशी कोणताही व्यवहार केल्यास **मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड** कडून येथे वरील नमूद करण्यात आलेल्या रकमेसह आणि त्यावर व्याज आकारले जाईल.

तारण मत्तांचे विमोचन करण्याकरिता उपलब्ध वेळेनुसार ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**सही/-**
**स्थळ : महाराष्ट्र** **अधिकृत अधिकारी**
**दिनांक : ०५.१०.२०२४** **भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.** **(मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड)**

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०२४



कांदा वधारला; टोमॅटो बाजारपेठांत शेतकऱ्यांत उत्साह

पान ६

पालखेड उपबाजार आवारात भुसारमाल लिलाव सुरू

पान ६



■ वैभव आढाव



निवडणुकीचे विषय धर्म, जात आणि कट्टरपणा यांवरच केंद्रित होतायत, पण बेरोजगारी, आर्थिक आव्हाने, असुरक्षितता यांकडे सपशेल दुर्लक्ष केलं जातंय, त्याचे काय!

# अगोदर मोबदला द्यावा, नंतर फ्रीहोल्डची घोषणा करावी

## सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची मागणी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**वर्षानुवर्षांपासून न्यायालयात दाद मागणाऱ्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना बाजू ठेवून सरकारने सिडको फ्रीहोल्डची घोषणा केली. फ्रीहोल्डचे आम्ही कौतुकच करतो, परंतु पहिले आमचा मोबदला द्यावा आणि मगच सिडकोची घरे फ्रीहोल्ड करावी, अशी मागणी सिडकोच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.**

शासनाच्या सिडको महामंडळाकडून सन १९७० साली नाशकातील मोरवाडी तसेच उंटवाडीतील शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करून त्यावर सिडकोची एक ते सहा योजना उभारण्यात आली होती. ९९ वर्षांच्या करारासाठी भाडेतत्त्वावर सिडकोची पंचवीस हजारांहून अधिक घरे विकण्यात आली. सुमारे ४० ते ५० वर्षांचा कालावधी उलटला तरीही जमिनीचे मूळ मालक शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत त्यांचा मोबदला मिळाला नाही.

गेल्या पन्नास वर्षांपूर्वी सिडको महामंडळाने मोरवाडी तसेच उंटवाडीकरांची सुमारे एक हजार एकरहून अधिक जमीन ताब्यात घेतली. त्यातील अनेक शेतकऱ्यांना मोबदला देखील देण्यात आला आहे, मात्र अद्यापपर्यंत ५२% मोबदला येथील शेतकऱ्यांना मिळाला नसल्याने गेल्या वर्षानुवर्षांपासून सदर मोबदला मिळण्यासाठी शेतकरी न्यायालयात दाद मागत आहेत. न्यायालयात चक्करावर चकरा मारून यातील अनेक शेतकरी भूमीही झाले आहे. याबाबत सन २०२१ मध्ये शेतकऱ्यांच्या वतीने ॲड. अनिल आहुजा यांनी उच्च न्यायालयात स्वतंत्र याचिका दाखल केली होती. न्यायालयाने शेतकऱ्यांचे भूसंपादन करून मोबदला देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते, मात्र कोणतीही अंमलबजावणी झाली नाही. सरकारने सिडको फ्रीहोल्डबाबत नागरिकांना दिलासा देण्याचे ठरले असले तरीही तत्पूर्वी मूळ शेतकऱ्यांना याचा मोबदला देण्यात यावा, अशी मागणी सिडको प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

> ‘सिडकोतील बहुतांशी जमिनींचे मूळ मालक आम्हीच आहोत. सरकारने आम्हा मूळ मालकांचा हिशेब अद्यापही पूर्ण केला नाही. त्यामुळे सरकारला असा कोणताही अधिकार नाही. सरकारने अगोदर आमचे देणे चुकते करावे आणि मगच त्यांचा अधिकार वापरून सिडकोतील घरे फ्रीहोल्ड करण्याच्या घोषणा कराव्यात. सध्या विविध राजकिय पक्ष याचे श्रेय लाटत आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहेत. याबाबत प्रकल्पग्रस्तांना काही सोयरसुतक नसले तरी त्यांना सिडकोतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ नसल्यामुळे खेद वाटतो.
>
> - **अण्णा पाटील,** सिडको प्रकल्पग्रस्त शेतकरी

# बिकट परिस्थितीवर मात करीत खंबीर व्हावे : सुनंदा सोनी

नवदुर्गा

**देवयानी सोनार**



आपल्याकडे जे नाही आहे त्यावर काम करण्याचा प्रयत्न असावा.

सर्वांना जोडून ठेवण्याची कला जोपासत आम्ही स्त्रिया नैसर्गिक व मानसिकदृष्ट्या खूप खंबीर असतो. आम्ही जर सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर खंबीर, निरोगी व सुखी कुटुंब तयार करू शकतो. परिणाम स्वरूप एक चांगलं राष्ट्र तयार व्हायला मदत होईल. आपल्याकडे जे नाही आहे त्यावर कसे काम करता येईल किंवा परिस्थितीत अजून कशी सुधारणा करता येईल हे पहावे. किंवा बिकट परिस्थितीवर कशी मात करायची हे बघावे, असे अम्रो कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या प्राध्यापक/संस्थापक सुनंदा सोनी यांनी आपला प्रवास सांगितला.

अम्रो कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये प्राध्यापक/संस्थापक म्हणून सुनंदा सोनी कार्यरत आहे. आज या संस्थेची गणना उत्कृष्ट शैक्षणिक क्षेत्रात होते. दर्जेदार शिक्षणपद्धतीमुळे संस्थेचे नाव उंचावले आहे.

सुनंदा सोनी या भरपूर वाचन आणि नवनवीन पदार्थ करून खाऊ घालणे हा त्यांचा छंद आहे. त्याशिवाय नावीण्यपूर्ण माहिती आणि ज्ञानाची देवाणघेवाण नेहमीच तरुणाईकडून घेत असतात. त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे असल्याचे त्या सांगतात.

कुटुंबात पती राजन सोनी अत्यंत निष्ठावान व प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांचे ३ वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या मागे त्यांची कन्या-जावई, मुलगा-सून आणि आता गोंडस नात आहे. कॅनडाला असताना मुलांवरती उत्तम संस्कार व्हावे, या हेतूने नाशिक येथे एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये स्थायिक झाल्या. जेणेकरून त्यांना चांगली शिकवण मिळेल. मोठ्या कुटुंबात कसे वावरायचे याची शिकवण मुलांना मिळावी, थोरामोठ्यांचे आदर करायला मुलांना शिकता येईल या हेतूने स्थायिक झाल्या.

ॲम्रो कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (विल्होळी) स्थापन करण्यापूर्वी जमापुंजी आमच्या पहिल्या उद्योगात गमावली होती. परंतु खचून न जाता नवीन आव्हानांना तोंड देत वाटचाल सुरू ठेवली आणि इथूनच सर्वांना स्थिर आणि जोडून ठेवण्याची खरी भूमिका बजावयला सुरुवात केली. सुनंदा सोनी साधच जेवण बनवायचे पण अशा पद्धतीने वाढायचे की प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्मितहास्य यायचे. आहे तशा परिस्थितीत सगळं निभावून नेत असे. परिवारासाठी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे होते. अत्यंत हलाखीच्या दिवसांनी खूप काही शिकवले. आलेल्या परिस्थितीला तोंड देत त्यावर मात केली. त्यामुळे आज आमच्या संस्थेची गणना उत्कृष्ट शैक्षणिक क्षेत्रात होते तसेच आज आमच्या संस्थचे नाव दर्जेदार शिक्षणपद्धतीमुळे अत्यंत आदरपूर्वक घेतले जाते, असेही त्यांनी सांगितले.

# डॉ. वसंतराव पवार स्मृती पुरस्कार यंदा डॉ. भरत केळकर यांना जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी**

यंदाचा कै. आ. वसंतराव पवार स्मृती पुरस्कार-२०२४ मधील वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कार नाशिकचे सुपुत्र डॉ. भरत केळकर यानां जाहीर झाला आहे. कार्यक्रम दि. ७ संध्या. ५.०० वाजता रावसाहेब थोरात हॉल, गंगापूर रोड, नाशिक येथे पुरस्कार समितीच्या अध्यक्षा नीलिमा पवार यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, सन्मानचिन्ह व रक्कम रुपये एक लाख रुपयांचा धनादेश असा असेल, अशी माहिती पुरस्कार समितीच्या अध्यक्षा नीलिमा पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी रंजना पाटील, डॉ. चंद्रकांत संकलेचा, प्र. द. कुलकर्णी, डॉ. अविनाश आंधळे, विजय कोठारी, नारायण थेटे, डॉ. प्राची पवार आदी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. चंद्रकांत संकलेचा यांनी डॉ. भरत केळकर यांचा परिचय देत प्रत्यक्ष युद्धभूमीत डॉक्टरांचे योगदान अत्युच्य सेवाभाव असणाऱ्या योग्य व्यक्तीला हा पुरस्कार मिळाला असल्याचे सांगितले.

नीलवसंत मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर संस्थेचे संस्थापक विश्वस्त आणि नाशिक जिल्ह्याचे समाजाभिमुख बहुआयामी व्यक्तिमत्त्व पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेतर्फे डॉ. वसंतराव पवार स्मृती पुरस्कार सन २०१२ पासून दरवर्षी या पुरस्काराने शैक्षणिक वैद्यकीय सामाजिक पैकी एक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित केले जाते.

**डॉ. भरत केळकर यांचा परिचय**



डॉ. भरत केळकर हे गेली चाळीस वर्षे नाशिकमध्ये अस्थिरोगतज्ज्ञ म्हणून सेवा देत आहेत. कुठल्याही डॉक्टरकडे हवे असे सचोटी, कष्ट करण्याची तयारी, मानवी स्पर्श आपले ज्ञान सतत अपटूडेट ठेवण्यासाठी अभ्यास करत राहण्याची वृत्ती हे सगळे गुण त्यांच्यात आहेतच, पण याहीपलीकडे जाऊन आपल्या व्यवसायात नवनव्या उपचारपद्धती शोधणे व रुग्णांच्या भल्यासाठी त्यांचा वापर करणे याकरता लागणारी संशोधक दृष्टी व बुद्धीही त्यांच्या ठायी भरपूर आहे. गुडघ्याची सांधेरोपण शस्त्रक्रिया जागतिक कीर्तीचे तज्ज्ञ डॉ. राणावत यांच्याकडे शिकण्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. राज्य व राष्ट्रीय पातळीवर अस्थिरोग तज्ज्ञांच्या संघटनांमध्ये अनेक मानाची पदे भूषविली.

डॉक्टर्स विदाउट बॉर्डस ही संघटना जगभरात युद्धग्रस्त भूमीवर रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्याचे काम करते. आतापर्यंत या संघटनेच्या तब्बल चार मोहिमांमध्ये डॉ. केळकर यांनी भाग घेतला आहे. आणि येमेन, इराक, सीरिया अशा अत्यंत धोकादायक प्रदेशात अनेक आठवडे राहून अक्षरशः शेकडो शस्त्रक्रिया केल्या आहेत. सामाजिक बांधिलकीचे हे भान आणि जगभरातल्या गरजू रुग्णांप्रति आपले वैद्यकीय कौशल्य वापरण्याची भावना व त्यासाठी प्रसंगी जीव धोक्यात घालण्याची तयारी यामुळे डॉ. केळकर सर्व डॉक्टरांमध्ये वेगळे उठून दिसतात. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष व वनवासी कल्याण आश्रम या संघटनेचे राज्यप्रमुख म्हणूनही त्यांनी भरीव योगदान दिले आहे.

निवृत्तिनाथ महाराज पालखी व वारीच्या वेळी हजारोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या मलमूत्र विसर्जनाचे, भाविकांच्या व गावकऱ्यांच्या आरोग्याशी निगडित हे काम डॉ. केळकर यांची निर्मल ही संस्था गेली अनेक वर्षे अतिशय प्रभावीपणे करत आहे.




आरओसी-२०२४-२५/क्र-५/D३९५४



◀◀ आयटीसी सनफिस्टचा मुलांसाठी बिग फँटसीज उपक्रम ◀◀ पान ३

# नाशिक आज गांवकरी

▶▶ रोजगार ॲप : ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराची नवी संधी ▶▶ पान ३



नाशिक, शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०२४

### महत्त्वाचे

## माकपाचा आज मेळावा

**नाशिक : प्रतिनिधी**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉम्रेड उदय नारकर यांच्या उपस्थितीत पक्ष सभासदांचा मेळावा शनिवार दि. ५ रोजी सकाळी १० वाजता संत सावता क्षत्रिय काशी माळी समाज कार्यालय, मारुती मंदिराशेजारी, सातपूर, नाशिक येथे आयोजित केला आहे. यावेळी पक्षाचे राज्य सचिव मंडळाची सदस्य शेतकरी नेते माजी आमदार जे. पी. गावित, डॉ. अजित नवले व डॉ. डी. एल. कराड हे या मेळाव्यास मार्गदर्शन करणार आहेत. पक्षाचे राज्य नेते कॉम्रेड सीताराम ठोंबरे मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी असतील. मेळाव्यात विधानसभा निवडणूक व जनतेच्या अपेक्षा याबाबत विचारमंथन होईल. यावेळी विधानसभा निवडणुकीबाबत पक्षाची भूमिका जाहीर करण्यात येईल. पक्षाच्या नेत्याकडून अत्यंत मोलाचे मार्गदर्शन मिळणार आहे, तरी मोठ्या संख्येने मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने कॉम्रेड वसुधा कराड, तानाजी जायभावे, दगडू व्हडगर, शिंदू शार्दुल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मनसेच्या प्रसिद्धीप्रमुखपदी नितीन धानापुणे

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मनविसे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी नितीन धानापुणे यांची नाशिकरोड विभाग प्रसिद्धिप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. धानापुणे हे पक्षस्थापनेपासून निष्ठावंत असून, त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर वेळोवेळी आंदोलने केली आहेत. नागरिकांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम ते राबवित असतात. मनसेचे नेते डॉ. प्रदीप पवार, सरचिटणीस अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष रतनकुमार ईचम, अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, दिलीप दातीर, नाशिकरोड अध्यक्ष प्रकाश बंटी कोरडे यांच्या सहमतीने ही नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थी सेना प्रदेश कार्यकारिणी सदस्य शशिकांत चौधरी, नितीन पंडित, उमेश भोई, बाजीराव मते, संदीप आहेर, दीपक बोराडे, देव पारखे, वैभव शिंदे यांनी धानापुणे यांचे अभिनंदन केले आहे.

# आचारसंहितेपूर्वी दीडशे कोटींच्या कामांचा धुरळा!

## कामे मंजुरीसाठी धावपळ

**नाशिक : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता दसऱ्यानंतर जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नाशिक महापालिका प्रशासनाकडून आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सर्व विभागप्रमुखांना आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी महत्त्वाच्या कामांचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार महापालिकेकडून तब्बल शंभर ते दीडशे कोटींच्या कामांचा धुराडा उडवला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, कामांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी महापालिकेतील विविध विभागांची जोरदार धावपळ सुरू झाली आहे.**




विकासकामांमध्ये प्रामुख्याने रस्ते डागडुजी, खड्डे बुजविणे, अस्तरीकरण या बांधकाम विभागाशी निगडित कामांचा प्रामुख्याने समावेश असू शकतो. तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचा सफाई कर्मचारी भरती, पाणीपुरवठा विभाग, करसंकलन, विद्युत आदी विभागांच्या कामांचा समावेश असेल. आचारसंहितेत महासभा व स्थायीची सभा घेता येत नाही. त्यापूर्वीच शंभर ते दीडशे कोटींच्या कामांना मंजुरी दिली जाऊ शकते. त्यामुळे खऱ्या अर्थाने ठेकेदारांची दिवाळी जोरात होणार आहे. दहा दिवसांत आचारसंहिता लागण्याची चिन्हे असून, त्यापूर्वी महापालिका प्रशासनाकडून कोट्यवधींच्या विकासकामांचा बार उडवण्याची घाई सुरू झाली आहे. आयुक्त डॉ. करंजकर यांनी सर्व विभागप्रमुखांना तातडीने विकासकामांचे प्रस्ताव महासभा व स्थायी समितीवर ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. आचारसंहितेत पूर्वी मनपा प्रशासनाकडून शंभर ते दीडशे कोटींच्या कामांचा मंजुरी देत एकप्रकारे ठेकेदारांची दिवाळी साजरी केली जाणार आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली असून, राजकीय वातावरण तापत आहे. दसऱ्यानंतर निवडणुकीची आचारसंहिता लागू होईल अशी चर्चा आहे. त्यामुळे मनपा वर्तुळात धावपळ पहायला मिळत आहे. दहा दिवसांच्या आत विविध विकासकामांचे प्रस्ताव तयार करून ते महासभा व स्थायीवर ठेवण्याची लगबग सुरू आहे. पुढील दहा दिवसांच्या आत मनपा प्रशासनाकडून महासभा व स्थायीची सभा घेत त्यास मंजुरी दिली जाणार आहे.

### यापूर्वीच्या आचारसंहितेचा फटका

लोकसभा निवडणुकीचा सलग तीन महिने आचारसंहिता व त्यानंतर महिनाभर लागू झालेली शिक्षक मतदारसंघ आचारसंहिता यामुळे मनपाच्या विकासकामांना खीळ बसली होती. निवडणूक आयोगाकडून महत्त्वाच्या कामांनादेखील परवानगी नाकारण्यात आली होती. त्यामुळे हा अनुभव पुन्हा नको म्हणून आयुक्तांनी दोन-तीन दिवसांत सर्व महत्त्वाच्या विकासकामांचे प्रस्ताव तयार करून तातडीने मंजुरीसाठी ठेवा, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आचारसंहितेच्या कचाट्यात अडकायला नको म्हणून प्रशासनाची धावपळ सुरू असल्याचे दिसते.

# अण्णा भाऊ साठे पुतळा सुशोभीकरणाचा भूमिपूजन सोहळा




**नाशिक : प्रतिनिधी**

**दीन, दलित, शोषित वर्गाला ज्यांच्या लेखणीने ऊर्जा दिली, त्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा नाशिकमधील जिल्हा परिषदेच्या मुख्यालयासमोर आहे. या पुतळ्याच्या परिसराच्या सुशोभीकरणासाठी आ. प्रा. सौ. देवयानी सुहास फरांदे यांच्या एक कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर केला आहे.**

या निधीचा उद्देश परिसराचे सौंदर्यीकरण करून साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतीतून तरुण पिढीला प्रेरणा मिळून देणे हा आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याने मराठी साहित्य, समाजसुधारणा, आणि सांस्कृतिक क्रांतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांचे कार्य आणि जीवनप्रवास हे सामाजिक अन्यायाविरुद्धच्या लढाईचे प्रतीक आहे. त्यांनी आपल्या लेखनातून आणि शाहिरीतून श्रमिक वर्ग, दलित आणि वंचितांचा आवाज उचलला. त्यामुळे त्यांच्या पुतळ्याच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतींना आदरांजली देण्याचे काम या सुशोभीकरणाच्या उपक्रमातून केले जात आहे. सुशोभीकरणाच्या कामात पुतळ्याच्या परिसराची योग्य प्रकाशयोजना आणि आकर्षक सजावट यांचा समावेश आहे. या कामामुळे लोकांना अण्णा भाऊंच्या विचारांची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आमदार देवयानी फरांदे यांनी व्यक्त केला. या कामाचे भूमिपूजन रविवार दिनांक ६ ऑक्टोबर रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुतळ्याच्या जवळ होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहनदेखील आमदार देवयानी फरांदे यांनी केले आहे.

# स्वच्छता ही सेवा उपक्रमाचा समारोप; उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा गौरव

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनानिमित्त १७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर कालावधीत शासनाच्या निर्देशाप्रमाणे स्वच्छता ही सेवा स्वच्छता पंधरवडा नाशिक महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. दरम्यान, या स्वच्छता पंधरवडा उपक्रमाचा समारोप कालिदास कलामंदिरात बुधवारी (दि.२) स्वच्छता दिवस साजरा करून करण्यात आला.



मनपा अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, प्रदीप चौधरी, जितूभाई ठक्कर, हेमंत राठी, उपायुक्त अजित निकत, शहर अभियंता संजय अग्रवाल, संचालक डॉ. आवेश पलोड, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद सोनवणे, राजेश पंडित, निशिकांत पगारे आदी उपस्थित होते. मलनिस्सारण विभाग कार्यकारी अभियंता गणेश मैड यांनी सफाई कर भाई हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे भजन सादर केले. दिल्ली पब्लिक स्कूल यांनी घंटागाडीवर नावीन्यपूर्ण गीत सदर केले. सायक्लोन डान्स अकादमी यांनी प्लास्टिकची गंभीरता या विषयावर नृत्य सादर केले. प्रतीक शर्मा व समूह यांनी स्वच्छताविषयक पथनाट्य सादर केले. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभाग, पशुवैद्यकीय, गोदावरी संवर्धन कक्ष, मलनिस्सारण कंत्राटी सफाई कर्मचारी विभागातील उत्कृष्ट सफाई कर्मचारी यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक घनकचरा व्यवस्थापन विभाग संचालक डॉ. आवेश पलोड यांनी केले. अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी स्वच्छता हे सेवा उपक्रम तसेच विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन योगेश कमोद यांनी तर डॉ. प्रमोद सोनवणे यांनी आभार मानले.

# नाशिक विभाग दूरसंचार सल्लागार समितीवर पंकज जाधव यांची नियुक्ती

**नाशिक : वार्ताहर**

**शिवसेना ठाकरे गटाचे उपमहानगरप्रमुख आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे विश्वासू समजले जाणारे पंकज विक्रम जाधव यांची नाशिक विभाग दूरसंचार सल्लागार समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. खासदार राजाभाऊ वाजे यांच्या हस्ते जाधव यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यांचे सर्व थरातून स्वागत होत आहे.**



पंकज जाधव हे विद्यार्थी कृती समिती अध्यक्ष, पोलिस शांतता समिती सदस्य या पदांची जबाबदारीही त्यांनी उत्तमरीत्या सांभाळली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते सुनील बागूल, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, खा. राजाभाऊ वाजे, जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर, माजी आमदार वसंत गिते, माजी महापौर विनायक पांडे, महानगरप्रमुख विलास शिंदे, मध्य नाशिक विधानसभा प्रमुख बाळासाहेब कोकणे, विधानसभा संघटक ऋषी वर्मा आदींनी अभिनंदन केले.

# मराठी अभिजात दर्जा; नाशिकरोडला मनसेचा आनंदोत्सव

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल मनसेच्या वतीने नाशिकरोड येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यापासून ६४ वर्षे झाले आहे. तेव्हापासूनची ही मागणी लावून धरली होती. त्या मागणीला सर्वांत जास्त सातत्याने व आग्रही कठोर शब्दात मागणी करणारे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पाठपुराव्यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यात आला.**



नाशिकरोड येथील बिटको चौकात मनसेच्या वतीने लाडू वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नाशिकरोड विभाग अध्यक्ष बंटी कोरडे, मनसे जिल्हा उपाध्यक्ष संतोष सहाणे, सुरेश घुगे, प्रमोद साखरे, नाशिक शहर उपाध्यक्ष नितीन पंडित, रोहन देशपांडे, दत्ता कोठुळे, विजय बोराडे, नितीन धानापुणे, उमेश भोई, रवि जाधव, भाऊसाहेब ठाकरे, मयूर कुकडे, दीपक बोराडे, आदित्य कुलकर्णी, मयूर रत्नपारखी, अजिंक्य जाधव, नीलेश शिंदे, गोरख शिंदे, नितीन बोटे, विजय बोरसे, विजय सूर्यवंशी, महिला आघाडी मीरा आवारे, अस्मिता काजळे आदी उपस्थित होते.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा — शिवसेनेतर्फे आनंदोत्सव

**नाशिक : प्रतिनिधी**

**केंद्र सरकार व भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल कुसुमाग्रज स्मारक, गंगापूर रोड येथे नाशिक शिवसेनेच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना उपनेते, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महिला आघाडी जिल्हाप्रमुख मंगलाताई भास्कर, सुवर्णाताई मटाले, महानगरप्रमुख अस्मिताताई देशमाने, उपजिल्हाप्रमुख अमोल सूर्यवंशी, विधानसभाप्रमुख रोशन शिंदे, उपमहानगरप्रमुख सुधाकर जाधव, आनंद फरताळे, उमेश चव्हाण, कैलास जाधव, युवसेना चिटणीस आदित्य बोरस्ते, विशाल खैरनार, नितीन देशमुख, शुभम पाटील, अमोल जोशी, शरदचंद्र नामपूरकर, प्रसन्ना तांबट, मोनिकाताई मुथा, सोनालीताई पाटील, मंगलताई बाविस्कर, माधुरीताई सोनवणे आदी शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.**



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारचे आभार शिवसेना उपनेते, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी मानले. मराठी भाषा हा देशाचा अभिमान आहे. भारताच्या परंपरेत मराठी कायमच अत्यंत महत्त्वाची आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त आहे. या उत्तुंग भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी अनेक आंदोलने झाली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी लागणारे जे पुरावे होते त्यातील एक म्हणजे २ हजार वर्षांपूर्वीची गाथा सप्तसतीची हा शेतकरी कवींनी लिहिलेला जो ग्रंथ आहे, तो त्र्यंबकेश्वर, नाशिक येथील आहे. देशाच्या इतिहासात मराठी भाषेचा समृद्ध सांस्कृतिक वारशाचं योगदान या सन्मानामुळे अधोरेखित झालं आहे. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे अनेक लोकांना मराठी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळेल, संशोधन केले जाईल, अभिजात भाषा या भारताच्या पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करतात. तसंच प्रत्येक समुदायाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होते.

कवी कुसुमाग्रज, प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, चिं. वि. जोशी, ग. दि. माडगूळकर, वि. स. खांडेकर, ना. सि. फडके यांसारख्या साहित्यिकांनी मराठीत आपल्या साहित्याची भर घालून मराठी भाषा मराठी मनामनातून जागृत ठेवली. तर एकीकडे इंग्रजीच्या वाढत्या वापरामुळे मूळ मराठी भाषा बदलत आहे. दैनंदिन बोलीभाषेतून मराठीचे संवर्धन करणे, मराठीचे सौंदर्य, खानदानीपणा टिकवून ठेवणे हे प्रत्येक मराठी भाषकाचे कर्तव्य असल्याचे शिवसेना उपनेते, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी सांगितले.



**माझ्या मराठीची बोलू कौतुके**
**परी अमृतातेही पैजा जिंके।**
**ऐसी अक्षरे रसिका मेळविन।।**

या शब्दांत संत ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी भाषेचे कौतुक केलेले आहे. मराठी भाषेतील शब्दांमध्ये एक विशेष रस आणि माधुर्य आहे, जे अमृताच्या माधुर्याशीही स्पर्धा करू शकते, माझा मराठीचा बोल (शब्द) मला कौतुकाचा वाटतो. अमृताशी पैज लावली, तरी माझा मराठीचा बोल ती पैज जिंकेल. अमृतापेक्षा माझ्या मराठी भाषेत गोडवा व माधुर्य अधिक आहे. मराठी भाषेतील अक्षरांमध्ये असा गोडवा असेल की, जो अमृतालाही आपल्या कमीपणाची जाणीव करून देईल. अशा स्वरुपात मराठी भाषेची महती ज्ञानेश्वरांनी मांडली आहे. मराठी ही मराठी माणसाची मातृभाषा आणि आपल्या महाराष्ट्राची राजभाषा असली, तरी तिला अभिजात दर्जा काही मिळत नव्हता. अभिजात दर्जा मिळावा म्हणून गेल्या अकरा वर्षांपासून केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू होता. या पाठपुराव्याला अखेर यश आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार दिनांक ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठीसह पाच भाषांना अभिजात दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठी, पाली, प्राकृत आणि बंगाली आणि आसामी या भाषांना अभिजात दर्जा बहाल करण्यात आला आहे. यापूर्वी तमिळ, संस्कृत, मल्याळम, तेलुगू, कन्नड आणि ओडिया या सहा भाषांना हा दर्जा मिळाला होता. त्यात मराठीसह पाच भाषांची भर पडल्याने देशात अभिजात भाषांची संख्या ११ झाली आहे. राज्यात सध्या भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तीन पक्षांच्या महायुती सरकारच्या कार्यकाळात ही मागणी मान्य केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने मान्य केली. त्यामुळे दर्जा मिळण्याचे श्रेय सत्ताधारी पक्ष घेत असले, तरी मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी महाराष्ट्रातील जनता सातत्याने करत आली आहे. राज्य सरकार कोणत्याही पक्षाचे असले, तरी त्यांनीही ही मागणी लावून धरली होती. सर्वच राजकीय पक्षांनीही ही मागणी लावून धरली होती. याचा विचार करता याचे श्रेय सामूहिक आहे. त्यामुळे कोणी श्रेय घेण्याचा प्रयत्न करण्याचे काही कारण नाही. कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. गेल्या दहा वर्षांत केंद्रातील सरकारने मराठीला हा दर्जा देण्याचा निर्णय का घेतला नाही? हाच खरा

# संपादकीय

## अभिजात विजय



प्रश्न आहे. भारतातील प्राचीन भाषेला अभिजात दर्जा देण्याची संकल्पना केंद्र सरकारने १२ ऑक्टोबर २००४ पासून सुरू केल्यानंतर तामिळनाडूतील तमीळ भाषेला सर्वप्रथम हा दर्जा याच दिवशी देण्यात आला. त्यानंतर संस्कृत भाषेला २५ नोव्हेंबर २००८ रोजी हा दर्जा मिळाला. कर्नाटकातील कन्नड भाषेला ३१ ऑक्टोबर २००८ रोजी, केरळमधील मल्याळमला ८ ऑगस्ट २०१३ रोजी आणि ओडिशातील ओडियाला एक मार्च २०१४ रोजी हा दर्जा मिळाला. त्यानंतर लाखापर्यंत एकाही भाषेला हा दर्जा मिळाला नाही. मे २०१४ पासून केंद्रात भाजपा किंवा राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सत्ता आहे. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी देशाचा कारभार पाहत आहेत. आतापर्यंत त्यांच्या कारकिर्दीत एकाही भाषेला अभिजात दर्जा मिळालेला नव्हता. गुरुवारी त्यांनी एकाच वेळी पाच भाषांना अभिजात दर्जा देऊन गेल्या दहा वर्षांतील अनुशेष भरुन काढला आहे. महाराष्ट्रातील राज्य सरकारने १० जानेवारी २०१२ रोजी प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात भाषा समिती नेमली होती. या समितीत प्रा. हरी नरके, डॉ. नागनाथ कोतापल्ले आदींचा समावेश होता. समितीने सात बैठका घेऊन आणि पुरावे जमा करून मराठी भाषेतील १२८ पानी अहवाल ३१ मे २०१३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे दिला. हा अहवाल केंद्र सरकारकडे इंग्रजीत रुपांतर करुन पाठविण्यात आला होता. त्यावेळी केंद्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार मनमोहन सिंग चालवत होते. पण, त्यांच्या आणि कारकिर्दीत आणि नंतरच्या काळात काही शंका व प्रश्न उपस्थित करण्यात आले, त्याचे निराकरण राज्य सरकारने केले. मराठी भाषा प्राचीन असून अभिजात दर्जा देण्यासाठी सुयोग्य असल्याचा निर्वाळा साहित्य अकादमीने दिला. पण, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव अनेक वर्षे प्रलंबित होता. मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी होत होती. देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि आताचे एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या कार्यकाळात अनेकदा केंद्र सरकारकडे शिष्टमंडळे नेण्यात आली. जाहीर सभांमधून मराठीला अभिजात दर्जा देण्याची मागणी करण्यात आली. ठाकरे सरकारच्या काळात राष्ट्रपतींना नागरिकांकडून लाखो पत्रे पाठविण्याची मोहीमही राबविली गेली होती. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यात अडचणी काय, असा मुद्दा संसदेत आतापर्यंत अनेकदा राज्यातील खासदारांनी उपस्थित केला. राज्य विधिमंडळातही एकमताने ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठविण्यात आले. या मागणीचा केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी शिंदे सरकारने एक समिती याच वर्षी १४ फेब्रुवारी रोजी गठीत केली होती. भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांच्याकडे समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. समितीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, भाषा सल्लागार समिती यांचे अध्यक्ष तसेच पुण्यातील सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली होती. महिन्यातून एकदा दिल्लीत केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडे संपर्क साधून मागणीचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी या समितीकडे सोपविण्यात आली होती. समिती स्थापन झाल्यानंतर जवळपास आठ महिन्यांनी मराठी भाषा अभिजात झाली आहे. सर्वांच्या प्रयत्नांतून मागणी लावून धरण्यात आली आणि सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याने मराठी माणसाचा आणि मराठी भाषेचा विजय झाला आहे. त्याचे श्रेय सर्वांनाच आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात आला, असे बोलले जात आहे. आसाम आणि बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशात (पाली व प्राकृत) आताच काही निवडणुका नाहीत. हे लक्षात घेतले पाहिजे.

## विचारधन

### अभिमानाची पूर्णाहुती हाच खरा यज्ञ



पाण्याचा रंग कोणता म्हणून विचारले तर काय सांगता येईल? त्याचप्रमाणे भगवंत आहे. ज्याप्रमाणे पाहाल त्याप्रमाणे तो आपल्याला दिसेल. आपल्यामधल्या विकारांमुळे तो आपल्याला निराळा दिसू लागतो. खरोखर, भगवंताचे खरे स्वरूप जाणणारे विरळाच. ज्याचे विकार कमी, त्याला भगवंताची प्रचीती जास्त. एकच राम चोहोकडे कसा असेल, हे म्हणणे भ्रमाचे आहे. सर्व अवतार एका भगवंताचेच आहेत. नारायण हा लहानपणचा अवतार आहे, कारण तो सर्वांचा आदि आहे. राम हा तरुणपणचा अवतार, आणि कृष्ण हा म्हातारपणचा अवतार समजावा. भगवंताला जन्ममरण नाही. तो तर सच्चिदानंद आहे; मग त्याचा जन्म कशाला करायचा असे काहीजण विचारतात. एका घरामध्ये बाहेरच्या खोलीत पोरे दंगामस्ती आणि आरडाओरडा करीत होती. आजोबा घरात आहेत हे त्यांना माहीत नव्हते. आपण घरामध्ये आहोत ही जाणीव त्या पोरांना देण्यासाठी, खाकरा आला नसताना देखील, आजोबा नुसते खाकरले. ते ऐकल्याबरोबर पोरे लगेच गप्प बसली. त्याचप्रमाणे भगवंताला जन्म नसूनसुद्धा, 'तो आहे' ही जाणीव होण्यासाठी त्याचा जन्म करायचा असतो. भगवंत आहे ही जाणीव झाल्यानंतर, आपण विषयामध्ये दंगामस्ती करणार नाही आणि तो बेताने भोगू. मी जोवर साकारावर प्रेम करतो, तोवर भगवंतालाही आकार घेणे प्राप्त आहे. जे वेदांना शक्य झाले नाही, जिथे वेदांनी 'नेति नेति' केले, ते परमात्मस्वरूप संतांनी जाणले; म्हणून त्यांनी भगवंताला सगुणात आणले. हा आनंदस्वरूप परमात्मा मिळविण्यासाठी आज आपल्याला सगुणोपासनेची अत्यंत जरूरी आहे. माणसाला जे अत्यंत हितकारक असते, ते शांत आणि आनंदस्वरूप असले पाहिजे. सत्यस्वरूपाची प्राप्ती झाल्याशिवाय ते मिळत नाही; म्हणून भगवंताची प्राप्ती करून घ्यावी. मीपणाची आणि अभिमानाची पूर्णाहुती देणे, हाच खरा यज्ञ होय. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्त्विकता उत्पन्न होईल आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे 'सर्वस्व' अर्पण करणे, हेच यज्ञाचे खरे सार होय. विकारांच्या अधीन न होण्यामध्ये मनुष्याचे खरे मनुष्यपण आहे. भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय नुसती नीती ही पोरकी असते. ज्यात परमात्म्याचा विसर पडत नाही ती खरी चांगली बुद्धी आणि तो खरा सद्व्यवसाय. देवाचे नाम घ्यावे, नीतिधर्माचे आचरण करावे, प्रेमाने वागावे, आणि लोकांना मदत करावी, यालाच परमार्थ म्हणतात.

# मराठीला अभिजात भाषेचा दर्जा

**मागील तीनहून अधिक दशकांमध्ये मराठी भाषा अभ्यासक- भाषा तज्ज्ञांनी केलेले सखोल संशोधन, मराठी साहित्यिकांचे भरीव योगदान, महाराष्ट्रातील प्रत्येक पक्षाच्या सरकारने केंद्र सरकार दरबारी केलेला पाठपुरावा आणि १२ कोटी मराठी जनतेच्या मागणीला अखेर यश आले आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मायबोली मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला आणि महाराष्ट्रीयन माणसाचा अभिमान उंचावल्याबद्दल मा. नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय मंत्री मंडळाचे मनःपूर्वक आभार!**





### अभिजात मराठीचा प्रवास

- मराठी भाषेची अभिजातता सिद्ध करण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी समिती गठीत
- या समितीकडून तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना २०१३ मध्ये अहवाल सादर
- राज्य सरकारने हा अहवाल साहित्य अकादमीमार्फत केंद्र सरकारला सादर केला --मराठीला अभिजात दर्जा देण्यास हरकत नसल्याचा अहवाल साहित्य अकादमीने केंद्र सरकारला दिला.
- उडिया भाषेचा प्रस्ताव न्यायप्रविष्ट असल्याचे सांगून केंद्राने मराठीच्या प्रस्तावाबाबत टोलवाटोलवी
- न्यायालयातील प्रकरण मिटल्यानंतर पुन्हा एकदा अहवाल साहित्य अकादमी कडे
- अकादमीने मंजुरी दिल्यानंतर देखील केंद्र सरकारकडून प्रस्ताव देण्यास टाळाटाळ
- मराठी भाषेवर काम करणाऱ्या विविध संस्था, सामाजिक संघटनांकडून अभिजात दर्जासाठी पाठपुरावा करण्याचे प्रयत्न
- साहित्य अकादमीकडून अभिजात दर्जाचे निकष बदलण्याचे संकेत, मराठीला प्रस्ताव नव्याने देण्याबाबत साशंकता
- राज्य सरकारतर्फे १४ फेब्रुवारी २०२४ ला पाठपुरावा करण्यासाठी ज्ञानेश्वर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात भाषा दर्जा पाठपुरावा समिती गठित
- अखेर केंद्र सरकारकडून ३ ऑक्टोबर २०२४ ला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर नवरात्रीच्या पहिल्या दिवशी माय मराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे.

### आतापर्यंत ११ अभिजात भाषा

- केंद्र सरकारने आतापर्यंत ६ भाषांना अभिजात दर्जा दिलेला आहे. यामध्ये तामिळ २००४, संस्कृत २००५, कन्नड २००८, तेलगू २००८, मल्याळम २०१३ आणि उडिया २०१४ या भाषांचा समावेश आहे. या भाषांमध्ये आता मराठीसह पाली, बंगाली, आसामी, प्राकृत अशा पाच भाषांची भर पडली आहे.

**कटाक्ष**

**प्रभाकर वारुळे**

### अभिजात दर्जा मिळण्याचे निकष

- भाषा प्राचीन असावी.
- तिच्यातील साहित्य श्रेष्ठ असावे.
- स्वतंत्र साहित्य परंपरा असावी.
- भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे.
- भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावे.
- मूळ भाषा असावी.
- प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.
- ही भाषा एकेकाळी व्यापक वापरात असावी.

### अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे फायदे काय?

- मराठी भाषेचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन होईल.
- भाषेच्या संशोधनातील अनुदान आणि वित्तीय सहाय्य मिळेल.
- प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणात मराठीचा अधिक उपयोग होईल. मराठी साहित्याला नवीन उभारी मिळेल.
- भाषेचे शुद्धीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणी यासाठी प्रयत्न होतील. मराठी भाषेतील रोजगाराच्या संधी वाढतील.
- मराठी भाषेच्या संरक्षणासाठी कायदेशीर आधार मिळेल.
- सरकारी कार्यालये, न्यायालये, शिक्षण संस्था आदी ठिकाणी मराठीचा वापर वाढेल. भाषा, साहित्य अभ्यासाकाला चालना.
- मराठी साहित्य, कला, संगीत आणि संस्कृती यांचा जागतिक स्तरावर प्रसार होईल.

मराठी भाषा ही भारताचा अभिमान आहे. हा सन्मान म्हणजे मराठी भाषेने आपल्या देशाच्या इतिहासात दिलेल्या समृद्ध सांस्कृतिक योगदानाचा गौरवच आहे. मराठी भाषा ही कायमच भारतीय वारशाचा आधार स्तंभ राहिली आहे. याबद्दल मराठी भाषेचा अभिमान वाटतो.

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा

केंद्र सरकारने मराठी भाषेला, अभिजात दर्जा देण्याचे मान्य केले. आजवर अनेक राज्यकर्ते आले आणि गेले. परंतु हे कर्तृत्व कोणालाच जमले नव्हते. हे सर्व केंद्र सरकारने स्वखुशीने व मनापासून केले. हे सर्व निवडणुकीचा फंडा डोळ्यासमोर ठेवून, मतदारांना तसेच मराठी माणसांना खुश करण्यासाठी घेतलेला हा निर्णय आहे, हे उघड आहे. जसे निवडणुका जवळ आल्या की, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करणे. शेतकऱ्यांची कर्जे, तसेच लाईट बिल माफ करणे इत्यादी निर्णय घेतले जातात. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या निर्णयावरून, श्रेयवादाची लढाई, केंद्र सरकार तसेच विरोधकांमध्ये सुरू होईल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे आपण खऱ्या अर्थाने लढाई जिंकली? तर तसे नाही. तर आपली देखील काही कर्तव्ये आहेत. उदा : समोरचा माणूस कोणत्याही जाती, धर्म, पंथाचा असो, आपण त्याच्याशी मराठीतूनच बोलले पाहिजे. आकाशवाणी तसेच दूरदर्शनवरून सादर होणाऱ्या मराठी कार्यक्रमातून, इंग्रजी शब्दांचा वापर करणे टाळले पाहिजे. जे आपणास जमत नाही असे नाही. पण ते आपण करत नाही. महानगरपालिका तसेच न्यायालयातून देखील मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे. तात्पर्य हे असे जर कायम राहिले तर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे खऱ्या अर्थाने सार्थक झाले, असे म्हणता येईल?

**- गुरुनाथ मराठे**

# दसरा काढूया!

**'दसरा काढणे 'हा शब्दप्रयोग ग्रामीण तसेच शहरी भागात कसा प्रचलित झाला असेल याबाबत भाषा अभ्यासकांनी जरूर शोध घ्यावा. 'दोसरा काढणे' म्हणजे एखाद्या प्रिय व्यक्तीची ओढ लागणे, त्याच पद्धतीने दसरा काढणे शब्दप्रयोग प्रचलित झाला असावा... तसं पाहिलं तर या दोन्ही शब्दप्रयोगांचा दुरून देखील संबंध जुळत नाही.**

श्री गणेशाला निरोप देऊन आलो की सुरू होतात ते पितृपक्ष! पितृपक्षात लोक आपल्या पूर्वजांचे स्मरण मनोभावे करतात. पितृपक्षांतर वेध लागतात ते स्त्री शक्तीचा जागर करण्याच्या उत्सवाचे म्हणजेच नवरात्राचे! याच उत्सवात घरोघरी घटस्थापना केली जाते. या उत्सवाची सांगता 'दसरा' या हिंदू धर्मातील मुख्य सणाने होते. खरं तर घटस्थापना म्हणजे आपल्या कृषीसंस्कृतीतील बिजांच्या उगवण क्षमतेची परीक्षाच होय. घटस्थापना आणि नवरात्रोत्सव हे दोन्ही 'माता' आणि 'माती' यांच्याशी जोडले गेले असल्यामुळे 'भक्ती' आणि 'भावना' यांचा अनोखा संगम येत्या महिन्याभरात आपल्याला पाहायला मिळणार आहे. आता घरोघरी घटस्थापनेपूर्वी दसरा काढला आहे. म्हणजेच घर स्वच्छता, रंगरंगोटी आणि जाळी जळमटे काढण्याचे काम जोरात सुरू आहे. घरातील कापडं अपटू अपटू धुतली जात आहेत.

वर्षभरात भारतात दोन वेळा उन्हाळा येतो. एप्रिल ते जून असा वसंत आणि ग्रीष्म ऋतूतला कडक आणि कोरडा उन्हाळा खूप जाचक असतो. दुसरा सप्टेंबर महिन्याच्या शेवटी ते दिवाळीदरम्यान शरद ऋतूचा काळ हा देखील उन्हाळ्यापेक्षा कमी नसतो. या उन्हाळ्याला 'ऑक्टोंबर हिट' असं म्हटलं जातं.

रब्बीच्या पेरणीसाठी आवश्यक असणार ऊन या काळात पडत असल्यामुळे याला 'पेरणीचं ऊन'सुद्धा म्हटलं जातं. याच उन्हाचा उपयोग दसरा काढल्यानंतर घरातील ऐन पावसाळ्यात झालेला जंतुसंसर्ग कमी करण्यासाठी आणि साफसफाईसाठी केला जातो.

**विशेष**

**किशोर जाधव**
**९९२२८८२५४१**

उन्हामुळे धुतलेली वापरायची कपडे, अंथरूणं आणि पांघरूणं लवकर वाळतात. घरातील भिंतींना दिलेला रंग पटकन हडकतो. त्याचबरोबर सलग तीन ते चार महिने पावसामुळे नदी, नाले, ओढे पाण्यामुळे ओसंडून वाहत असतात, त्या वाहत्या पाण्याचा उपयोग कपडे धुण्यासाठी केला जातो. घर सफाईच्या कष्टामुळे आणि ऋतू बदलामुळे अनेकांना थकवा येतो. या काळात शरीरातील उष्मा वाढू लागतो. पित्तदोष वृद्धी होते. डोकं दुखणे, उलट्या व जुलाब आणि जुने पित्ताचे आजार या काळात वाढतात. यातच दूषित पाणी पिल्याने पोटाचे विकार देखील वाढल्याचे दिसून येतात. आजारी लोकांच्या गर्दीमुळे दवाखाने गर्दीने फुललेली दिसतात. दसरा काढण्यामुळे वैयक्तिक तसेच घरातील स्वच्छता केली जाते. मात्र, परिसर सफाई करण्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही.

सोशल मीडियावरून दसरा काढण्याचे संदेश अनोख्या पद्धतीने पाठवले जातात. कोण म्हणते, 'मनातील जमलेले वैफल्य,निराशा, चिंता याची जळमटे काढून टाका!' कोणीतरी पाठवतं, पारंपरिक, मागासलेले, खुळचट विचार धुवून टाका! मन मोकळं आणि प्रसन्न करा! मध्येच असाही संदेश येतो, 'आयुष्यातील त्रासदायक, रक्तपिपासू व्यक्ती आणि निरर्थक नात्यांना कचऱ्याप्रमाणे झाडून टाका! चांगल्या नादुरुस्त नात्यांना माफीची दुरुस्ती द्या!' त्यातच असाही एखादा संदेश लक्ष वेधून घेतो - 'धैर्य आणि शौर्याच्या फर्निचरला भीती आणि कमकुवतपणाची लागलेली वाळवी काढून टाकण्यासाठी आत्मविश्वासाचं कीटकनाशक त्यावर फवारा!'

कोणीतरी असाही संदेश फॉरवर्ड करतं - 'मनाच्या भिंतींना सुंदर स्वप्नाचे रंग देऊन त्यावर प्रेरणा व सुंदर आठवणींचे वॉलपेपर लावा!' अशाप्रकारे शहाणपण शिकवणारे संदेश दसरा काढण्यावरून एकमेकास पाठवले जातात. हे खरं आहे की, आपला दसरा आपल्यालाच काढावा लागतो. 'जो दुसऱ्यावर विसंबून बसतो, त्याचा कार्यभाग बुडतो!' या म्हणीप्रमाणे चला आपल्या बाह्य परिसरासोबत अंतर्मनातील दसरा काढूया!

# शक्तीचे तिसरे रूप भगवती चंद्रघंटा देवी

आज नवरात्रीचा तिसरा दिवस असून, या दिवशी दुर्गा देवीचे तिसरे रूप चंद्रघंटाची पूजा केली जाईल. भागवत पुराणानुसार माता दुर्गेचे हे रूप अत्यंत शांत आणि लाभदायक आहे. तिच्या कपाळावर घंटाच्या आकाराचा चंद्रकोर आहे, म्हणून देवीचे नाव चंद्रघंटा आहे. तिसऱ्या चक्रावर विराजमान असलेली माँ दुर्गेची ही शक्ती विश्वाच्या दहा जीवनांचे आणि दिशांना संतुलित करते आणि मोठे साहस प्रदान करते. देवीची उपासना केल्याने भक्त सर्व सांसारिक संकटांपासून सहज मुक्त होऊन सर्वोच्च पदाचे पात्र बनतात. नऊ शक्तींपैकी तिसरे रूप असलेल्या माँ चंद्रघंटा मातेच्या कपाळावर घंटा आकाराचा चंद्र असल्यामुळे तिला चंद्रघंटा म्हणतात. मातेचे शरीर सोन्यासारखे तेजस्वी आहे, ती सिंहावर आरूढ आहे आणि तिच्या दहा हातात विविध प्रकारची शस्त्रे आहेत. सिंहरूढ



माँ चंद्रघंटा युद्धासाठी तयार आहे. तिच्या आगमनाने निघणारा प्रचंड आवाज राक्षसांना घाबरवतो. माता चंद्रघंटाच्या उपासनेने साधकाला अध्यात्मिक शक्ती प्राप्त होते. जो उपासक चंद्रघंटा देवीची पूजा करतो आणि नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी दुर्गा सप्तशतीचे पठण करतो त्याला जगात कीर्ती, बुद्धी आणि मान मिळतो. सिंहावर स्वार असलेल्या या देवीची मुद्रा युद्धासाठी सज्ज व्हावी अशी आहे. अत्याचारी राक्षस, दानव आणि दैत्य त्यांच्या भयानक घंटासारख्या आवाजाने थरथर कापत राहतात. चंद्रघंटाला वाणीची देवी देखील म्हणतात. परंतु भक्तांसाठी आई दुर्गेच्या हे रूप अत्यंत शांत आणि लाभदायक आहे. म्हणूनच त्यांच्या पवित्र मूर्तीचे स्मरण करून सतत साधना केली पाहिजे. नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी चंद्रघंटा मातेच्या पूजेला खूप महत्त्व आहे. या देवीच्या कृपेने साधकाला अलौकिक गोष्टींचे दर्शन होते. दैवी सुगंधांचा अनुभव येतो आणि अनेक प्रकारचे आवाज ऐकू

**नवरात्र**

**नयना बारिया**

येतात. परंतु साधकाने ध्यानाच्या या क्षणांमध्ये अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे. या देवीच्या उपासनेने भक्तामध्ये शौर्य आणि निर्भयता तसेच सौम्यता आणि नम्रता विकसित होते. म्हणून आपण आपले मन, वचन, कृती तसेच आपले शरीर विहित कर्मकांडानुसार शुद्ध करून चंद्रघंटाला शरण जाऊन तिची पूजा करावी. याद्वारे मनुष्य सर्व संकटांतून सहज मुक्त होऊन सर्वोच्च पदाला प्राप्त होऊ शकतो. ही देवी कल्याणकारी आहे.

### माता चंद्रघंटाची कथा

एकदा महिषासुर नावाच्या राक्षसाने स्वर्गावर हल्ला केला होता. त्याने देवराज इंद्राचा युद्धात पराभव केला, स्वर्ग जिंकला आणि स्वर्गावर राज्य करू लागला. युद्धात हरल्यानंतर सर्व देव समस्या सोडवण्यासाठी त्रिदेवा कडे गेले. देवतांनी भगवान विष्णू, महादेव आणि ब्रह्माला सांगितले की, महिषासुराने इंद्र, चंद्र, सूर्य, वायू आणि इतर देवतांचे सर्व अधिकार हिरावून घेतले आहेत आणि त्यांना बंदी करून स्वर्गीय जगावर कब्जा केला आहे. महिषासुराच्या अत्याचारामुळे देवांना पृथ्वीवर वास करावा लागतो. देवतांचे शब्द ऐकून त्रिदेव अत्यंत क्रोधित झाले आणि त्यांच्या मुखातून ऊर्जा बाहेर पडू लागली. यानंतर ही ऊर्जा दहा दिशांना पसरली. त्याच वेळी चंद्रघंटा देवीने तेथे अवतार घेतला. भगवान शिवाने देवीला त्रिशूळ दिले आणि भगवान विष्णूने चक्र दिले त्याचप्रमाणे इतर देवतांनीही चंद्रघंटा मातेला शस्त्र पुरवले. इंद्राने आपली वज्र आईला दिले. सूर्याने मातेला ऊर्जा आणि तलवार दिली. यानंतर चंद्रघंटा मातेला सिंह सवारी देण्यात आली. आई शस्त्रे घेऊन महिषासुराशी लढायला निघाली. चंद्रघंटा मातेचे रूप इतके विशाल होते की तिचे रूप पाहून महिषासुर अत्यंत घाबरला. महिषासुराने राक्षसांना चंद्रघंटा मातेवर हल्ला करण्यास सांगितले. राक्षसाशी लढण्यासाठी सर्वजण मैदानात उतरले. माता चंद्रघंटाने सर्व राक्षसांचा वध केला. चंद्रघंटा मातेने महिषासुराच्या सर्व राक्षसांचा वध केला आणि शेवटी महिषासुराचाही वध केला. अशाप्रकारे चंद्रघंटा मातेने देवतांचे रक्षण केले आणि त्यांना स्वर्गप्राप्तीसाठी मदत केली.

## जनमनाचे प्रतिध्वनी

### इराण-इस्त्राएल संघर्ष जगावर परिणाम

मध्य पूर्वेतील इराण आणि इस्त्राएल यांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे तेलाचे दर ५ टक्क्यांनी वधारले आहेत. या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जगभर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर चिंता व्यक्त केली जात आहे. युद्धाच्या तणावाखाली दोन्ही क्रूड बेंचमार्क मध्ये ५ टक्के वाढ होऊन कच्च्या तेलाचे दर ७५ डॉलर्स प्रति बॅरलवर पोहोचले आहेत. इराण हा तेल निर्यातदार आहे. तेल पुरवठा करणाऱ्या या देशाला मध्य पूर्वेतील संघर्षात सहभागी व्हावे लागल्याने तेल पुरवठा खंडित होण्याच्या शक्यता व्यक्त करण्यात येत आहेत.

जागतिक तेल पुरवठ्यावर खंडित होण्याच्या किंवा कमतरता जाणवू लागल्यास तेलाच्या किमती वाढण्याच्या शक्यता अधिक आहेत. याचे परिणाम होऊन भारतातील पेट्रोल, डिझेलच्या किमती वाढण्याच्या शक्यता आहेत. आयटी क्षेत्रात नरमाई येऊन त्या क्षेत्रांतील कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली आहे. जगात आयटी क्षेत्र आणि त्याच्याशी संबंधित क्षेत्रांतील कंपन्यांच्या व्यवसायांना फटका बसला असून, त्यातील काही कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. त्यापुढे जाऊन त्यातील काही कंपन्या ताळेबंदी करण्याच्या तयारीत आहेत असे चित्र दिसत आहे.

दुसरीकडे सोन्याच्या किमती वाढत चालल्या आहेत. मध्य पूर्वे तील संघर्षापूर्वी जगातील तेलांच्या किमतीत घसरण होत असताना भारतातील इंधन दरांत घट केली गेली नव्हती. युद्ध परिस्थितीमुळे इंधन दरांतील कपात होण्याच्या अपेक्षांऐवजी दर वाढविले जाण्याच्या शक्यता दिसत आहेत. युद्ध जरी मध्य पूर्वेतील देशांत सुरू असले तरी त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होत आहेत.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी**

### अभिमानाचा क्षण

केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून संस्था, संघटना, राजकीय पक्ष तसेच मराठी भाषेवर प्रेम असणाऱ्यांनी केंद्र शासनाकडे सतत मागणी करून या प्रश्नाचे गांभीर्य पटवून दिले. नाशिकला झालेल्या साहित्य संमेलनात देखील आयोजकांनी साहित्यप्रेमींची स्वाक्षरी मोहीम राबवून महत्त्वाचे पाऊल उचलले होते. राज्य शासनाने देखील रंगनाथ पठारे यांच्या संमतीचा अहवाल केंद्राकडे पाठवून पाठपुरावा केला. १४ कोटी महाराष्ट्रीयन मराठी भाषकांच्या दृष्टीने हा एक अभिमानाचा क्षण होय. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे मराठी भाषेचा समृद्ध वारसा आपणास निश्चितच हातभार लागणार आहे. मराठी भाषेचा वापर सर्वत्र झाला तरच खऱ्या अर्थाने हा निर्णय महत्त्वाचा ठरेल.

**-रमेश कडलग, नाशिक**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### आंतरराष्ट्रीय 'पलझिओन २४' प्रकल्प स्पर्धेचे आयोजन




**पुणे :** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी) अभियांत्रिकी महाविद्यालयात ५ ऑक्टोबरपर्यंत पलझिओन २४ या आंतरराष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेचे आयोजन होणार आहे. सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत ही स्पर्धा ऑफलाइन आणि ऑनलाइन पद्धतीने पार पडेल. स्पर्धेत पेपर प्रेसेंटेशन, कोडेक्स यांसह १३ प्रकारचे तांत्रिक उपक्रम असतील. ऍसीएम स्टुडंट्स चॅप्टर आणि इंट्रेप्रेनरशिप डेव्हलपमेंट सेल यांनी या स्पर्धेचे संयोजन केले आहे. पलझिओन २४ ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखली जाते आणि विविध देशांतील विद्यार्थी आणि तंत्रज्ञ यांना नवकल्पना आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने समाजोपयोगी प्रकल्प तयार करण्याची संधी देते. सहभागी संघांनी तांत्रिक व व्यावसायिक समस्या सोडवण्यासाठी आपले कौशल्य दाखवावे लागेल. उद्योग क्षेत्रातील प्रमुख तज्ज्ञ स्पर्धेतील प्रकल्पांचे मूल्यांकन करतील. विजेत्यांना रोख पुरस्कार, प्रमाणपत्रे आणि इंटर्नशिप संधी मिळणार आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक डॉ. पी.टी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. संजय गंधे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापवर्ग काम करित आहेत. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन संगणक विभागप्रमुख डॉ. गीतांजली काळे आणि प्रा. प्रवीण पाटील यांनी केले आहे.

### कुमार प्रॉपर्टीज लाइफस्पेसेस ग्रेटेस्ट ब्रँड आणि लीडर म्हणून सन्मानित

**नाशिक :** रिअल इस्टेट क्षेत्रातील एक अग्रगण्य नाव, कुमार प्रॉपर्टीज लाइफस्पेसेसला दुबईमध्ये झालेल्या एका प्रतिष्ठित सोहळ्यात ग्रेटेस्ट ब्रँड आणि लीडर २०२३-२४ म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. या मान्यतेने भारतभरात अपवादात्मक निवासी आणि व्यावसायिक जागा पुरविण्याच्या कंपनीच्या अविरत वचनबद्धतेला अधोरेखित केले आहे.



कुमार प्रॉपर्टीज लाइफस्पेसेसला दुबईच्या जेडब्लू मॅरियट मार्किस हॉटेलमध्ये झालेल्या २४ व्या आशियाई बिझनेस आणि सोशल फोरम (एबीएस एफ) दरम्यान या मानाच्या नावांमध्ये स्थान मिळाले, जिथे विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी हजेरी लावली होती.या यशावर भाष्य करताना कुमार प्रॉपर्टीज लाइफस्पेसेसचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अमेय इंदरकुमार जैन म्हणाले, 'ग्रेटेस्ट ब्रँड आणि लीडर २०२३-२४' पुरस्कार मिळाल्याबद्दल आम्ही खूप सन्मानित आहोत. ही मान्यता आमच्या समर्पण, कठोर परिश्रम आणि आमच्या विश्वास, विश्वसनीयता आणि गुणवत्तेच्या वारशाचे प्रतीक असलेल्या जागा तयार करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. आम्ही उत्कृष्टता पुरवण्यावर लक्ष केंद्रित करतो आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील मानके सतत पुन्हा परिभाषित करण्यावर कायम असतो. आधुनिक कुटुंबांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, कुमार प्रॉपर्टीज लाइफस्पेसेसने अलीकडेच पुण्यात मोशी येथे पर्व प्रकल्प लाँच केला आहे. या विचारपूर्वक डिझाइन केलेल्या प्रकल्पात २ आणि ३ बीएचके घरे उपलब्ध आहेत, जी गोपनीयता आणि सामुदायिक जीवनाचा समतोल साधतात, तसेच सुयोग्य नियोजन केलेली लेआउट्स आणि शांत अंतर्गत-बाह्य जागा समाविष्ट करतात.कुमार लाइफस्पेसेसने पुण्याच्या रिअल इस्टेट क्षेत्रात एक विश्वासार्ह नाव म्हणून आपली स्थापना केली आहे, प्रिन्सविले, कुमार प्रथम, कुमार सिद्धाचल, कुमार पाम्स्प्रिंग्स, कुमार प्रॉस्पेरा, कुमार सिएना आणि कुमार पॅसिफिक मॉल यांसारख्या प्रकल्पांची सतत डिलिव्हरी करत आहे, जे समुदाय, कल्याण आणि समृद्ध जीवनशैलीला प्रोत्साहन देतात.

# आयटीसी सनफिस्टचा मुलांसाठी बिग फँटसीज उपक्रम

## निवडक मुलांची नासाला भेट देण्याची कल्पना पूर्ण होईल

**नाशिक : रोजच्या क्षणांना खास अनुभवांमध्ये बदलण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या, भारतातील सर्वांत आवडत्या बिस्किट ब्रँडपैकी एक असलेल्या, आयटीसी सनफिस्ट डार्क फॅन्टसीने, बिग फँटसीज: गिव्ह विंग्स टू युअर इमॅजिनेशन या नावीन्यपूर्ण उपक्रमाची अभिमानाने घोषणा केली. या उपक्रमाद्वारे या ब्रँडचा उद्देश तंत्रज्ञानासह कलेचे मिश्रण करून मुलांमध्ये असलेल्या रचनात्मकता आणि कल्पनाशक्तीला जागृत करणे आहे.**



हा अनोखा आणि दूरदर्शी उपक्रम सेंट जोसेफ स्कूल, बेंगळुरू येथे मुले, त्यांचे पालक आणि सन्मानित पाहुण्यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात मुलांच्या कल्पनेला जागृत करण्याचे महत्त्व या विषयावर सविस्तर पॅनेल चर्चा देखील झाली ज्यामध्ये अंतराळ संशोधन, शिक्षण, मानसशास्त्र आणि रचनात्मक कला या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचा समावेश होता. पॅनल चर्चेसाठी अतिथी वक्त्यांमध्ये सुश्री मंदिरा बेदी, श्री प्रकाश राव (इस्रोचे माजी संचालक), डॉ. मेघा महाजन (डीएम-निमहंस) आणि रेव्ह. फादर रोहन डी'अल्मेडा (प्रिन्सिपल, सेंट जोसेफ स्कूल) यासारख्या नामांकित व्यक्तींचा समावेश होता. कल्पनाशक्ती हा मुलाच्या सर्वांगीण विकासाचा एक मूलभूत पैलू कसा आहे आणि ते रचनात्मकता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्ये कसे वाढवते, जे त्यांना नवीन कल्पना प्रज्वलित करण्यास आणि आव्हानांचा सामना करण्यास कशी मदत करते यावर पॅनेलने प्रकाश टाकला. इस्रोचे माजी संचालक श्री प्रकाश राव यांनी रचनात्मकता आणि तंत्रज्ञान यांच्यातील समन्वय आणि भावी पिढ्यांना घडवण्यात कल्पनाशक्तीच्या भूमिकेबद्दल सांगितले.

अली हॅरिस शेरे, सीओओ, बिस्किट्स आणि केक्स क्लस्टर, फूड्स डिव्हिजन, आयटीसी लिमिटेड नवीन उपक्रमाच्या शुभारंभावर भाष्य करताना म्हणाले, आयटीसी सनफिस्ट डार्क फॅन्टसीमध्ये, आमचा असा विश्वास आहे की मुलांचे जीवन बदलण्यासाठी कल्पकता आणि कल्पनेची शक्ती महत्त्वपूर्ण आहे. 'बिग फँटसीज'द्वारे भारतात यापूर्वी कधीही न पाहिलेले तंत्रज्ञान आणण्याचा आम्हाला अभिमान वाटतो, जे मुलांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी एक अनोखा प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देते. देशभरातील तरुणांच्या मनात आश्चर्य आणि नवनिर्मितीचा उत्साह निर्माण करण्यास आम्ही उत्सुक आहोत, जे त्यांना मोठे झाल्यावर अमर्यादित संधीचा शोध घेण्यासाठी प्रेरणा देईल.

हा अनोखा उपक्रम फँटसी स्पेसशिपच्या माध्यमातून मुलांमध्ये अमर्याद कल्पनाशक्ती निर्माण करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्याची इच्छा बाळगतो. ही एक विशाल इंटरएक्टिव्ह स्क्रीनने सुसज्ज असलेली बस आहे जी संपूर्ण भारतातील शाळांमध्ये जाईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या संयोगाने समर्थित, हा उपक्रम मुलांच्या हाताने काढलेल्या डिझाईन्सचे त्यांचे मूळ आकर्षण कायम ठेऊन व्हायब्रंट डिजिटल क्रिएशनमध्ये रूपांतर करते. एकदा स्कॅन केल्यावर, त्यांची कलाकृती डिजिटली ३ऊ इंटरएक्टिव्ह वर्णांमध्ये बदलली जाईल, जे कल्पनारम्य अंतराळयानाच्या आत मोठ्या टच स्क्रीनवर प्रदर्शित केले जाईल. या मोहिमेची सुरुवात बेंगळुरूपासून होणार असून, लवकरच ती राष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येणार आहे. या नवीन उपक्रमाद्वारे, देशभरातील मुलांची 'कल्पना' जागृत करणे हे या ब्रँडचे उद्दिष्ट आहे. कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे मिश्रण करून हा कार्यक्रम संपूर्ण भारतातील मुलांसाठी एक अनोखा अंतराळ अनुभव निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आला आहे ज्यामध्ये ते त्यांच्या कल्पनेचे वास्तवात रूपांतर करताना दिसतील. एक जादुई ट्विस्टसाठी, सनफिस्ट डार्क फॅन्टसीने कार्यक्रमादरम्यान एक मोठी भेट दिली, ज्यामध्ये निवडक मुलांना नासामध्ये जाण्याची संधी देण्यात आली, जिथे ते अंतराळ संशोधनाच्या खऱ्या जगात त्यांची स्वप्ने साकार होताना पाहू शकतील.

# ॲक्सिस निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंड लाँच

**नाशिक : प्रतिनिधी**

ॲक्सिस म्युच्युअल फंड हा भारतातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या आणि प्रमुख फंड घराण्यांपैकी एक असून, कंपनीने त्यांच्या - क्सिस निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंड - या नवीन फंडची घोषणा केली. या ओपन-एंडेड इंडेक्स फंडाचे उद्दिष्ट निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० टोटल रिटर्न इंडेक्स (टीआरआय) च्या कामगिरीची प्रतिकृती बनविणे आहे. या निधीचे व्यवस्थापन श्री. कार्तिक कुमार आणि श्री. हितेश दास करणार आहेत. ही नवीन फंड ऑफर (एनएफओ) ४ ऑक्टोबर २०२४ ते १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत खुले राहील. या निधीचे व्यवस्थापन कार्तिक कुमार आणि हितेश दास करणार आहेत.

ॲक्सिस एएमसीचे एमडी आणि सीईओ बी. गोपकुमार म्हणाले, फॅक्टर गुंतवणुकीच्या बाबतीत भारत अजूनही सुरुवातीच्या टप्प्यात आहे, या थीमला गुंतवणूकदारांमध्ये अलीकडेच मान्यता मिळाली आहे. आमचा उद्देश नेहमीच गुंतवणूकदार केंद्रित गुंतवणूक समाधाने प्रदान करणे हा आहे. आमचा नवीनतम फंड, क्सिस निफ्टी५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंड गुंतवणूकदारांना तुलनेने कमी किमतीत टू टू लेबल व्हॅल्यू धोरणात सहभागी होण्याचा एक सोईस्कर मार्ग प्रदान करतो.

वैविध्यपूर्ण एक्सपोजर, कमी खर्च, दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याचे उद्दिष्ट हे या क्सिस निफ्टी५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंडाचे प्रमुख गुणधर्म आहेत. या योजनेत किमान रुपये १०० आणि त्यानंतर रु. १ च्या पटीत गुंतवणूक करता येईल. जून आणि डिसेंबरमध्ये अर्धवार्षिक आधारावर निर्देशांक पुन्हा संतुलित केला जाईल. ॲक्सिस एएमसीचे मुख्य गुंतवणूक अधिकारी आशिष गुप्ता म्हणाले की, भारतातील तुलनेने नवीन श्रेणी असूनही, घटक-आधारित गुंतवणूक ही एक आशादायक जागा आहे आणि केवळ ४ वर्षांत ती ३०० कोटींवरून ३०,००० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. मूल्य गुंतवणूक ही घटक-आधारित गुंतवणुकीचा एक भाग आहे, ज्याची रचना गुंतवणूकदारांना दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांच्या मूल्यांकनाच्या पटीत आकर्षक असलेल्या ५० समभागांमध्ये एक्सपोजर मिळविण्याची संधी देते.



# ओरा फेस्टिव्ह फिएस्टाची दागिने व आकर्षक ऑफर्स

**नाशिक : प्रतिनिधी**

**✻ आकर्षक मंगळसूत्र आणि पेंडण्ट सेट्सचे अनावरण**
**✻ ग्राहकांना हिऱ्यांच्या दागिन्यांवर जवळपास २५ टक्के सूटचा आणि ० टक्के व्याजदरामधील ईएमआयसह फायनान्सचा आनंद घेऊ शकतात**



सणासुदीचा काळ सुरू होण्यासह नवरात्री व दसरा सण जवळच आले असताना ओरा फाइन ज्वेलरने आपल्या नवीन फेस्टिव्ह कलेक्शन्सचे अनावरण केले आहे, ज्यामध्ये अप्रतिम हिरेजडित मंगळसूत्रांचा समावेश आहे, ज्यामधून या उत्साहपूर्ण सणांची मोहकता व परंपरा दिसून येते. ग्राहकांची त्यांच्या ट्रेण्डी फेस्टिव्ह लुकमध्ये अधिक आकर्षकतेची भर करण्याची इच्छा असताना ओराने हिऱ्यांचे पेंडण्ट सेट्स आणले आहेत, जे कलेतील मोहकता आणि पारंपरिक डिझाइनला सादर करतील. ज्यामुळे त्यांच्या लुकमध्ये अधिक आकर्षकतेची भर होण्यासोबत उत्सवी आनंदामध्ये अधिक उत्साहाची भरदेखील होईल. आकर्षक हिऱ्यांच्या डिझाइन्सपासून लक्ष वेधून घेणाऱ्या दागिन्यांपर्यंत ओराने आधुनिक काळातील महिलांच्या गरजा लक्षात घेत प्रत्येक दागिना डिझाइन केला आहे.

ओरा नवीन कलेक्शन अप्रतिम मंगळसूत्र देखील सादर करत आहे, ज्यामध्ये आधुनिक लक्झरी व कलेतील परंपरेचे उत्तम संयोजन आहे आणि बारकाईने तयार करण्यात आलेली प्रत्येक डिझाइन या उत्सवी साजरीकरणादरम्यान महिलांना परिधान करण्यासाठी परिपूर्ण आहे. चमकणारे हिरे व सुंदर सुवर्णकामासह सजलेले, तसेच आकर्षकता व संस्कृतीचे परिपूर्ण संतुलन असलेले नवीन मंगळसूत्र कलेक्शन यंदाच्या सीझनमधील उत्सवी लुकला अधिक लक्षवेधक करेल. याला पूरक असे आकर्षक हिऱ्याचे पेंडण्ट्स आहेत. नाजूक कलाकृती व आकर्षक हिऱ्यांसाठी ओळखले जाणारे हे पेंडण्ट्स त्यांच्या किमान, पण लक्षवेधक ग्लॅमरसह कोणत्याही लुकला अधिक आकर्षक करतील. प्रत्येक पेंडण्टमधून नवरात्री व दसरा सण साजरीकरणासाठी अधिक आकर्षकतेची खात्री मिळेल.

अधिक उत्साहाची बाब म्हणजे यंदा सणासुदीच्या काळात ओरा बहुमूल्य ग्राहकांना विशेषतः उत्सवी सीझनसाठी बनवण्यात आलेली डिझाइनर सेट्सची विशेष श्रेणी, तसेच अभूतपूर्व स्पेशल ऑफर्सचा आनंद घेत स्टाइलमध्ये सण साजरा करण्याचे आवाहन करत आहे. विशेष ऑफर्सचा लाभ घेण्यासाठी जवळच्या ओरा फाइन ज्वेलरी स्टोअरला भेट द्या. विशेष ऑफर्स पुढीलप्रमाणे: हिऱ्यांच्या दागिन्यांवर जवळपास २५ टक्के सूट- सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २५ टक्के सूट - ० टक्के व्याजासह ईएमआय - जुन्या सोन्याच्या दागिन्यांवर ० टक्के कपात ✻अटी व शर्ती लागू ✻ ही मर्यादित कालावधीची ऑफर सध्या फक्त नवरात्री आणि दसरा सणादरम्यान उपलब्ध आहे.

# सोनी सबवरील कलाकार सांगत आहेत त्यांच्या नवरात्रीच्या आठवणी आणि परंपरा

**मुंबई :**

नवरात्रीचा सण आला आहे आणि सोबत अनेक देशवासीयांसाठी आनंद, भक्ती आणि हर्षोल्लास घेऊन आला आहे. वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक असलेल्या या सणाच्या निमित्ताने दुर्गामातेची पूजा आणि भक्ती केली जाते. भारतीयांच्या मनात या पर्वाचे विशेष स्थान आहे.


सोनी सबवरील कलाकार नवरात्र साजरी करण्याचे आपले संस्मरणीय अनुभव शेअर करत आहेत. कुटुंबासोबत उपवास करण्यापासून ते रात्रभर गरब्याच्या लयीत धुंद होण्याच्या या आठवणी या पर्वाचे वैशिष्ट्य आणि लोकांच्या मनातील या उत्सवाचे स्थान याचे प्रतिबिंब दर्शवितात.



'श्रीमद् रामायण' मालिकेत सीतेची भूमिका करणारी प्राची बंसल म्हणते, माझ्या मनात नवरात्रीचे विशेष स्थान आहे. माझी आई नेहमी पूजा करते आणि लहानपणापासून मी देवी मातेची भक्त आहे. आईसोबत उपवास करणे, कुमारिका भोजन घालणे या माझ्या आठवणी आहेत. यावर्षी 'श्रीमद् रामायण' च्या शूटिंगमुळे मला मैत्रिणींसोबत गरब्याच्या रात्री जागवता येणार नाहीत, पण तरीही नवरात्रीची सकारात्मक ऊर्जा आणि देवीची भक्ती यामुळे हा सण लक्षणीय ठरतो.



वागले की दुनिया मालिकेत वंदनाची भूमिका करणारी परिवा प्रणती म्हणते, नवरात्रीमुळे सगळीकडे हर्षोल्लासाचे वातावरण निर्माण होते, ते मला खूप आवडते. माझ्यासाठी, सर्व प्राणीमात्रांविषयी करुणा भाव ठेवणे हे या उत्सवाचे सार आहे. मला शांततेत ईश्वराशी जवळीक साधताना आनंद मिळतो. माझ्या आई-वडीलांच्या घरी हवन असते, ज्यामुळे पवित्र वाटते. या नऊ दिवसांत एक आनंद आणि ऊर्जा भरलेली असते, जी मला फार आवडते.



'बादल पे पांव है' मालिकेत पूनम खन्नाची भूमिका साकारणारी शेफाली राणा म्हणते, नवरात्र हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक सलोख्याचा सण आहे. नवरात्रीत मी फुले, रांगोळी आणि दिव्यांनी घर सजवते आणि पारंपरिक पदार्थ बनवते. दुर्गा माता ही स्त्री शक्तीचे स्वरूप आहे. गरब्याच्या आणि दांडियाच्या माध्यमातून तिची आराधना करताना मला आनंद मिळतो. नवरात्र केवळ आनंद साजरा करण्याचा सण नाही, तर स्त्रीचे दिव्यत्व, तिचे सामर्थ्य आणि दुर्गुणांवर सद्गुणांचा विजय साजरा करण्याचा उत्सव आहे. समाजाशी एकरूप होऊन आध्यात्मिक उन्नती साधण्याचा हा सण आहे.

# रोजगार ॲप : ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराची नवी संधी



**ग्रामीण भागातील बेरोजगारांना स्थिर आणि सुरक्षित रोजगार मिळवून देणे ही देशातील एक मोठी समस्या आहे. अशा परिस्थितीत डिजिटल साधनांचा वापर करून कामगारांना योग्य रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरते. याच उद्देशाने विकसित केलेले रोजगार ॲप हे एक अत्यावश्यक डिजिटल साधन ठरत आहे. नोकरी डॉट कॉम, मॉन्स्टर डॉट कॉम आणि फ्रेशर्स वर्ड यांसारख्या शहरी भागातील कामगारांसाठी तयार करण्यात आलेल्या प्लॅटफॉर्मसारखेच रोजगार ॲप ग्रामीण भागातील अशिक्षित वा कमी शिकलेल्या अकुशल मजुरांसाठी एक सोयीस्कर माध्यम म्हणून पुढे आले आहे.**

ग्रामीण भागात मुख्यतः शेती आणि शेतीपूरक व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणात मजुरांची आवश्यकता असते. मात्र, मजुरांना योग्य आणि वेळेवर काम मिळणे, हे खूप मोठे आव्हान असते. शेतकऱ्यांना कामासाठी वेळेवर मजूर मिळणे किंवा शेतकऱ्यांना आवश्यक ते मजूर उपलब्ध होणे हे देखील एक मोठे आव्हान ठरते. या समस्येवर उपाय म्हणून रोजगार ॲप तयार करण्यात आले आहे. योगेश गेनबा चव्हाण, हे ग्रामीण भागातील युवक, आपल्या परिसरातील कामगार समस्यांचा विचार करून या ॲपच्या माध्यमातून हा मुद्दा सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. रोजगार ॲपच्या माध्यमातून शेतकरी, लघु उद्योग व्यावसायिक आणि इतर कामांची गरज असणारे लोक सहजपणे स्थानिक मजुरांशी संपर्क साधू शकतात. शेतकरी आपल्या ओळखीच्या लोकांपुरते मर्यादित न राहता पंचक्रोशीतील कोणत्याही मजुरांशी संपर्क साधू शकतात, ज्यामुळे शेतीकामे वेळेवर पूर्ण होण्यास मदत मिळते. दुसरीकडे, मजुरांनाही रोजच्या रोज काम मिळण्याच्या शक्यता वाढतात.

### विविध क्षेत्रांतील संधी

शेतीव्यतिरिक्त ग्रामीण भागातील अनेक व्यवसायांमध्ये अकुशल मजुरांची आवश्यकता आहे. बांधकाम, लघुउद्योग, कारखाने, आणि इतर व्यवसायांमध्ये रोजच्या रोज कामाची मागणी असते. रोजगार ॲप हे सर्व कामांसाठी उपयुक्त असून, यामुळे मजुरांना विविध क्षेत्रांत रोजगार मिळवण्याची संधी मिळते. विशेषतः शेतीच्या कामांमध्ये मजुरांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते आणि रोजगार ॲप यासाठी एक उत्तम पर्याय ठरतो.



### ॲपचा वापर आणि सोय

रोजगार ॲपचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना डिजिटल प्रणालीशी जोडणे. अनेक अशिक्षित वा कमी शिकलेल्या व्यक्तींना काम शोधण्यासाठी माध्यम मिळवणे कठीण जाते, मात्र रोजगार ॲप हे अडथळे दूर करून त्यांना सोपे, सुरक्षित आणि सहज वापरण्यासारखे तंत्रज्ञान उपलब्ध करून देते. शेतकऱ्यांना आणि कामाच्या शोधात असणाऱ्या मजुरांना एकत्र आणून, हे ॲप एकत्रित संपर्क साधण्याचे साधन ठरते. मजुरांना त्यांच्या भागातील उपलब्ध कामांची माहिती मिळते आणि शेतकरी किंवा व्यावसायिक थेट त्यांच्याशी संपर्क साधू शकतात.

### प्रादेशिक भाषेतील उपलब्धता

ग्रामीण भागातील बहुतांश लोक हे शिक्षणात कमी असलेल्या वर्गात येतात. अशा परिस्थितीत इंग्रजीत ॲप वापरणे त्यांच्या दृष्टीने कठीण ठरते. त्यामुळे रोजगार ॲप हे मराठीसह इतर प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे कोणत्याही मजुराला आपल्या कामाची नोंदणी करणे आणि काम शोधणे सोपे होते. हे ॲप विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण भागात तयार करण्यात आले असले तरी, त्याचे संपूर्ण ग्रामीण भारत भर वापर वाढण्याची शक्यता आहे. अशा ॲपच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध होणार आहेत.

### डिजिटल प्रणालीचा फायदा

रोजगार ॲपची खासियत म्हणजे ते ग्रामीण भागातील मजुरांना त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्य मिळवण्यासाठी एक प्रभावी साधन ठरते.

**योगेश हांडगे**
**९४२३०७७९६३**

चीज कष्टाचे, दाम घामाचे या म्हणीप्रमाणे, या ॲपच्या माध्यमातून मजुरांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळण्याची हमी दिली जाते. यामुळे रोजगाराची गुणवत्ता वाढते आणि मजुरांची आर्थिक परिस्थिती सुधारते. शिवाय, रोजगार ॲपमुळे मजुरांना नियमित काम मिळत असल्यामुळे त्यांचे स्थिर उत्पन्न वाढते, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर होतो.

### रोजगार ॲपचा विस्तार

रोजगार ॲपचा उद्देश केवळ महाराष्ट्रातील भागापुरता मर्यादित नसून, संपूर्ण ग्रामीण भारतभर हे ॲप व्यापक स्तरावर वापरण्याचा मानस आहे. योगेश गेनबा चव्हाण यांच्या या उपक्रमाने ग्रामीण भागातील बेरोजगार आणि अकुशल मजुरांना एक नवी संधी दिली आहे, जी भविष्यात संपूर्ण देशभरात लागू होऊ शकते.

### नोंदणी प्रक्रिया

रोजगार ॲपचा वापर करण्यासाठी सर्वांनी गुगल प्ले स्टोअरवरून ॲप डाउनलोड करून नोंदणी करणे आवश्यक आहे. या नोंदणी प्रक्रियेमुळे मजुरांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कामे मिळतात, तर शेतकरी व अन्य व्यवसायांना योग्य मजूर मिळवणे सोपे होते.

### उपक्रमाचे परिणाम

योगेश गेनबा चव्हाण यांनी हा उपक्रम ग्रामीण भागातील समस्या ओळखून तयार केला आहे. रोजगार ॲपमुळे शेतकरी व मजुरांना नवा रोजगार मिळवणे सोपे झाले आहे. हे ॲप केवळ एका भागापुरते मर्यादित न राहता संपूर्ण ग्रामीण भारतातील मजुरांसाठी एक क्रांतिकारी साधन ठरण्याची शक्यता आहे.

अधिक माहितीसाठी आणि शंका निरसनासाठी खालील संपर्क माध्यमांचा वापर करावा: B©'ob: inforojagaar.in. मो. ९८९०१२६८४५ वेबसाइट : rojagaar.in

सर्वांनी रोजगार ॲप प्ले स्टोअरवरून डाउनलोड करून नोंदणी करण्यासाठी खालील लिंकला भेट द्यावी : https://play.google.com/store/apps/details?id=in.rojagar.twa



ऐश्वर्या गायकवाड, येवला | सुवर्णा पगार, सातपूर | अनिता देशमाने, नाशिक | भक्ती अहिरे, आरटीओ ऑफिस | भारती गायकवाड, नाशिक | अर्चना डुंबरे | देवशाला काकडे, पंचवटी | धनश्री गायधनी | गीता शामसुका, पंचवटी | जयश्री जोशी, पाथर्डी फाटा | जयश्री राऊत नाशिक



कविता नागरे, नाशिक | किरण मोरे, म्हसरूळ | किरण वाघ, संगमनेर | कुसूम सोनार, सिन्नर | मंगल काकड, पंचवटी | मेघना नाठे, काठेगल्ली | पद्मा चौरे, गोविंदनगर | पद्मा खारीवाल, नाशिक | प्रिया खैरनार, सटाणा | पूजा बर्वे, पंचवटी | पुष्पा लोहिया, नाशिक



राजश्री बोडके, नाशिक | रक्षा परदेशी, नाशिक | संगीता अलई, नाशिक | संगीता साळवे, नाशिकरोड | सारिका पंडित, खुटवडनगर | सरला सानप, नाशिक | सविता फडोळ, नाशिक | सविता पावटेकर | कविता निकम, | शीतल कोचर | शीतल राठी, नाशिक



शिवन्या निमसे, नाशिक | सोनल दाते, सातपूर | छाया संधान | तेजस्वीनी गडाख, गोविंदनगर | उषा झाल्टे, सिडको | वैशाली मांडरे, नाशिक | वैशाली सौंदाणे, नाशिक | वैष्णवी काचौपा, नाशिक | वर्षा भावसार, सातपूर | वर्षा साठे, नाशिक | विजया साबळे, नाशिक



योगिता येवले, सटाणा | आसावरी मांडवलेकर | आशा तांदळे, पंचवटी | आशा येवले, सटाटा | अलका खोडे, नाशिक | अमृता चव्हाण, नाशिक | अनिता कुलकर्णी, पंचवटी | अपूर्वा शिंदे, नाशिक | अरूणा पिंगळे, गंगापूररोड | अस्मिता हिंडे, नाशिक | भारती झाल्टे, मखमलाबाद



गायत्री भटमुळे, पंचवटी | गायत्री नागरे, नाशिकरोड | हेमांगी कुलथे, हिरावाडी | हिरा सानप, आरटीओ | ज्योत्स्ना शाह, नंदूरबार | काजल घोटेकर | कोमल निसाळ, नाशिक | डॉ. किर्ती वर्मा | कविता वारघडे, नाशिक | ललीता आडके, नाशिक | लता निकम, पाथर्डी रोड



मनीषा फलक, गंगापूररोड | मंजूषा नेरकर | मोनाली हारदे, मखमलाबाद | माधुरी ठोंबरे | नलिनी गांगुर्डे, आंबेवणी | नेहा आंब्रेकर, इंदिरानगर | निकिता गरूड, तांबोळीनगर | पल्लवी बोडके, पंचवटी | ज्योती जॉर्ज, देवळाली कॅम्प | प्रतिभा बाचकर, दिपालीनगर | सुवर्णा पाटील नाशिक



प्रियंका देशपांडे, नाशिक | प्रियंका रणमाळे, सिन्नर | पूर्वा विसपूते, नाशिक | राजेश्वरी केदारे, नाशिकरोड | रुपाली भावरे, नांदूरनाका | सलोनी पूरकर | संध्या मोरे, गोंडेगाव | संगीता शिरूडे, इंदिरानगर | सरला बोराडे, पाथर्डीफाटा | सरोज खेडगांवकर | सविता गुंजाळ



शारदा दाभाडे, धुळे | शिखा जैन, अशोकस्तंभ | शिला दिवटे, नाशिक | शोभा सेरा, सिन्नर | स्नेहल येवला, सटाणा | स्वाहा पवार, इंदिरानगर | सोनाली पवार, सिन्नर | सोनाली ठाकूर, नाशिक | श्रद्धा देशमुख, नाशिक | सुनीता राठोड, नाशिक | सुनंदा अहिरे, इगतपुरी



सूरेखा बधान, नाशिक | स्वाती पवार | तृप्ती परदेशी, पंचवटी | वैशाली खैरे | पायल मोरे सायखेडा | वैशाली बागूल, सिडको | वनिता ढोन्नर | वर्षा कोकाटे, सोमठाणे | विमल गोडे, रोहिणीनगर | वृषाली खांडबहाले, विद्यानगर | योगीता जाधव, पंचवटी.

## महत्त्वाचे

### वडिलांच्या दशक्रिया विधीनिमित्ताने वृक्षारोपण



**दिंडोरी : प्रतिनिधी**

मोहाडी (ता. दिंडोरी) येथील माणिकराव काशीनाथ जाधव यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पत्नी सुमनबाई जाधव, मुलगा संजय जाधव व संतोष जाधव, मुलगी प्रतिभा गायकवाड (साक्री) यांनी आपल्या वडिलांचा अंत्यविधी पर्यावरणाला पूरक असे लाकूड न वापरता गायीच्या शेणीच्या गवऱ्याने केला. तसेच दशक्रिया विधीनिमित्त सह्याद्री देवराई-गोपालकृष्ण येथे झाडांच्या रूपात त्यांच्या निसर्गरूपी स्मृती जतन करून ठेवण्यासाठी जाधव परिवाराच्या वतीने दुर्मिळ देशी प्रजातीच्या झाडांची लागवड केली. या वृक्षलागवडीच्या माध्यमातून जाधव परिवाराने व उपस्थित नातेवाईक, ग्रामस्थांनी त्यांना खऱ्या अर्थाने शाश्वत अशी हरित श्रद्धांजली अर्पण केली व देवराईस भेट देऊन इतरांनाही आवाहन केले की, आपणही आपल्या प्रत्येक सुखदु:खाच्या क्षणी वृक्षलागवड करून भविष्यासाठी शाश्वत आठवणी ठेवून निसर्ग जपूया. जाधव परिवाराच्या या पुढाकारामुळे इतरांनाही वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाच्या या चळवळीत सामील होण्याची व पर्यावरण संरक्षणात आपले योगदान देण्याची प्रेरणा निश्चित मिळेल.

### ठाकरे गट शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुखपदी चौधरी

**इगतपुरी : प्रतिनिधी**

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचा प्रचंड प्रभाव व जनसेवेच्या कामाचा छंद आणि



सामाजिक कार्यात तन-मन-धनाने काम करण्याची सवयीने इगतपुरी तालुक्यात काम करणारे हाडाचे शिवसैनिक कुलदीप चौधरी यांची ठाकरे गटाच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षप्रमुखपदी निवड झाली आहे. कुलदीप चौधरी यांनी तालुकाप्रमुखपदाची धुराही संभाळली आहे. कोविड काळात रुग्णांच्या सेवेसाठी त्यांनी खूपच मोलाचे सहकार्य केले आहे. इगतपुरी व घोटी ग्रामीण रुग्णालयात दाखल असलेल्या कोविड रुग्णांसाठी जेवण, नाश्ता, चहा आदींची व्यवस्था विनामूल्य उपलब्ध करून दिली होती. त्यांच्या या कामाची दखल घेऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने नाशिक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, यामध्ये कुलदीप चौधरी यांना थेट उपजिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली. कुलदीप चौधरी यांची उपजिल्हाप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल माजी आमदार निर्मला गावित, लोकसभा समन्वयक निवृत्ती जाधव, तालुकाप्रमुख राजाभाऊ नाठे, कचरू पा. डुकरे, संदीप शहाणे, माजी सभापती सोमनाथ जोशी, माजी उपसभापती विठ्ठल लंगडे, माजी तालुकाप्रमुख भगवान आडोळे, नंदलाल भागडे, अशोक सुरुडे, सुनील चुंबळे, इम्तियाज सय्यद, हनमंता गायकवाड, अनिल काळे, विक्रम मुनोत, गणेश काळे, जगन म्हसणे, जनार्दन भोईर, नीलेश छत्रे आदींसह तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

### दिंडोरी शहरात गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

**दिंडोरी : प्रतिनिधी**



स्वच्छ्ता ही सेवा, स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ स्वीप कार्यक्रमांतर्गत दिनांक- २ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंती दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी प्रतिमेस अभिवादनानंतर दिंडोरी बसस्थानक व बाजार पटांगण येथे मुख्याधिकारी संदीप चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडोरी शहरात प्रभावीपणे जनजागृती व्हावी याकरिता स्वच्छता मोहीम व मतदान शपथ घेण्यात आली. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी पोलीस निरीक्षक शेगर, नगरपंचायतीचे नगराध्यक्षा सुनीता लहांगे, उपनगराध्यक्षा शैलाताई उफाडे, नगरसेवक नितीन गांगुर्डे, गणेश बोरस्ते, समाजसेवक रंजित देशमुख, हेमंत पगारे, अनिकेत बोरस्ते, प्रशासकीय अधिकारी विजय देवरे, स्वच्छता निरीक्षक महेंद्र कांदळकर, लेखापाल नागेश भालेराव, लेखापरीक्षक अविक्षित बैरागी, शहर समन्वयक पुरुषोत्तम जाधव, लिपिक सचिन जाधव, हर्षल बोरस्ते, राजेंद्र खिरकाडे, राजेंद्र गायकवाड, अमोल मव्हाळ, रामभाऊ चारोस्कर, आत्माराम ओढेकर, तानाजी निकम, रमेश सोनवणे, अशोक गांगुर्डे आदी कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, इतर नागरिक उपस्थित होते.

### भाटगाव येथे किरकोळ कारणावरून एकास मारहाण

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील भाटगाव येथे बुधवारी दि. २ रोजी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास एकास किरकोळ कारणावरून लाकडी बांबूने मारहाण करणाऱ्या दोघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. चांदवड तालुक्यातील भाटगाव येथे शेतात ट्रॅक्टर घालू नको,असे सांगितल्याचा राग आल्याच्या कारणावरून विश्वनाथ पोटे यांना लाकडी बांबूने मारहाण करून दुखापत केल्याने त्यांनी वडनेरभैरव पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार शरद पोटे, दत्तू पोटे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यात्रकरणी अधिक तपास पोलीस हवालदार सानप करीत आहेत.

# कळवण उपजिल्हा रुग्णालयात सीटीस्कॅन मशीनचे लोकार्पण

## उपजिल्हा रुग्णालयात बालरुग्णालय, डायलिसिस सेंटरसाठी प्रयत्नशील : आ. नितीन पवार

**कळवण : वार्ताहर**
**आदिवासी व ग्रामीण भागातील रुग्णांना कळवण उपजिल्हा रुग्णालयात कार्यान्वित करण्यात आलेल्या सी.टी. स्कॅन मशीनचा फायदा होणार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी कळवण उपजिल्हा रुग्णालयात १०० खाटांचे बालरुग्णालय व डायलिसिस सेंटर सुरू करण्यासाठी आपला प्रयत्न आहे.**



या संदर्भातील प्रस्ताव शासनस्तरावर अंतिम टप्प्यात असल्याचे प्रतिपादन आमदार नितीन पवार यांनी व्यक्त केले.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन व क्रस्ना डायग्नोस्टिक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने कळवण उपजिल्हा रुग्णालयात सीटीस्कॅन मशीन सुविधाचे लोकार्पण आमदार नितीन पवार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष कौतिक पगार, बाजार समितीचे सभापती धनंजय पवार, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, माणिक देवरे, बाह्य संपर्क अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी, डॉ. अनंत पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. हेमंत पवार, डॉ. परिमल सावंत, कपिल देशमुख, शशिकांत बागुल उपस्थित होते.

आमदार पवार म्हणाले की, सीटीस्कॅन सुविधा कार्यान्वित करण्यासाठी शासनस्तरावर आपला पाठपुरावा सुरू होता. अखेर ही सुविधा कार्यान्वित झाल्याने याचा फायदा कळवणसह शेजारील तालुक्यातील गोरगरीब, सर्वसामान्य रुग्णांना होणार आहे. कळवण उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर प्रस्तावित असून, ते लवकरात लवकर सुरू करण्याचा आपला प्रयत्न आहे. शंभर खाटांचे बालरुग्णालयाचा प्रस्ताव शासनस्तरावर सादर केला असून, अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे आगामी काळात बालरुग्णालय, डायलिसिस सेंटर सुरू करण्यात येईल, असे आश्वासन आमदार नितीन पवार यांनी यावेळी दिले. डॉ. परिमल सावंत, राजेंद्र भामरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. अनंत पवार यांनी केले. सूत्रसंचालन राकेश हिरे यांनी केले. आभार प्रकाश आहेर यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. पंकज जाधव, प्रशासकीय अधिकारी कोकणी, प्रतिभा पाटील, मुख्य अधिसेविका वामोरकर, धीरज टाक, अमित धारक, अक्षय भुते आदींसह अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.



## आरपीआयचे अण्णासाहेब कटारेंनी घेतली सुप्रियाताई सुळेंची भेट

**येवला : प्रतिनिधी**
**राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या तथा खा. सुप्रियाताई सुळे यांची पुणे येथे भेट घेतली.**

सदर भेटीत अण्णासाहेब कटारे यांनी होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीसंदर्भात राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाला अपेक्षित असलेल्या मतदारसंघाचा प्रस्ताव सुळे यांच्या समोर सादर करून सकारात्मक चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मुंबई, कोकण या सर्व विभागांतील विधानसभेची निवडणूक लढविणार असल्याचे अण्णासाहेब कटारे यांनी सुप्रियाताई सुळे यांना सांगितले.

लवकरच पुढील बैठक होणार असून, सदरच्या बैठकीत काही निर्णय देखील घेतले जाणार असल्याचे समजते. सदरप्रसंगी पुणे जिल्हाध्यक्ष सचिन साबळे, महाराष्ट्र जनसंपर्कप्रमुख सचिन नांगरे, युवा नेतृत्व बिपिन कटारे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष कुणाल मोहिते, तळेगाव दाभाडे अध्यक्ष सुनील करंजे, अक्षय वाघमारे, कुणाल चव्हाण, प्रशांत कटारे आदी उपस्थित होते.

## जानोरी येथील जागृत महिमा असलेली जगदंबामाता

**जानोरी : प्रतिनिधी**
**दिंडोरी तालुक्यातील जानोरी गावातील जागृत महिमा असलेल्या जगदंबामातेच्या मंदिराची स्थापना १६६७ साली करण्यात आली होती.**

यावेळी मंदिराची कौलारू छताचे व सागाच्या लाकडांचे अतिशय सुंदर बांधकाम केलेले मंदिर होते. परंतु जास्त काळ गेल्याने मंदिराची पडझड झाल्यामुळे जानोरी गावातील ग्रामस्थांनी तसेच ट्रस्टवरील सदस्यांनी व ग्रामपंचायतीच्या सहकार्याने एकत्र येऊन नवीन मंदिर व मूर्तीची स्थापना करण्यासाठी निधी गोळा करण्यात आला. शुक्रवार दि. १५ जून २०१२ रोजी नवीन अतिशय भव्य दिव्य असे मोठे मंदिर उभारण्यात आले. या



मंदिरात एकच दगडाची बनवलेली ५५०० किलो वजनाची अतिशय सुंदर अशी जगदंबामातेची मूर्तीची स्थापना करण्यात आली. या मूर्तीला १८ हात असून, प्रत्येक हातात लढाईचे शस्त्र आहे. तसेच नाकात नथ, कानात कर्णफुल, गळ्यात मंगळसूत्र, कमरपट्टा, पायात तोडे असे परिधान केलेल्या जगदंबादेवीचे अतिशय सुंदर रूप दिसते.

जानोरी गावातील जागृत व महिमा असल्यामुळे संपूर्ण गावाची कुलदैवत मानले जाते. त्यामुळे जानोरी गावातील एकही घरात, गल्लीत, चौकात, गावातील वाडीवस्तीवर नवरात्रीच्या काळात दुसऱ्या मूर्तीची स्थापना केली जात नाही तसे एखाद्या परिवाराने किंवा ग्रामस्थाने दुसऱ्या मूर्तीची स्थापना केल्यास त्या परिवारावर किंवा गावावर अतिशय खतरनाक संकटे येतात किंवा गावात रोगराई पसरते असे जुने जानते वृद्ध सांगतात.

## मातोश्री फार्मसीमध्ये औषधांवरील पोस्टर सादरीकरणाचा आविष्कार

**येवला : प्रतिनिधी**
**एकलहरे (नाशिक) येथील मातोश्री कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत महाविद्यालय स्तरावरील आविष्कार स्पर्धा संपन्न झाली. यातील विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.**

या स्पर्धेमध्ये फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर सादर केले.पोस्टर सादर करताना, ड्रग डिलिव्हरी सिस्टिम, हरबल फॉर्मुलेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे विषय निवडले होते. या स्पर्धेत ३८ स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी प्राचार्य डॉ. गोकुळ तळेले यांनी संशोधनाच्या गरजेविषयी मार्गदर्शन केले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. सुराणा



संतोष व डॉ. रमणलाल कच्छवे यांनी पार पाडले. या स्पर्धेचे सूत्रसंचालन पूजा शिंदे व मानसी बंदावणे यांनी केले. या स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष किशोर दराडे व सचिव कुणाल दराडे यांचे सहकार्य लाभले. उपप्राचार्य डॉ. सचिन कापसे, डॉ. प्रशांत मालपुरे, पराग कोठावदे,निशा ढोकळे, विकास केदार, श्वेता झाल्टे, श्रद्धा भावसार, सुरेखा पाटील, गायत्री वाघ,दीपाली जोशी,दीप्ती चौधरी,अक्षदा बैरागी,स्वाती दराडे,आदर्श वाघ, जयश्री पाटील आदींनी नियोजन केले.

## छत्रपती गूळ उद्योग समूहाचा कसमादेत नावलौकिक : जाधव

**देवळा : प्रतिनिधी**
**कसमादेचे वैभव असलेल्या वसाकाची चाके थांबली, अनेक सहकारी साखर कारखाने बंद पडली. १०, १२ वर्षांपूर्वी या कार्यक्षेत्रात प्रचंड प्रमाणात उसाचे क्षेत्र होते. मात्र कारखाने बंद झाले. त्यामुळे क्षेत्रही घटले आहे.**

या सर्व परिस्थितीवर मात करून खालप (ता. देवळा) येथील युवा उद्योजक कैलास देवरे यांनी वडील आंनदा देवरे (बडोदकर) यांच्या आशीर्वादाने २००६ साली सुरू केलेल्या छोट्या गूळ निर्मिती उद्योगाने आज कसमादेमध्ये नावलौकिक मिळवून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही चांगला भाव देऊन आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे समन्वयक कुबेर जाधव यांनी केले. खालप (ता. देवळा) येथे छत्रपती गूळ निर्मिती उद्योग समूहाच्या वतीने गुरुवारी दि. ३ रोजी घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर बॉयलर अग्निप्रदीपन



**उसाला प्रतिटन ३ हजार रुपये भाव**

खालप येथील सेंद्रिय गूळ उद्योग समूहाने ऊस उत्पादक शेतकरी यांचा विश्वास संपादन करून आपल्या व्यवसायात सातत्य ठेवले आहे. सेंद्रिय पद्धतीने तयार करण्यात येत असलेल्या येथील गुळाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असते. यावर्षीच्या हंगामात उसाला प्रतिटन ३ हजार रुपये भाव देणार.

– **उद्योजक कैलास देवरे,** संचालक, छत्रपती गूळ उद्योग समूह

कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

यावेळी वसाकाचे माजी संचालक आनंदा देवरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष पंडितराव निकम, शेतकरी संघाचे माजी चेअरमन चिंतामण आहेर, वासोळचे लोकनियुक्त सरपंच स्वप्निल पाटील, वणी दूध संघाचे संचालक विनोद देवरे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमनाथ जगताप, खालपचे उपसरपंच मुरलीधर अहिरे, अविनाश सूर्यवंशी, बळवंत सूर्यवंशी, रवींद्र सूर्यवंशी, उमेश सूर्यवंशी, शशिकांत सूर्यवंशी, उखा शेवाळे, भिका शेवाळे, कैलास कोकरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

### मृद व जलसंधारण विभागाची २४ कोटींची मान्यता : आ. आहेर

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील धोंडाबे, विजयनगर, दह्याने हट्टी, कण्हेरवाडी आदी गावांचा शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा याबाबत स्थानिक नागरिकांची व लोकप्रतिनिधी यांची सततची मागणी होती. त्या अनुषंगाने आमदार डॉ. राहुल आहेर यांनी लपा तलाव जांबुटके (माकडडोह, ता. चांदवड) या योजनेस(धरणास) मान्यता मिळावी याबाबत मृद व जलसंधारण विभागांमध्ये सतत पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने मृद व जलसंधारण विभागाने २४ कोटी ४१ लक्ष ३१ हजार ७८ रुपयांची प्रशासकीय मान्यता धरणासाठी दिली आहे. धरणाची लांबी ३८५ मीटर आहे. उंची २०.१५ मीटर आहे. हेड रेग्युलेटर आहे. हेड रेग्युलेटरमधून पाणी सोडल्यानंतर ते पाणी वापरण्यासाठी दोन सिमेंट बंदरे बांधायचे आहेत आणि साधारणतः ६५० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे.



पिंपळगाव नजीक येथे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उपस्थित ज्येष्ठ नागरिक. (छाया : समीर पठाण)

## पिंपळगाव नजीकमध्ये ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

**लासलगाव : वार्ताहर**
**ज्येष्ठ नागरिक सेवा संघ पिंपळगाव नजीक यांच्या विद्यमाने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. या दिनाच्या निमित्ताने संघाचे अध्यक्ष प्रमोद आढाव यांनी उपस्थित ज्येष्ठांना या दिनाचे महत्त्व व ज्येष्ठांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा, सवलती व संरक्षण आदींबाबत माहिती दिली.**

अनेक वृद्धांना प्रलंबित्वात राहावे लागते. त्यांना वैद्यकीय सेवा तसेच इतर तत्सम गरजा भागविता येत नाहीत. वृद्धांच्या नाठाळ पाल्यांवर जरब ठेवण्यासाठी शासनाने कायदा केलेला आहे. तसेच संजय गांधी निराधार योजनेंतर्गत निराधार वृद्धांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. शासनाने मातोश्री वृद्धाश्रम योजनाही स्वयंसेवी संस्थामार्फत अनुदान तत्त्वावर सुरू आहेत. संघातील सदस्यांना संघाचे सेक्रेटरी राजेंद्र सावंत यांनी सर्वतोपरी सेवा देण्यासाठी संघ प्रयत्नशील राहील, असे नमूद केले.

# राहुड घाटात मुख्यमंत्र्यांच्या बंदोबस्तासाठी जाणाऱ्या पोलिसांच्या वाहनाचा अपघात

## १२ पोलीस कर्मचारी जखमी

**चांदवड : वार्ताहर**
**येथील राहुड घाटात मुंबई-आग्रा महामार्गावर मुख्यमंत्र्यांच्या बंदोबस्तासाठी मालेगाव येथे जाणाऱ्या नाशिक ग्रामीण पोलिसांच्या वाहनाचा अपघात झाल्याची घटना शुक्रवारी दि. ४ रोजी सकाळी सव्वानऊ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात वाहनातील १२ पोलीस कर्मचारी जखमी झाले. या घटनेत सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही, मात्र अपघातात पोलीस व्हॅनच्या पुढील भागाचे नुकसान झाले असून, जखमींवर चांदवड उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.**



मालेगाव येथे कृषी विज्ञान संकुलाच्या उद्घाटनासाठी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार असल्याने त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलीस वाहनांचा ताफा नाशिकहून मालेगाव येथे जात असताना राहुड घाटातील उतारावरील वळणावर ताफ्यातील सर्वांत पुढील नाशिक ग्रामीणच्या पोलिसांची व्हॅन (क्र. एमएच १२ व्ही.सी.६३४०) पुढे जाणाऱ्या अज्ञात वाहनावर धडकली.

या अपघातात वाहनचालक पोलीस हवालदार पुरुषोत्तम पुंडलीक मोरे (४९) यांच्या डाव्या पायाला व पोलीस हवालदार शीतल रामकृष्ण गायकवाड (४६) यांच्या गुडघ्याजवळ मार लागून गंभीर दुखापत झाली. तर पोलीस उपनिरीक्षक नानाजी मांडवडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक शांताराम गाडे, पोलीस कर्मचारी किशोर बोडके, नीलेश आहिरे, दीपक लोंढे, जयवंत चौधरी, कुमार जाधव, किरण आहेर, चेतन तुंगार, नीलेश कडाळे हे किरकोळ जखमी झाले. जखमींना पोलीस वाहनातून तातडीने उपचारासाठी चांदवड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर गंभीर जखमींना चांदवड येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच चांदवडचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ, पोलीस उपनिरीक्षक भानुदास नन्हे, अमोल जाधव, सुनील जाधव, स्वप्नील रंधे, विक्रम बस्ते, स्वप्नील जाधव, भाऊलाल हेंबाडे, राजू गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. या अपघातात पोलिस व्हॅनच्या पुढील बाजूचे मोठे नुकसान झाले.



## रस्त्याचे काम त्वरित करण्याची नागरिकांची मागणी

**उमराळे बु.: वार्ताहर**
**उमराळे बु. हे गाव दिंडोरी तालुक्यातील महत्त्वाचे गाव मानले जात असून, उमराळे गावालाच गुजरात-पेठ महामार्ग जोडला गेला असून, सदरील महामार्ग वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. या महामार्गाहून जड वाहनांची मोठी रेलचेल चालू असते.**

येथील उमराळे फाटा ते बनमोरीचे बांधकाम करून ती मागील काही महिन्यांपूर्वी उंच बनविण्यात आली होती. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. त्यानुसार दैनिक गांवकरीने याबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते व त्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कामही करण्यात आले होते.

मात्र सदरील काम हे धातूरमातूर पद्धतीने झाले असल्याचे नागरिकांच्या निदर्शनासही आले होते. या समस्यांचे गाऱ्हाणे कुणाकडे मांडावे अशी कुणकुण येत-जाता वाहनधारकांना पडली होती. ऐन पावसाळ्यातच पावसाचे पाणी रस्त्यावर ओसंडून वाहू लागल्याने कमी दर्जाच्या बांधकामाचा व सार्वजनिक बांधकाम विभागाचा गलथानपणा उघडकीस आल्याने याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, येथील बन मोरीचे बांधकाम चांगल्या दर्जाचे करण्यात येऊन खराब झालेल्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.